१२६ इतिहास
१८८२

इतिहास सार

किंमत २॥ आणे

मराठा ... नं.

पोतदारांची शालोपयोगी पुस्तकमाला

नंबर ११.

# इतिहाससार

अथवा

## हिंदुस्तानाचा प्राचीन व अर्वाचीन संक्षिप्त इतिहास.

[मराठी पांचवी व सहावी, आणि इंग्रजी पहिली, दुसरी व तिसरी ह्या इयत्तांकरितां.]

शोधून वाढविलेली आवृत्ति आठवी.

पोतदार कृत पुस्तकमाला.

[हीं पुस्तकें वासुदेव मोरेश्वर पोतदार, कांदेवाडी, मुंबई, यांजकडे किंवा मुंबईत रामवाडीचे नाक्यावर पोतदारांचे पुस्तकांचे दुकानीं विकत मिळतील.]

मुंबई-"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिला.

सन १८९२.

[हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क राखिले आहेत.]

# प्रस्तावना.

हल्लीं सर्व शाळांत चालू असलेल्या रीतीप्रमाणें मराठी पांचवी व सहावी, आणि इंग्रजी पहिली, दुसरी व तिसरी ह्या इयत्ता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस हिंदुस्तानाचा इतिहास शिकवितात. सरकारी विद्याखात्याचा इतिहास फारच उत्तम व भरपूर माहिती देणारा आहे; परंतु तो अतिशय विस्तारानें लिहिलेला असल्यामुळें त्यांतील माहिती लहान विद्यार्थ्यांस ध्यानांत ठेवण्यास फार कठिण पडते. ती अडचण दूर व्हावी ह्मणून 'इतिहाससार' या नांवाचें लहानसें पुस्तक तयार केलें. पहिल्या तिन्ही आवृत्तींच्या संबंधानें पुष्कळ विद्यार्थी व शिक्षक यांजकडून ज्या सूचना आल्या त्यांप्रमाणें सहाव्या आवृत्तीचे वेळीं पहिलें स्वरूप बरेंच बदलावें लागलें. सहाव्या आवृत्तींत पहिल्या आवृत्तींतली सर्व माहिती ठेवून, शिवाय दोन तीन मान्य इंग्रजी इतिहासांचे व मराठी बखरींचे आधारें पुष्कळच माहिती दिली आहे. प्रथम प्राचीन माहिती देऊन त्यापुढें आजपर्यंतचा इतिहास, संबंधाची विसंगति न करितां दिला आहे. याशिवाय, शेवटीं पुरणिका दिल्या आहेत. त्या तर परीक्षेच्या वेळीं फारच उपयुक्त होतील. विशेषेंकरून सहाव्या इयत्तेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां ही सोय केली आहे. तिचा ते चांगला उपयोग करतील अशी उमेद आहे. सहाव्या आवृत्तीच्या वेळीं ह्यांत बरीच सुधारणा केली आहे. मागल्या आवृत्तींत जास्त घातलेला भाग ( ह्या आवृत्तींत भाग ७ पहा ) जास्त विस्तारानें लिहिला आहे. शिवाय ८ वा अगदीं नवीन भाग घातला आहे, हे दोन्ही भाग हिंदुस्तानच्या इतिहासांत असणें किती आवश्यक आहे हें सांगायाला नको. शिवाय एक दोन पुरणिकाही जास्त घातल्या आहेत. मधून मधूनही क्वचित् जास्त मजकूर घातला आहे. पुस्तक वाढून किंमत न वाढावी याकरितां मुद्दाम हल्लींची टैपांची व्यवस्था केली आहे. यामुळें मजकूर पुष्कळ वाढून किंमत मुलांचे सोयीकरितां तीच ठेवतां आली.

ही **आठवी** आवृत्ति जशीच्या तशीच छापून प्रसिद्ध केली आहे.

पां० मो० पो०

विकत घेतल्याची ता. २३
किंमत ६२६

# हिंदुस्तान देशाचा

# प्राचीन व अर्वाचीन संक्षिप्त इतिहास.

मराठी ग्रंथसंग्रहालय नं० ठाणे

## भाग १.

### हिंदुस्तानाची प्राचीन माहिती.

ज्या देशांत आपण राहतों त्या देशाचा प्राचीन इतिहास माहीत असणें फार उपयोगी आहे. ही माहिती ह्मटली ह्मणजे, आपले पूर्वज कोण होते, त्यांनीं काय काय केलें, हल्लींची स्थिति प्राप्त होण्यास काय काय कारणें झालीं, समाज, धर्म वगैरेंची स्थिति देशकालानुरूप कशी बदलली व बदलली पाहिजे वगैरे, ही होय. ही माहिती अगदीं खरी मिळण्यास आपल्याच लोकांनीं ग्रंथ लिहून ठेविले पाहिजे होते, पण तशी वस्तुस्थिति नाहीं. तेव्हां परकी लोकांचाच आधार घेणें भाग पडतें. ह्मणून दिलेली माहिती शब्दशः खरी आहे असें ह्मणवत नाहीं.

**देशाचें वर्णनः**—हिंदुस्तान हा देश मध्य-एशिआपासून दक्षिणेस समुद्रापर्यंत पसरला आहे. ह्याच्या उत्तरेस हिमालय, पश्चिमेस हिंदीमहासागर, पूर्वेस बंगालचा उपसागर आणि दक्षिणेस केप कन्याकुमारी. याची दक्षिणोत्तर लांबी व पूर्वपश्चिम रुंदी ह्या दोन्ही सारख्याच ह्मणजे सुमारें १,९०० मैल आहेत. हा देश त्रिकोणाकृति आहे. यालाच पूर्वेच्या बाजूला ब्रिटिश ब्रह्मदेश जोडलेला आहे. त्यासुद्धां या देशाचें क्षेत्रफळ सुमारें पंधरा लक्ष चौ० मैल आहे. व लोकसंख्या सुमारें २८ कोट आहे. या देशाची राजधानी कलकत्ता शहर. या देशाचे स्वाभाविक तीन भाग झालेले दिसतात. पहिला भाग हिमालय पर्वत व त्याच्या दक्षिणेकडील शाखा; दुसऱ्या भागांत, हिमालयाच्या पायथ्यापासून निघणाऱ्या सिंधु, ब्रह्मपुत्रा, भागीरथी वगैरे नद्या ज्या मैदानांतून गेल्या आहेत, तीं मोडतात. ह्या दुसऱ्या भागांत खालचा बंगाला, आसाम, अयोध्या, वायव्येकडील प्रांत, पंजाब, सिंध,

राजपुताना वगैरे येतात. आणि तिसऱ्या भागांत हिंदुस्तानाच्या दक्षिणेकडील अर्धा भाग येतो. याला पूर्वी दक्षिण असें म्हणत असत. यांत मध्यप्रांत, वराड, मद्रास इलाखा, मुंबई इलाखा, म्हैसूरप्रांत, व निजाम, शिंदे आणि होळकर यांचे मुलूख येतात.

हिंदुस्तानाचे, पूर्वेकडून प्रारंभ केला असतां, खालीं लिहिल्याप्रमाणें, राजकीय विभाग आहेतः–१ असाम. २ बंगालप्रांत. ३ वाय्व्येकडील प्रांत. ४ अयोध्या प्रांत. ५ पंजाब. ६ राजपुताना. ७ मुंबई इलाखा. ८ सेंट्रल इंडिया एजन्सी ( ग्वाल्हेर, इंदूर, भोपाळ, रेवा, बुंदेलखंड वगैरे संस्थानें ). ९ मध्यप्रांत. १० वराड. ११ निजामाचा हैदराबाद प्रांत. १२ मद्रास इलाखा. १३ म्हैसूर. १४ कुर्ग.

**हिंदुस्तानांतील लोकः**–हिंदुस्तानांत चार प्रकारचे लोक आहेत. ते असेः–अनार्य ( मूळचे लोक ), आर्य, शूद्र आणि मुसलमान. तथापि हिंदुस्तानचे उत्तर हिंदुस्तान आणि दक्षिण हिंदुस्तान असे दोनच मोठे विभाग मानले तर, मुसलमानादिक वगळून, लोकांच्या जातींचे विभाग करतां येतात तेः–उत्तर हिंदुस्तानांत आर्य आणि अनार्य. दक्षिण हिंदुस्तानांत द्रविड आणि अनार्य. द्रविड लोक आर्य नसावेत, तर अनार्य लोकांशीं त्यांचा बराच संबंध असावा असें कित्येकांचें मत आहे.

**भाषाः**–आर्य लोकांच्या भाषाः–हिंदी, बंगाली, मराठी, गुजराथी, पंजाबी, सिंधी वगैर. द्रवीड लोकांच्या भाषाः–तेलगू, तामिळ कानडी वगैरे.

आर्य आणि अनार्य ह्याच दोन मुख्य जाती ऐतिहासिक कालापूर्वी असाव्या असें दिसतें. ह्या देशांत मूळचे लोक अनार्य होते. त्यांच्याविषयीं खात्रीलायक कांहींच इतिहास समजत नाहीं. परंतु आर्य लोकांनीं हिंदुस्तानांत आल्यावर वेदांमध्यें त्यांना जीं निंदात्मक नांवें दिलीं आहेत, त्यांवरून ते अतिशय अडाणी व कुरूप असावे असें दिसतें. हे लोक अंदमान बेटांत, मद्रास इलाख्याच्या दक्षिण भागांत अनामली नांवाचे डोंगर आहेत तेथें, मध्यप्रांतांत, ओरिसा प्रांतांत आणि हिमालयाच्या टेंकडांवर अद्यापि राहिलेले आढळतात. खालच्या बंगाल्यांत गंगानदीच्या कांठाला लागून जे डोंगर, तेथील संताळ लोक आणि ओरिसा प्रांताच्या किनाऱ्यावरील डोंगरांतील कोंद लोक ह्या दोन अनार्य लोकांच्या सु-

मधलेल्या जाती आहेत. संताळ लोकांत जातिभेद नसून बालविवाहाची मनाई आहे. हे लोक समंध, यक्ष, पिशाच्च वगैरेंना भजतात. कोंड लोक असें समजतात कीं, कुटुंबांतील सर्व माणसांवर बापाचा सर्वस्वी अंमल असतो. अतिशय जुन्या घराण्यांतला जो वडील मुलगा तो सर्व जातीचा मुख्य असतो. या लोकांचीं लग्न करण्याची रीत विलक्षण आहे. एकाद्या ठिकाणीं जेवणाचा समारंभ चालला असतां तेथून नवरी मुलगी धरून आणतात. त्या मुलीबद्दल नवऱ्यामुलाचा बाप पैसे देतो. वरापेक्षां वधू पुष्कळ वर्षांनीं वडील असते. मुलांचीं लग्नें दहा वर्षांच्या सुमाराला व मुलींचीं १४ वर्षांच्या सुमाराला होतात. हे लोक वर्षांतून दोनदां आपल्या देवतांकारितां नरमेध करीत असत. परंतु इ० स० १८३९ त ब्रिटिश सरकारच्या अमलांत आल्यापासून तो बंद झाला. अनार्य लोक सामन्यतः खरें बोलणारे, राजनिष्ठ आणि ममताळू असे असतात. गुरखा जातीचे अनार्य लोक पराक्रमी आहेत अशाविषयीं प्रसिद्धि आहे.

**आर्यलोक**—हे लोक फार प्राचीनकाळीं मध्य-एशिआंतून हिंदुस्तानांत वायव्य दिशेकडून आले असें बहुतेकांचें ह्मणणें आहे. कित्येक विद्वान् लोक असा तर्क बांधितात कीं, यूरोप आणि हिंदुस्तान यांतील प्राचीनकाळच्या लोकांच्या भाषांत जे कांहीं त्या काळचे शब्द राहिले आहेत, त्यांवरून हिंदु व युरोपिअन हे दोन्ही आर्य आहेत. वेदांतील सूक्तांवरून असें दिसतें कीं, हे लोक काबूल प्रांतांतील खायबर पासच्या उत्तरेस होते. पुढें जय मिळवीत ते गंगेपर्यंत आले, आणि तेथें शेतीभाती करून स्थाईक होऊन राहिले. गंगेच्या कांठीं आल्यावर त्यांनीं ऋग्वेद रचिला असें कित्येकांचें मत आहे. हा अतिशय प्राचीन आहे. ह्याच्या पूर्वीचा लेख कोणत्याहीं देशांत आढळत नाहीं. ऋग्वेदांत १,०१७ सूक्तें आहेत व त्याच्या १०,५८० ऋचा आहेत. ऋग्वेदावरून असें दिसतें कीं, हल्लींप्रमाणें त्या वेळीं जातिभेदाचा निर्बंध नव्हता. प्रत्येक कुटुंबांतील वडील पुरुष त्या कुटुंबाचा उपाध्याय असे. वेदांतील देवता वरुण, इंद्र, अग्नि, सूर्य, वायु वगैरे होत. ह्याच ऋग्वेदसंहितेला पुढें ईश्वरस्तुतिपर आणखी तीन वेद जोडले. त्यांचीं नांवें.-सामवेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद. ह्या प्रत्येक वेदाचें स्पष्टीकरण करण्याकारितां ब्राह्मणें जोडलीं आहेत. ह्या सर्वांना

श्रुति अशी संज्ञा आहे. पुढें कांहीं कालानंतर उपनिषदें व आरण्यकें रचिलीं. आणखी पुष्कळ काळ लोटल्यावर पुराणें रचिलीं. आपले लोक वेद ईश्वरप्रणीत मानतात त्याप्रमाणें पुराणांना ईश्वरप्रणीत मानीत नाहींत. या वेळींच आपल्या चार वर्णांची स्थापना झाली. प्रथम असें असे कीं, प्रत्येक कुटुंबाचा धनी शेतकी, लढाई आणि उपाध्येपणा हीं कामें करीत असे. परंतु पुढें बुद्धिमान् लोक वेदादि ग्रंथ रचण्याकडे काळ घालवीत. त्यांची योजना यज्ञयागादि कर्माकडे राजा करूं लागला. याप्रमाणें ब्राह्मणवर्ण झाला. तसेंच लढाई करणारे लोक क्षत्रिय झाले; आणि शेतकरी हे वैश्य झाले. ह्या तीनही जाती आर्य लोकांच्या होत. आणि चवथा, जिंकिलेल्या अनार्य लोकांचा शूद्रवर्ण.

पहिल्यापासून ब्राह्मणांनीं ज्ञानमार्ग आपल्याकडेच ठेविल्यामुळें इतर तीन वर्णांवर त्यांचें वर्चस्व पडलें. त्यांनीं हें श्रेष्ठत्व आपल्याकडेसच घेतलें पण त्याचा त्यांनीं चांगला उपयोग केला. हे आपल्या जातीचे उपाध्याय व तत्त्ववेत्ते असून धर्मशास्त्रकार, शास्त्रवेत्ते व कविही होते. त्या वेळीं जे विचारी व विद्वान् ब्राह्मण होते ते प्रथम एक जात, एक वेद व एक ईश्वर आहे असें मानीत. पुढें ब्रह्मा, विष्णु व महेश अशा तीन मूर्ति झाल्या.

हिंदु लोकांनीं तत्त्वज्ञाना ( मीमांसे ) वर जे ग्रंथ लिहिले आहेत त्यांस 'दर्शनें' असें नांव आहे. हीं दर्शनें सहा आहेत, त्यांचीं नांवें.–१ कपिल ऋषीची सांख्यमीमांसा. २ पतंजलीची योगमीमांसा. ३ गौतमाची न्यायमीमांसा. ४ कणादाची वैशेषिकमीमांसा. ५ जैमिनीची पूर्वमीमांसा. ६ व्यासाची उत्तरमीमांसा अथवा वेदान्त. हीं दर्शनें निरनिराळ्या काळीं लिहिलेलीं आहेत.

हिंदुस्तानांतील लोकांचें ज्योतिषशास्त्र, वैद्यशास्त्र, संगीतकला आणि धर्मशास्त्र यांवर मोठमोठे ग्रंथ आहेत. हिंदुलोक ज्योतिषशास्त्रांत ग्रीक लोकांच्या पेक्षांही प्रवीण झाले. परंतु हजार वर्षांपूर्वीं मुसलमान लोकांनीं हिंदुस्तान उध्वस्त करण्यास आरंभ केला, तेव्हांपासून हिंदु लोकांच्या विद्यांचा ऱ्हास होत चालला. वैद्यशास्त्रावर जे हिंदु लोकांचे ग्रंथ आहेत, त्यांत चरक, सुश्रुत आणि वाग्भट्ट हे प्रसिद्ध आहेत. पुढें बौद्ध-धर्म बुडून आलीकडचा हिंदुधर्म प्रबळ झाला आणि जातीचें बंड माजलें. तेव्हांपासून

ठाणे.

हिंदु-वैद्यकीचा ऱ्हास होत चाल[illegible]कांची संगीतकला अतिशय गोड व मनोवेधक आहे. असें [illegible]तात कीं, इ० स० पूर्वी ४०० या वर्षांच्या सुमारास त्यांनीं सप्तसूर बसविले. ह्यानंतर इतर राष्ट्रांत ही कला पसरली. धर्मशास्त्रावर जे मान्य ग्रंथ आहेत त्यांत मनुस्मृति व याज्ञवल्क्य-स्मृति ह्या मुख्य आहेत. हिंदुलोकांच्या काव्य-ग्रंथांत महा-भारत, रामायण, रघुवंश, कुमारसंभव वगैरे प्रसिद्ध आहेत. महा-भारत हें व्यासानें व रामायण वाल्मिकीनें रचिलें. ग्रीसदेशाप्रमाणें या देशांत हिंदुलोकांनीं नाटकें, पशूंच्या गोष्टी, याशिवाय ईश्वरविषयक काव्येंही रचिलीं आहेत नाटकांत शाकुंतल, मृच्छकटिक, उत्तररामचरित, मालतीमाधव, मुद्राराक्षस वगैरे फारच प्रसिद्ध व जगन्मान्य आहेत. तसेंच पंचतंत्र, हितोपदेश, गीतगोविंद वगैरे गोष्टींचीं पुस्तकें आहेत. प्राचीनकाळीं संस्कृत भाषा व्यवहारांतली असल्यामुळें हे सर्व ग्रंथ संस्कृत भाषेंतच रचिलेले आहेत. याप्रमाणें ब्राह्मण हे पहिल्यापासून विद्येचें आगर होते. त्यामुळें त्यांचें बरेंच दिवस वर्चस्व होतें.

**बौद्धधर्म.**—इ० स० पूर्वी सहाव्या शतकांत हिंदुस्तानांत बौद्धधर्माची स्थापना गौतमबुद्ध यानें केली. हा धर्म हिंदुस्तानांत १३।१४ शतकें चालला होता. बौद्धधर्माचें तत्त्व असें आहे कीं, मनुष्यानें स्वतः चांगलें आचरण ठेविलें तर त्याला मुक्ति मिळते, मनांत कांहीं तरी देवता आणून त्यांचें आराधन करून ती मिळत नाहीं. यज्ञयागादिकांचा त्यांत निषेध आहे. ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें त्याला बरीवाईट स्थिति प्राप्त होते. बौद्धधर्माच्या मताप्रमाणें मनुष्यांचीं मुख्य कर्तव्यकर्में तीन-पहिलें मनोनिग्रह, दुसरें भूतदया आणि तिसरें अहिंसा. याप्रमाणें गौतमबुद्ध सर्व लोकांना उपदेश करूं लागला, व तेणेंकरून या धर्माची चोहोंकडे प्रसिद्धि झाली. गौतमबुद्ध हा इ० स० पूर्वी ६२३ या वर्षी जन्मला, आणि इ० स० पूर्वी ५४३ या वर्षी मृत्यु पावला. नंतर याचीं वचनें एके ठिकाणीं जमविण्याकरितां एकंदर चार मोठ्या सभा भरल्या. त्यांपैकीं पहिली ५०० शिष्यांनीं भरविली होती; दुसरी इ० स० पूर्वी ४४३ या वर्षी त्या मताच्या ७०० अनुयायांनीं भरविली होती; तिसरी इ० स० पूर्वी २४४ त अशोक राजानें व चवथी इ० स० पूर्वी ४० च्या सुमारास सिथियन

लोकांचा राजा कनिष्क यानें भरविली होती. अशोक हा चंद्रगुप्ताचा नातू असून तो इ० स० पूर्वी २९७ या वर्षाच्या सुमारास बहार देशाचा राजा होता. अशोक राजानें स्वतः हा धर्म स्वीकारून त्याचा जिकडे तिकडे फैलाव केला. त्याच्या पदरीं सुमारें ६४,००० धर्मोपदेशक होते. त्याचे शिलालेख प्रसिद्ध आहेत. त्यांवर त्यानें बौद्धधर्माचीं सर्व मतें लिहून ठेविलीं आहेत. हा धर्म जरी बहुतेक एशिया खंडांत पसरला होता, तरी त्याच्या योगानें ब्राह्मणधर्माला कांहींच धक्का पोंचला नाहीं. बौद्धधर्माचे लोक देवासाठीं देवळें न बांधतां गरीब भिक्षेकरी लोकांसाठीं मठ बांधीत. त्यांनीं नालंदा येथें एक मोठा विहार बांधला होता. व तेंच त्यांच्या विद्येचें पीठ होतें. त्या ठिकाणीं सुमारें दहा हजार लोक, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, व्यवहारशास्त्र, वैद्यकी वगैरे शास्त्रांचा अभ्यास करीत असत. इ० स० ९०० या वर्षाच्या सुमारास ब्राह्मणधर्माचे उपदेशक उत्पन्न झाल्यामुळें बौद्धधर्माचा लोप झाला, तरी तो अगदींच नष्ट झाला नाहीं. त्याची जैन या नांवाची एक शाखा हिंदुस्तानांत आहे. त्यांचे आचारविचार फार कडकडीत आहेत. अहिंसा हा त्यांचा परम धर्म होय. याप्रमाणें बौद्धधर्म जाऊन पुन्हा ब्राह्मणधर्म हळू हळू बळावत चालला.

**हिंदुस्तानावर परकीय लोकांच्या स्वाऱ्या**–हिंदुस्तानावर ग्रीक व सिथियन या लोकांनीं स्वाऱ्या केल्या. ग्रीक लोकांचा म्यासेडोनचा राजा अलेकझान्डर धि ग्रेट् ( शिकंदर बादशहा ) यानें इ० स० पूर्वी ३२७ या वर्षी हिंदुस्तानावर स्वारी केली. प्रथम अटक शहराजवळ सिंधुनदी उतरून तो पंजाबांत आला. तेथें पौरस या नांवाचा राजा राज्य करीत होता. त्या उभयतांमध्यें लढाई होऊन तींत पौरस राजाचा पराभव झाला. परंतु तो त्याला शरण आल्यावर त्याचें राज्य त्याला परत मिळालें. पुढें अलेकझांडर सिंध देशाकडे आला. तेव्हां मुलतान येथील लोकांबरोबर त्याची लढाई होऊन तींत त्यानें तेथील सर्व लोकांस कापून काढिलें. आणि पंजाबांतील पांच नद्यांच्या संगमाजवळ एक शहर वसवून त्याला अलेकझांड्रिया असें नांव ठेविलें. त्याला हल्लीं उच्छ असें ह्मणतात. पुढें अलेकझांडर इ० स० पूर्वी ३२३ या वर्षी मरण पावला. त्याच्या मागून ग्रीक लोकांना हिंदुस्तानावर फारशा स्वाऱ्या केल्या नाहींत. त्यांनीं हिमालयाच्या वायव्य-

दिशेस ब्याक्ट्रिया म्हणून एक राज्य स्थापिलें होतें. पुढें कांहीं वर्षेपर्यंत ग्रीक लोकांचें सैन्य पूर्वेस मथुरा, अयोध्या, व दक्षिणेस सिंध, कच्छ येथपर्यंत आलें होतें. परंतु त्यांचें कांहीं एक चाललें नाहीं. ग्रीक लोकांची ही सर्व धांदल इ० स० पूर्वी ३२७ पासून इ० स० पूर्वी १६१ पर्यंत चालली होती.

पुढें ६०० वर्षे म्हणजे इ० स० ५०० पर्यंत सिथियन लोकांनीं हिंदुस्तानांत काश्मीर येथें एक मोठें राज्य स्थापिलें. त्यांच्या सर्व राजांत कनिष्क नांवाचा राजा फार प्रसिद्ध होऊन गेला. या लोकांनीं बौद्धधर्माचा स्वीकार केला होता. यांचा राज्य-विस्तार आग्र्यापासून सिंधदेशापर्यंत झाला होता. सिथिअन लोक अद्यापि पंजाबांत आहेत. उज्जनीचा राजा विक्रमादित्य व शालिवाहन यांनीं सिथिअन लोकांस हिंदुस्तानांतून हांकून लाविलें. विक्रमादित्य हा इ० स० पूर्वी ५७ या वेळेला होता. हा राजा शककर्ता होता. त्याचा संवत् नर्मदेच्या उत्तरेस चालू आहे. इ० स० ७८ च्या सुमारास शालिवाहन झाला. त्याचाही शक नर्मदेच्या दक्षिणेस चालू आहे. यापुढें मुंबईइलाख्याच्या वायव्येकडील, अयोध्या आणि उत्तर हिंदुस्तान येथील शहावंशाचे राजे, गुप्तवंशाचे राजे, आणि कच्छ, माळवा येथील वल्लभीवंशाचे राजे, हे सिथिअन लोकांबरोबर ५०० वर्षेपर्यंत लढत होते.

**हिंदुधर्माचा विस्तार.**—आतांपर्यंत दिलेल्या हकीकतीवरून असें ध्यानांत येईल कीं, अनार्य, आर्य आणि सिथिअन ह्या तीन जातींपासून हिंदुस्तानांतील लोक झाले आहेत. वर सांगितलेल्या बौद्धधर्मामुळें या तीन्ही लोकांचा कांहीं अंशीं एकोपा झाला. बौद्धधर्माचा ऱ्हास होऊन हिंदु-धर्म बळावत चालला. बौद्धधर्मांतल्या धर्मोपदेशकांप्रमाणें ब्राह्मणधर्मांतही बरेच धर्मोपदेशक झाले. त्यांतील पहिला कुमारिलभट्ट हा बहार प्रांतांत आठव्या शतकांत होऊन गेला. त्यानें प्राचीन एकेश्वरी वैदिकमत प्रसृत केलें. येथून अर्वाचीन हिंदु-धर्माला प्रारंभ झाला. हल्लींचा हिंदु-धर्म हा प्राचीन वैदिक-धर्म आणि बौद्ध-धर्म या दोहोंचें मिश्रण आहे. या हिंदु-धर्मांत पहिली वर्णव्यवस्था मोडून जाऊन तिच्या जागीं भलतीच व्यवस्था झालेली आहे. हल्लीं लोकांच्या धंद्यावरून राहण्याच्या ठिकाणावरून हल्लींची वर्णव्यवस्था होत चालली आहे. अशी वर्णव्यवस्था झाल्यामुळें हजारों जातीभेद झा-

लेले आहेत. आपल्या समाजाचें महत्त्व नष्ट होण्यास व देशाचें नुकसान होण्यास हा जातीभेद बरेच अंशीं कारणीभूत आहे. कारण त्यामुळें जूट अगदीं नाहींशी होत चालली आहे. अलीकडच्या हिंदु-धर्मांत अनार्य लोक मोडत असल्यामुळें त्यांचे आचारविचार, धर्म देवता इत्यादिकांची बरीच भेसळ दृष्टीस पडते. हिंदु-धर्माचे मोठमोठे संस्थापक होऊन गेले ह्मणून वर सांगितलेंच आहे. त्यांतील पहिला कुमारिलभट्ट ( याचें नांव वर आलेंच आहे. ) दुसरा त्याचा शिष्य शंकराचार्य हा नवव्या शतकांत होऊन गेला. त्यानें सर्व हिंदुस्तानभर धर्मोपदेश केला. त्याचे वेदांतापर मोठमोठे ग्रंथ आहेत. शंकराचार्याच्या मताच्या अनुयायांनीं आपल्यांत शिवपूजा प्रथम आणिली. ह्या शैव-मताच्या लोकांचे तेरा पंथ आहेत. त्यांपैकींच स्मार्त, दंडी वगैरे हे पंथ आहेत. शिव-पूजेप्रमाणें हिंदु-धर्मांत विष्णु-पूजा आहे. अकराव्या शतकाच्या सुमारास वैष्णव लोकांनीं आपलीं सर्व मतें एकत्र करून एक धर्मग्रंथ रचिला. याचेंच नांव विष्णु-पुराण. ह्या वैष्णव-पंथांत देखील रामानुज, रामानंद, कबीर, चैतन्य, वल्लभस्वामी हे उपदेशक झाले. ११५० च्या सुमारास दक्षिण हिंदुस्तानांत रामानुज झाला. तो शैवमताचें खंडण करूं लागला. त्याच्या मताचा इतका फैलाव झाला होता कीं, तो मरण्याच्या पूर्वीं सुमारें ७०० मठ स्थापन झाले होते. रामानंद हा ( १३८० –१४०० ) उत्तर हिंदुस्तानांत होऊन गेला. हा काशी येथें राहत असे. त्याच्या मागून त्याचा शिष्य कबीर हा १३८०-१४२० पर्यंत झाला. हा सर्व बंगालप्रांतभर उपदेश करूं लागला. चैतन्य १४८५-१५२७ पर्यंत झाला. तो बंगाल आणि ओढ्या या प्रांतांत उपदेश करूं लागला. तो सर्व वर्णाच्या लोकांस उपदेश करी. भेदाभेद मुळींच ठेवीत नसे. तो ह्मणे, सर्व लोकांस सारखाच मोक्ष मिळावयाचा. चैतन्याच्या मागून उत्तर-हिंदुस्तानांत वल्लभाचार्य धर्माचा उपदेश करूं लागला. या पंथाचे लोक भाटे वाणी आहेत. हे राधा-कृष्णाची उपासना करितात. यापासून कृष्णोपासना स्थापन झाली. याप्रमाणें हिंदु-धर्म हा नानाप्रकारच्या निरनिराळ्या मताच्या तत्त्वांचें संमिश्रण आहे असें दिसून येईल. खरें पाहिलें असतां परमेश्वर एकच आहे. परंतु अज्ञानामुळें लोकांत ईश्वराच्या संबंधानें निरनिराळ्या समजुती होऊन गेल्या आहेत.

# भाग १.

# मुसलमान लोक आणि त्यांच्या हिंदुस्तानावर स्वाऱ्या.

## प्रकरण १.

अरबस्तानांत महमद या नांवाचा एक मनुष्य होऊन गेला. त्यानें मुसलमानी धर्माची स्थापना केली. तो इ० स० ५७० या वर्षीं जन्मला, व इ० स० ६३२ या वर्षीं मरण पावला. आरब लोकांचा हिंदुस्तानावर डोळा होता. त्यांनीं सिंध-देशावर इ० स० ६३६-इ० स० ८२८ पर्यंत स्वाऱ्या केल्या. पहिली स्वारी उस्मान यानें भडोच व ठाणें यांवर इ० स० ६३६ त केली. या आरब लोकांचा मुख्य कासिम हा होता. त्यानें सिंधुनदीजवळचा लहानसा प्रांत काबीज केला. तो इ० स० ७१४ या वर्षीं मरण पावला. पंजाब, सिंध, माळवा वगैरे ठिकाणीं शूर रजपूत राजे उत्तम प्रकारें राज्य करीत होते. त्यामुळें त्या वेळीं मुसलमान लोकांचें कांहीं एक चाललें नाहीं. पुढें इ० स० ९९७ या वर्षापासून वायव्यदिशेकडून मुसलमानांनीं स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करण्याचा प्रयत्न सुरू केला. इ० स० ९७७ त लाहोरचा राजा जयपाळ आणि गिझनीचा राजा सबक्तगीन यांची मोठी निकराची लढाई झाली. तींत जयपाळ याचा पराभव झाला. पुढें थोडे दिवसांनीं सबक्तगीन मध्य-एशियांत परत गेला व इ० स० ९७७ या वर्षीं मरण पावला. येथून हिंदुस्तानांत मुसलमानांच्या इतिहासास आरंभ झाला.

---

## प्रकरण २.

# मुसलमान लोकांचीं घराणीं.

इ० स० १००१–इ० स० १८५७.

### १. गिझनी–घराणें ( तुर्की ) इ० स० १००१–११८६.

**महमुद**–९९७-१०३०. हा सबक्तगीन याचा मुलगा. सबक्तगीन–मेल्यावर हा त्याचे गादीवर बसला. यानें हिंदुस्तानावर १७ स्वाऱ्या केल्या. त्यांत बारा प्रसिद्ध आहेत. ठाणेश्वर, नागरकोट, मथुरा वगैरे हिंदुदेवालयांतून त्यानें अपार संपत्ति लुटून नेली. त्याची प्रसिद्ध बारावी स्वारी सोरटी सोमनाथाच्या देवळा-

वर होतां (१०२४). या स्वारींत हिंदु लोक मोठ्या निकरानें लढले, परंतु शेवटीं जय महमुदास मिळाला. हा इ० स० १०३० त गिझनी येथें मरण पावला. हा शूर, विचारी व द्रव्यलोभी असा होता.

२. घोरी–घराणें ( अफगाण ). इ० स० ११८६–१२०६.

**महमद घोरी** यानें गिझनीच्या घराण्यातील शेवटच्या राजास जिंकून आपण गादीवर बसला. याचा ११९१ त चव्हाण वंशांतला दिल्ली व अजमीर येथें राज्य करणारा पृथ्वीराजा यानें ठाणेश्वर येथें पराभव केला. पण पुनः ११९३ त पृथ्वीराजावर त्यानें स्वारी केली, तींत पृथ्वीराजा मारला गेला. त्यानें बंगालच्या उपसागरापर्यंत मुलूख काबीज केला होता. त्याला पंजाबांत गाखार लोकांनीं मारिलें ( १२०६ ). ह्याच्या मागें त्याचा गुलाम कुतुबुद्दीन गादीवर बसला.

३. गुलाम–घराणें. (तुर्की) इ० स० १२०६–१२९०.

या घराण्यांत १० बादशहा झाले. त्यांत **कुतुबुद्दीन** ( १२०६ –१२१० ), **आल्तमश** ( १२११–१२३६ ), **रेझीया** बादशाहीण ( १२३६–१२३९ ), **बलबन** ( १२६५–१२८७ ) हे मोठे नामांकित होते. **कैकुबाद** ( १२८७–१२९० ) हा शेवटचा राजा होय. यांतील **आल्तमश** हा मोठा पराक्रमी होऊन गेला. यानें आपला पगडा पुष्कळ रजपूत राजांवर बसवून बहुतेक हिंदुस्तान देश काबीज केला होता. ह्याच्या वेळेस मध्य-एशियांत जंगीझखान ह्मणून मोठा सरदार उदयास आला. यानें १२१०–१२३५ पर्यंत राज्य केलें.

४. खिलजी–घराणें ( तुर्की. ) इ० स० १२९०–१३२०.

या घराण्यांत ६ बादशहा झाले. त्यांत **जलालुद्दीन** (१२९० –१२९५) **अल्लाउद्दीन** ( १२९५–१३१५ ) आणि **खुसरूखान** ( १३१६–१३२० ), हे मोठे प्रबळ होते. यांतील अल्लाउद्दीन हा मोठा पराक्रमी व क्रूर होता. ह्याच्या मलिक काफर नामक सेनापतीनें दक्षिणेंत चार वेळ स्वाऱ्या करून कन्याकुमारीपर्यंत मुसलमानी अंमल बसविला. यानें १२९७ त गुजराथप्रांत जिंकून रतिंबर शहर जयपूरच्या रजपुतांकडून घेतलें. पुढें चितुरचा किल्ला, वरंगळ शहर, देवगिरी शहर वगैरे काबीज केलीं. अल्लाउद्दीन १३१५ त मरण पावला.

२९६.३५८

५. **तघलक**-घराणें ( तुर्की ). इ० स० १३२०-१४१४.

या घराण्यांत ८ बादशहा झाले. त्यांत **घियासुद्दीन** तघलक (१३२०-१३२४), **महमद** तघलक (१३२४-१३५१), **फिरूजशहा** तघलक (१३५१-१३८८) हे मोठे झाले. यांतील दुसरा बादशहा महमद हा वेडा होता. हा आपणास रंजविण्यासाठीं रयतेस ठार मारी. इराण व चीन देश जिंकण्याकरितां यानें सैन्य पाठविलें, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यानें आपली राजधानी दक्षिणेंत देवगड येथें करण्याचा बेत केला होता. ह्याच्या मागून त्याचा पुतण्या फिरूजशहा गादीवर बसला. यानें अनेक लोकोपयोगी कृत्यें केलीं. त्यानेंच हिंदुस्तानांत पहिल्यानें कालवा बांधिला. हा इ० स० १३८८ त मरण पावला. हा दयाळू असून आपल्या प्रजेच्या कल्याणासाठीं झटत असे. फिरूजशहाच्या नंतर १४१४ पर्यंत जिकडे तिकडे बेबंदशाही होती. १३९८ त तैमुरलंगानें हिंदुस्तानावर स्वारी केली, यामुळें तघलक-घराणें अगदीं बुडत चाललें. १३९९-१४१४ पर्यंत महमद तघलक यानें नामधारी बादशहा ह्मणून राज्य केलें.

६. **सय्यद**-घराणें इ० स० १४१४-१४५०.

ह्या घराण्यांत ४ बादशहा झाले. परंतु त्यांत कोणी नामांकित झाला नाहीं.

७. **लोदी**-घराणें ( अफगाण. ) इ० स० १४५०-१५२६.

ह्या घराण्यांतील तिन्ही बादशहा दुर्बल होते. त्यामुळें बहुतेक हिंदुस्तानभर हिंदुराजे आणि मुसलमान सुभेदार हे स्वतंत्र होऊन बसले. पहिला बादशाह बिलोल लोदी व त्याचा मुलगा शिकंदर लोदी हे मात्र कांहींसे नामांकित होऊन गेले. १५२६ त बाबर यानें हिंदुस्तानावर स्वारी करून पानपतच्या लढाईत लोदी घराण्यांतला शेवटला बादशाह इब्राहिम लोदी याचा पराभव केला आणि मोंगलांचें राज्य स्थापिलें.

[ दक्षिण हिंदुस्तानांत जीं स्वतंत्र हिंदु व मुसलमानी राज्यें झालीं त्यांचा संक्षिप्त वृत्तांत मोंगल-घराण्याच्या शेवटीं दिला आहे तो पहा.]

८. **तैमुर**-घराणें (मोंगल) १९ बादशाह. इ० स० १५२६-१८५७.

**बाबर** (१५२६—१५३०)—हा तैमुरलंगाच्या वंशांतला सहावा पुरुष. ह्यानें पानपतास इब्राहीम लोदीचा पराभव करून

त्यास ठार मारिलें. १५२७ त मेवाडचा राजा संग याचा फत्ते-पूरशिक्री येथें पराभव केला. १५२८ त चंदेरी घेतली. १५२९ त बंगाल, बहार हे देश जिंकले. हा मोठा सत्यवक्ता, लिहिणारा, मनमिळाऊ असा होता. हा १५३० त मरण पावला. ह्याला हुमायून, कामरान, हिंदाल आणि मिर्झा अस्करी असे चार मुलगे होते. ह्याच्यामागून वडील पुत्र हुमायून गादीवर बसला.

**हुमायून** ( १५३०-१५५६ ) ह्यानें गुजराथच्या बहादुरशहापासून बराच प्रांत मिळविला. ह्याला शीरशहा नामक पठाणानें कनोजचे लढाईत १५४० त जिंकिलें. तो पळून जात असतां सिंध प्रांतांत अमरकोट येथें त्यास पुत्र झाला. त्याचें नांव अकबर. नंतर तो तेथून इराणास गेला व तेथील बादशाहा थोमास्प याजपासून मदत घेऊन त्यानें १५५६ त आपलें राज्य परत घेतलें. नंतर हा जिन्यावरून पडून सहा महिन्यांनीं मरण पावला. ह्याच्यामागून त्याचा मुलगा अकबर गादीवर बसला.

[ सूर घराणें ४ बादशाहा. ] ( इ० स० १५४०-१५५५ ).

**शीरशाहा** ( १५४०-१५४५ )—यानें नीतीनें राज्य चालवून देशांत तळीं, विहिरी, रस्ते वगैरे अनेक लोकोपयोगी कृत्यें केलीं. यानें बुंदेलखंडांत कालिंजर शहरास वेढा घातला असतां त्या लढाईत तो मारला गेला. त्याचे वंशज दुर्बल होते.

**अकबर** ( १५५६-१६०५ )–हा १५४२ त अमरकोट येथें जन्मला. हा गादीवर बसला तेव्हां १४ वर्षांचा होता, ह्मणून सर्व कारभार बहिराम नामक प्रधान पहात असे. परंतु तो अयोग्य रीतीनें वागूं लागल्यामुळें, अकबरानें आपल्या वयाच्या १८ व्या वर्षीं राज्यकारभार आपल्या हातीं घेतला. हें बहिरामास न आवडून, त्यानें बंड केलें. परंतु त्याचा पराभव झाला. इ० स० १५६१-१५६८ ह्या वर्षांत रजपुतांस जिंकिलें. १५७३ त गुजराथ घेतली. बंगाल, बहार, ओरिसा, काश्मीर, सिंध व कंदाहार वगैरे प्रांतांवर १५९४ पर्यंत आपला अंमल बसविला. १५९९ त अहमदनगर घेतलें. १६०१ त खानदेश खालसा केला. त्याच्याजवळ तोडरमल्ल ह्मणून एक प्रख्यात कारभारी होता. त्यानें जमिनीच्या वसुलांत वगैरे पुष्कळ सुधारणा केली. अकबरानें सर्व जातीची प्रजा एकसारखी वागवून, जबरदस्त कर व क्रूर शिक्षा बंद केल्या. ह्याला सेलिम, मुराद व दानीयल असे तीन मुलगे होते. हा

देखणा असून ह्याच्या शरीराचा बांधा मजबूद होता. ह्याला शिकारीचा नाद असून प्रसंग पडल्यास दररोज पंधरा वीस कोस चालत जाई. हा शूर, कंटक, दयाळू व मिताहारी असून ह्याला विद्येची अभिरुचि असे. ह्याचे मागून सेलिम गादीवर बसला.

**सेलिम ऊर्फ जहांगीर** ( १६०५-१६२७ )—ह्याचे मुलगे नेहमीं बंडें करीत असत. नूरजहान ह्मणून एक सुंदर व बुद्धिमान् स्त्री होती, तिचा नवरा शेर अफखान ह्यास मारून, ती १६११ त आपणास बायको केली. मोंगलांनीं अहमदनगरावर पुष्कळ वेळां हल्ले केले. परंतु तेथें मलिकंबर नामें अबिसिनियांतील एक प्रख्यात सरदार होता, त्यानें त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याजकडून इ० स० १६१५ त सर टामस् रो ह्मणून याच्या दरबारीं वकील आला होता. त्याचा जहांगिरानें बहुमान करून त्याला आपले दरबारीं एक मोठी जागा दिली. यामुळें हिंदुस्तानांतील इंग्लिशांच्या व्यापारास पुष्कळ उत्तेजन आलें. मोहोबतखान यानें बंड करून जहांगिरास कैद केलें. परंतु नूरजहान हिनें त्याला युक्तीनें सोडविलें. तो सुटल्यावर लवकरच मरण पावला. ह्याला दारू पिण्याचें व्यसन फार होतें, परंतु तो न्यायी होता. याला खुस्रु, पारविझ, शहाजहान व शहारिआर असे चार मुलगे होते.. हा १६२७ त मरण पावला. याच्यामागून शहाजहान गादीवर बसला.

**शहाजहान** ( १६२८-१६५८ )—दक्षिणचा सुभेदार खानजहान यानें बंड केलें, परंतु त्याचा बुंदेलखंडांत पराभव होऊन, तो मारला गेला. १६३७ त अहमदनगरचें राज्य बुडविलें. ह्याच्या हुकुमावरून १६३१ त बंगाल्यांतील पोर्तुगीज लोकांची कत्तल उडाली. कंदाहारचा गव्हरनर अलीमर्दनखान यानें कंदाहार स्वाधीन केलें, परंतु तें इराणी लोकांनीं परत घेतलें. शहाजहानास चार मुलगे होते. दारा, सुजा, औरंगजेब व मुराद. ह्या चौघां भावांमध्यें गादीविषयीं पुष्कळ लढाया होऊन, शेवटीं औरंगजेबानें १६५८ त शहाजहानास कैद केलें. तो १६६६ त ग्वाल्हेरीस कैदेंत असतां मरण पावला. ह्यानें आग्रा येथें ताजमहाल, मोती मशीद आणि दिल्ली येथें जुमा मशीद ह्या भव्य व सुंदर इमारती बांधिल्या आहेत. यांच्यासारख्या इमारती जगांत कोठेंही आढळणार नाहींत. ह्यानें आपणाकरितां साडेसहा कोटि रुपये खर्चून

2

एक रत्नखचित सिंहासन करविलें होतें. ह्यानें आपलें राज्य दक्षतेनें व न्यायानें चालवून भरभराटीस आणिलें. ह्याच्यानंतर औरंगजेब बादशाह झाला.

**औरंगजेब** ( १६५८-१७०७ )--ह्याला पहिला अलमगिर असें ह्मणत. हा आपल्या बापास कैदेंत टाकून व भावांस मारून आपण बादशाह झाला. जोधपूरचा राजा यशवंतसिंग व मोहोबतखान यांनीं शहाजहानास सोडविण्याविषयीं प्रयत्न केला, परंतु तो व्यर्थ गेला. त्यानें रजपूत व मराठे यांजबरोबर निरर्थक लढाया केल्या. ह्याजपासून हिंदु लोकांस फार त्रास सोसावा लागला. जिजिआ ह्मणून जो हिंदु लोकांवरचा कर अकबरानें उठविला होता तो यानें पुनः बसविला. यानें विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें अनुक्रमें १६८६ व १६८७ त बुडविलीं. यानें संभाजीस तुळापुरीं १६८९ त हालहाल करून मारिलें. हा कपटी, महत्त्वाकांक्षी व धर्मवेडा होता. हा १७०७ त अहमदनगर येथें मरण पावला. हा मेल्यानंतर मोंगलांच्या राज्यास उतरती कळा लागली व मराठे, इंग्लिश व फ्रेंच यांचें प्राबल्य वाढत चाललें. ह्याला मुझाम ( शहाअलम पहिला ), अझाम, अकबर, कामबक्ष व महमद असे मुलगे होते. याच्यामागून शहाअलम गादीवर बसला.

**बाहादूरशाह ऊर्फ शहाअलम पहिला** (१७०७-१७१२). ह्यानें अझाम व कामबक्ष यांस ठार मारिलें. शाहू कैदेंतून सुटला. शीख लोकांचा उदय. हा १७१२ त मेला.

**जहांदरशाह** (१७१२-१७१३ )--ह्याला झुलफिकारखानाच्या मदतीनें गादी मिळाली. ह्याच्या दुसऱ्या भावाचा मुलगा फिरूकशियर ह्याला हुसेनअल्ली व अबदुल्लाखान ज्यांस सय्यद असें ह्मणतात, त्यांनीं मदत केली. त्यांची व जहांदरशहाची १७१३ त आग्रा येथें लढाई होऊन, झुलफिकारखान व जहांदरशाह मारले गेले.

**फिरूकशियर** (१७१३-१७१८ )--हा नांवाचा मात्र बादशाह होता. सर्व सत्ता सय्यदांच्या हातीं होती. १७१६ त ह्याच्या दरबारीं कलकत्त्याहून डाक्टर ह्यामिल्टन् आला होता. त्यानें बादशाहास कांहीं रोग झाला होता तो बरा केला, ह्मणून त्यानें इंग्लिशांस बंगाल्यांतील ३७ गांवांची जमीनदारी दिली, व माला-

वरील जकात माफ केली. १७१३ त निजाम उल्मुलुख दक्षिणचा सुभेदार झाला. परंतु त्याला परत बोलावून त्याच्या जागीं सय्यद हुसेनअल्ली यास नेमिलें. त्यानें १७१७ त शाहूशीं तह केला. शाहूनें बाळाजी विश्वनाथाबरोबर १० हजार सैन्य देऊन दिल्लीस पाठविलें. त्यानें मराठ्यांचे चौथाई व सरदेशमुखी हे हक्क संपादन केले. फिरूकशियर याला हुसेनअल्लीनें मारविलें.

**राफिउद्दरजात व राफिउद्दवला** ( १७१९ )—ह्यांस सय्यद ह्यांनीं अनुक्रमें गादीवर बसविलें; परंतु ते लवकरच मरण पावले.

**महमदशाह** ( १७१९—१७४८ )—निजाम उल्मुलुख व सादतखान यांजकडून सय्यदांचा पराभव. १७२० त हुसेनअल्ली मारला गेला. दिल्ली व आग्रा यांचेमध्यें शहापूर येथें सय्यद अबदुल्ला याचा निजाम उल्मुलुखाकडून पराभव. रजपूत स्वतंत्र झाले. १७२४ त निजाम स्वतंत्र झाला. सादतखानानें अयोध्येस स्वतंत्र राज्य स्थापिलें. इराणचा बादशाह नादीरशहा याची दिल्लीवर स्वारी. त्याची व बादशहाच्या सैन्याची कर्नाळ येथें लढाई होऊन महमदशाह नादीरशहाच्या स्वाधीन झाला. दिल्लींतील लोकांची कत्तल व लूट. नंतर महमदशाहास पुनः गादीवर बसवून व शहाजहान बादशहाचें मयूरासनसुद्धां असंख्य रुपयांची लूट घेऊन तो स्वदेशीं परत गेला. अहमदशहा अबदल्लीचीं पहिली स्वारी व त्याचा सरहिंदचे लढाईत पराभव ( १७४७ ). बंगाल्यांत १७२५ त मुर्शिदकुलिखान स्वतंत्र झाला.

**अहमदशाह** ( १७४८—१७५४ )—१७४८ त अहमदशहा अबदल्लीनें दुसऱ्यानें स्वारी करून पंजाब घेतला. १७५४ त मल्हारराव होळकरानें दिल्ली घेतली. सरदार लोकांनीं गाझिउद्दीनाच्या फुसलावणीनें बादशाहाचे डोळे काढून त्याला कैदेंत टाकिलें.

**अलमगिर ( दुसरा )** ( १७५४-१७५९ )—ह्याच्या कारकीर्दींत अलीगोहार, गाझिउद्दीन व मिरमन्नू हे प्रख्यात पुरुष होते. बादशाहाचा वजीर गाझिउद्दीन यानें पंजाबावर हल्ला केला. तेव्हां अबदल्लीस राग येऊन त्यानें १७५७ त तिसरी स्वारी केली, आणि दिल्ली लुटून नजीबउद्दवला यास वजीर नेमिलें. नंतर गाझिउद्दीनानें मराठ्यांचें साह्य घेऊन नजीबउद्दवल्यास हाकून लाविलें. राघोबा-

शहानें १७५८ त पंजाबावर स्वारी केली त्यामुळें अबदल्लीनें चवथी स्वारी केली ( १७५९. ) हा बादशाह १७५९ त गाझि-उद्दीनाकडून मारला गेला.

**शहाअलम ( दुसरा )** ( १७५९--१८०६ )—अहमदशाहा अबदल्लीची दिल्लीवर स्वारी. १७६१ त पानपतास मराठ्यांचा पराभव. १७७० त वजीर नजिबउद्दवला मरण पावला. शहा-अलम बादशाह १० वर्षेपर्यंत अलाहाबादेस इंग्लिशांकडून पेन्शन घेऊन होता. मराठ्यांनीं नजिबउद्दवल्याचा मुलगा झाबताखान यास दिल्लींतून हांकून लाविलें. तो १७८६ त मरण पावला. नंतर त्याच्या जागीं गुलामकादर झाला. त्यानें बादशाहाच्या सर्व मुलांचे त्याच्या देखत हालहाल करून त्याचे डोळे काढिले. नंतर त्याला मराठ्यांनीं त्याच्या जाचांतून सोडविलें. पुढें इ० स० १८०३ या वर्षी त्याला लॉर्ड लेक यानें मराठ्यांपासून सोडवून त्याला पेन्-शन करून दिलें. तो १८०६ त मरण पावला. त्यानंतर सर्व सत्ता इंग्लिशांच्या हातीं आली. त्याचा मुलगा अकबर दुसरा ( १८०६-१८३४ ) व नातू महमद बहादूरशाह ( १८३४-१८५७ ) हे नांवाचे मात्र बादशाह होते. महमद बाहादूरशाह हा १८५७ च्या बंडांत सामील झाल्यामुळें, त्याला काळ्या पाण्याची शिक्षा दिली. व त्याचे मुलगे व नातू यांस क्याप्टन् हाड-सन् यानें गोळ्या घालून ठार मारिलें. याप्रमाणें तैमुरलंगाच्या घराण्याचा शेवट झाला.

---

## प्रकरण ३.

## सय्यद व लोदी-घराण्यांतील पुरुष राज्य करीत असतां दक्षिण हिंदुस्तानांत जीं स्वतंत्र हिंदु व मुसलमानी राज्यें झालीं त्यांविषयीं—

### हिंदु राज्यें.

प्राचीन काळीं दक्षिण हिंदुस्तानांतील द्रविड देशांत चेर, चोल व पांड्य ह्या तीन राजांचा अंमल होता. चेर-घराण्याच्या राजधानीचें शहर म्हैसुरांतील तलकाद; चोल-घराण्याच्या राज-धान्या कुंभकोण आणि तंजावर; आणि पांड्य-घराण्याची राजधानी मदुरा, ह्या होत्या. सर्वांत जुनें पांड्य-घराणें ( इ० स० ४००—

१३०४). ह्या घराण्यांत एकंदर ११६ राजे झाले. चेर-वंशांत ( इ० स० २८८-९०० ) ५० राजे, आणि चोल-वंशांत ५६ राजे झाले. हाच ह्या हिंदु राज्यांचा पूर्वीचा इतिहास. सध्यहश्व लोडी वंशांचे पुरुष राज्य करीत असतां जीं हिंदु राज्यें स्वतंत्र व बलिष्ठ झालीं त्यांत विजयानगरचें राज्य ( १३१८-१५६५ ) मोठें होते. विजयानगराला नरसिंह असेंही ह्मणतात. ह्या राज्याची राजधानी बलारी प्रांतांत तुंगभद्रेच्या कांठीं होती. तेथील राजाचें नांव रामराजा हें होतें. विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडें आणि बेदर येथील मुसलमान राजांनीं एकत्र होऊन इ० स० १५६५ त तालिकोट येथील मोठ्या लढाईत रामराजाचा पराभव केला आणि तो गैरसावध असतांना फार क्रूरपणानें त्यांनीं त्याला ठार मारिलें. नंतर मद्रासच्या वायव्येस ७० मैलांवर चंद्रगिरी ह्मणून एक शहर आहे, तेथें रामराजाच्या भावानें राज्य स्थापिलें, आणि त्याच्या एका वंशजानें इ० स० १६३९ त मद्रास शहर इंग्लिशांस दिलें. याप्रमाणें हिंदु राज्यें दक्षिण हिंदुस्तानांत दोन हजार वर्षांवर चालून लयास गेलीं.

## मुसलमानी राज्यें (ब्राह्मणी राज्य.)

महमद तघलघाच्या कारकीर्दीत जाफरखान नामक अफगाण सरदारानें दक्षिणेंत १३४७ त ह्या राज्याची स्थापना केली. जाफरखान हा पूर्वीं कांगो या नांवाच्या ब्राह्मणाजवळ गुलाम होता. त्या ब्राह्मणानें त्यावर उपकार केले होते, ह्मणून त्याच्या सन्मानार्थ त्यानें त्या राज्याला 'ब्राह्मणी राज्य' असें नांव देऊन आपण 'सुलतान अल्लाउद्दीन हुसेन कांगो ब्राह्मणी' असें नांव धारण केलें. हें राज्य १७८ वर्षे ह्मणजे इ० स० १५२५ पर्यंत चाललें होतें. नंतर तें मोडून त्याचीं पांच वेगळालीं राज्यें झालीं.

१ लें. विजापुरास अदिलशाही १४८९—१६८६. हें औरंगजेबानें बुडविलें.

२ रें. गोवळकोंड्यास कुतुबशाही १५१२-१६८७. हें औरंगजेबानें बुडविलें.

३ रें. अहमदनगरास निजामशाही १४९०-१६३६. हें शहाजहानानें बुडविलें.

४ थें. वऱ्हाडांत इलिचपूर येथें इमादशाही १४८४-१५७२. हें अहमदनगरच्या राजानें आपले राज्यास जोडलें.

९ वें. बेदर येथें बुरीदशाही. हें १४९२-१६०९ पर्यंत स्वतंत्र होतें. १६५७ त बेद्रचा किल्ला औरंगजेबानें घेतला.

---

ठाणे.

# भाग ३.

# मराठे लोकांचा इतिहास.

## प्रकरण १.

### मराठे राजे. ( इ० स० १६७४-१८४८. )

**शिवाजीचे पूर्वजः-मालोजी भोंसला.** हा दौलताबादेजवळ वेरुळ ह्मणून गांव आहे तेथील पाटील असून निजामशाही सरकारचे चाकरीस होता. त्या निजामशाही सरकराकडून त्यास पुणें आणि सुपें ह्या दोन प्रांतांची जहागिरी, व चाकण आणि शिवनेरी ह्या दोन किल्ल्यांची किल्लेदारी मिळाली. त्याचा मुलगा शहाजी हा दक्षिण हिंदुस्तानांत मोठमोठे पराक्रम करून प्रसिद्धीस येऊं लागला. हा अहमदनगर आणि विजापूर येथील बादशाहांच्या चाकरीस राहून त्यांच्या वतीनें त्यानें मोंगलांशीं मोठमोठ्या लढाया केल्या. याला त्याची पहिली बायको जिजाबाई हिजपासून संभाजी व शिवाजी आणि दुसरी बायको तुकाबाई हिजपासून व्यंकोजी असे तीन पुत्र झाले. इ० स० १६५० पासून दक्षिणेंत मोंगल आणि मुसलमान यांना मराठे हे प्रबळ शत्रु झाले. या मराठ्यांचा मुख्य नायक, व ज्याचें नांव आपणांमध्यें अबाधित गाजत आहे व पुढेंही अव्याहत गाजेल तो, **शिवाजी** हा होता.

**शिवाजी** ( १६७४-१६८० ) हा इ० स० १६२७ त शिवनेरी किल्ल्यांत जन्मला. ह्मणून त्याचें नांव शिवाजी असें ठेविलें. हा लहानपणीं दादोजी कोंडदेव ह्मणून शहाजीचा अत्यंत विश्वासू कारभारी होता, त्याचे शिक्षेंत होता. ह्यानें आपल्या वयाच्या १९व्या वर्षी तोरणा किल्ला घेतला. १६५९ त अफझुलखानास मारिलें. सुरत शहर दोन वेळ लुटलें. यानें १६६४ त आपल्या नांवास 'राजा' असा किताब जोडून आपल्या नांवाचें नाणें पाडिलें. ह्याच्याजवळ अष्टप्रधान होते. मुसलमानांच्या मुलखांत चोथाई व सरदेशमुखी हे हक्क व किती एक प्रांत मिळवून त्यानें आपलें राज्य केवळ अडाणी अशा मावळे लोकांच्या मदतीनें वाढविलें, व महा-

राष्ट्रीय लोकांमध्यें शौर्य, धैर्य, पराक्रम हे गुण आहेत असें दाखविलें. ह्याला १६७४ त रायगडावर राज्याभिषेक झाला. १६७६ त यानें आपला सावत्र भाऊ व्यंकोजी याजपासून आपल्या बापाच्या जहागिरीचा हिस्सा मिळविण्याकरितां करनाटकांत स्वारी केली. हा मोठा शूर, पराक्रमी, राज्यदक्ष, चतुर, मसलती, धर्मनिष्ठ, घोड्यावर बसण्यांत पटाईत असा होता. हा गुडघी रोग होऊन रायगडीं १६८० त मरण पावला. याला संभाजी व राजाराम असे दोन पुत्र होते. हे दोघे सावत्र भाऊ होते.

**संभाजी** (१६८०-१६८९ )-हा आपल्या बापासारखाच शूर होता, परंतु स्वभावानें क्रूर, दुर्व्यसनी व त्रासक होता. तो लोकांस आवडेनासा झाला, ह्मणून त्यांनीं राजारामास गादीवर बसविण्याचा बेत केला. परंतु त्यानें त्या लोकांस कैद केलें; व राजारामाच्या आईस ठार मारून त्याला रायगडावर बंदींत टाकिलें. त्यानें आपल्या बापाच्या वेळचे शहाणे प्रधान दूर करून कलुशा नामें कोणी दुष्ट व नीच कनोजी ब्राह्मण होता, त्याला आपला कारभारी केलें. त्यामुळें राज्यांत अव्यवस्था झाली. तो ऐषआरामीकरितां संगमेश्वरीं जाऊन राहिला होता. त्याला मोंगलांचा सरदार तकरींबखान यानें पकडून औरंगजेब तुळापुरीं होता, त्याजकडे नेलें. त्यानें त्याला हालहाल करवून १६८९ त ठार मारविलें. त्याला **शिवाजी** ( शाहू ) हा एकच मुलगा होता. तो सहा वर्षांचा होता.

**राजाराम** ( १६८९-१७०० )-हा कांहींसा दयाळू, उदार, व शूर होता, परंतु राजकीय कामांत चतुर नव्हता. याचा दिवाण प्रल्हाद निराजी फार हुशार होता; त्यानें राज्याचा बंदोबस्त चांगला ठेविला. राजारामानें राज्याची गादी रायगडावरून काढून साताऱ्यास आणिली. त्यानें प्रल्हाद निराजीस 'पंतप्रतिनिधि' अशी पदवी दिली, आणि सेनापति संताजी घोरपडे यास जरीपटका निशाण दिलें. हा १७०० त सिंहगडीं मरण पावला. याला ताराबाई व राजसबाई अशा दोन बायका होत्या. ताराबाईचा मुलगा शिवाजी १० वर्षांचा, आणि राजसबाईचा मुलगा संभाजी ३ वर्षांचा होता.

**दुसरा शिवाजी** (१७००-१७०८ )-हा दहा वर्षांचा असतांच ताराबाईनें याला गादीवर बसवून राज्यकारभार चालविला.

नंतर शाहूराजापासून पराभव पावून तीं कोल्हापुरास गेलीं आणि तेथें स्वतंत्र राज्याची स्थापना केली. मराठ्यांचें खरें घराणें आज मितीला काय तें कोल्हापुरचेंच उरलें आहे.

**शाहू** ( १७०८-१७४९ )-हा आपल्या आईसहित १७ वर्षे औरंगजेब बादशहाच्या कैदेंत होता. तो बादशाह मेल्यावर लांच देऊन सुटला, आणि ताराबाईशीं युद्ध करून १७०८ त आपली साताराची गादी घेतली. यानेंच फत्तेसिंगास अक्कलकोटचें राज्य दिलें. पेशवाईचें काम बहिरोपंत पिंगळे यांजकडे होतें तें काढून बाळाजी विश्वनाथास दिलें. हा फार विलासी होता. त्याला संतान नसल्यामुळें यानें बाळाजी बाजीवराव पेशवा ह्यास अशी सनद करून दिली कीं, माझ्या पाठीमागें ताराबाईचा नातू रामराजा याला दत्तक घेऊन गादीवर बसवावा; व शिवाजीच्या वंशजांचा सन्मान राखून तुह्मी राज्यकारभार चालवावा. या वेळेपासूनच मराठे राज्यांच्या हातांतून वास्तविक सत्ता कमी होत जाऊन ती पेशव्यांच्या हातांत जात चालली होती. यापुढें जे राजे साताराच्या गादीवर बसले ते नांवाचे मात्र राजे झाले.

**रामराजा** ( १७४९-१७७७ )-ह्याच्या कारकीर्दीपासून सर्व सत्ता पेशव्यांच्या हातीं आली. हा १७७७ त मरण पावला. हा निपुत्रिक होता, ह्मणून शिवाजीच्या पणज्याच्या वंशांतील एक पुरुष दत्तक देऊन गादीवर बसविला, आणि त्याचें नांव शाहू असें ठेविलें.

**दुसरा शाहू** ( १७७७-१८०८ )-हाही रामराजाप्रमाणेंच परतंत्रपणांत काळ घालवून १८०८ त मृत्यु पावला. याला दोन पुत्र होते; एकाचें नांव प्रतापसिंह, व दुसऱ्याचें नांव शहाजी.

**प्रतापसिंह** ( १८०८-१८३९ )-याला सुमारें १० वर्षेपर्यंत साताराचे किल्ल्यांत बंदींत ठेविलें होतें. पुढें १८१८ त पेशव्यांचें राज्य इंग्लिशांनीं घेतलें तेव्हां त्यांनीं त्यांला थोडासा मुलूख देऊन साताराचे गादीवर बसविलें. परंतु १८३९ त त्यावर फितुरीचा दोष आल्यामुळें इंग्रज सरकारानें त्यास राज्यावरून काढून त्याचा धाकटा भाऊ शहाजी ह्यास गादीवर बसविलें.

**शहाजी** ( १८३९-१८४८ )—ह्याला संतान नव्हतें; व त्याच्या वंशांत दुसरा कोणी वारस नव्हता, ह्मणून तें राज्य इंग्लिश सरकारानें खालसा केलें. ह्याप्रमाणें मराठी राज्याचा शेवट झाला.

## प्रकरण २.

### पेशवे ( इ० स० १७१४-१८१८. )

**बाळाजी विश्वनाथ** ( इ० स० १७१४--१७२० )—हा श्रीवर्धनचा कुळकर्णी. ह्यास प्रथम धनाजी जाधव यानें वसुलाच्या कामावर कारकून नेमिलें होतें. परंतु ह्याचे आंगीं विलक्षण अक्कल, पोंच, पराक्रम पाहून यासच शाहू राजानें पेशवाईचा अधिकार दिला. ह्यास १७१८ त शाहू राजानें सय्यद बंधूंस मदत करण्याकरितां दिल्लीस पाठविलें. तेथून त्यानें स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी हे हक्क संपादन केले. हा सासवडास मरण पावला. ह्याला बाजीराव व चिमणाजी आपा असे दोन पुत्र होते.

**बाजीराव** ( इ० स० १७२१-१७४० )-हाही मोठा शूर, राज्यकारभारांत अत्यंत निपुण, व प्रयत्नी असा होता. यानें पुष्कळ लढाया करून देश काबीज केला व मराठ्यांचें राज्य वाढविलें. ह्याच्या कारकीर्दीत मल्हारराव होळकर, राणोजी शिंदा, उदाजी पोंवार, पिलाजी गायकवाड, व फत्तेसिंग भोंसले हे उदयास आले. इ० स० १७३६ त बाजीराव दिल्लीवर गेला. त्याची व निजाम उल्मुलुख याची भोपाळ येथें लढाई होऊन, मराठ्यांस माळवा, व नर्मदा आणि चंबळा यांजमधील प्रदेश मिळाला. १७३९ त चिमणाजी आपानें वसई घेतली. ह्याला बाळाजीपंत ऊर्फ नानासाहेब, रघुनाथराव व जनार्दनपंत असे तीन पुत्र होते. हा नर्मदेचे कांठीं १७४० त मरण पावला.

**बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब** ( इ० स० १७४०-१७६१ )-ह्याच्या कारकीर्दीत पुणें शहर मराठी राज्याची राजधानी झालें. नानासाहेब स्वतः आळशी व विलासी असल्यामुळें सर्व राज्यकारभाराचें काम त्यानें सदाशीवराव भाऊकडे सोंपविलें होतें. रामचंद्र बाबा सुखठणेकर या नांवाचा कोणी एक सारस्वत ब्राह्मण राजनीतींत फार निपुण, विद्वान्, हुशार व चतुर असा होता; त्याच्या शिक्षेखालीं सदाशीवराव भाऊ उत्तम रीतीनें तें काम पहात असे. इ० स० १७५७ त ह्यानें स्वतां करनाटकांत स्वारी केली. राघोबादादानें १७५८ त लाहोरावर स्वारी केली. इ० स० १७६० त उद्गीरचे लढाईंत निजामअल्लीचा पराभव केला.

१७६१ त सोनपतपानपतच्या लढाईत मराठ्यांचा फार नाश झाला. याप्रमाणें मराठ्यांचा विध्वंस झाल्यानंतर जूट मोडून त्यांचीं चार घराणीं बलिष्ट झालीं. तीं हीं:-भोंसले, शिंदे, होळकर, आणि गायकवाड. ह्याला विश्वासराव, माधवराव व नारायणराव असे तीन पुत्र होते. हा पर्वतीस मरण पावला.

**पहिला माधवराव** (इ० स० १७६१–१७७२)-हा शूर, प्रामाणिक, चतुर, राजनीति जाणता, प्रजापालक असा होता. ह्यानें १७६४ व १७७२ या वर्षी हैदरअल्लीवर स्वाऱ्या केल्या. हा क्षयरोगाच्या भावनेनें थेऊर गांवीं इ० स० १७७२ त मरण पावला. त्या वेळेस त्याचें वय २८ वर्षांचें होतें.

**नारायणराव** आणि **रघुनाथराव** ( इ० स० १७७२–१७७४ ) नारायणराव ह्यानें पेशवाईचें काम ८ महिने केलें. नंतर त्याचा चुलता राघोबादादा यानें त्यास १७७३ त मारेकऱ्यांकडून ठार मारविलें, व आपण पेशवा झाला. परंतु त्याच्या प्रतिपक्षांनीं राघोबादादाच्या पक्षाचे लोकांस कैद करून, नारायणरावाची स्त्री गंगाबाई गरोदर होती, तिला पुरंदरीं नेऊन ठेविलें; व तिच्या नांवानें राज्यकारभार चालविला. पुढें तिला पुत्र झाला, त्याचें नांव माधवराव असें ठेवून, त्याच्या नांवाची द्वाही फिरविली. रघुनाथराव हा मोठा शूर, पराक्रमी परंतु कपटी असा होता. याला राजकीय कामांत कांहीं कळत नव्हतें. ह्याला बाजीराव व चिमणाजी आपा हे औरस, व अमृतराव हा दत्तक असे तीन पुत्र होते. हा कोपरगांवीं १७८३ त मरण पावला.

**सवाई माधवराव**–(इ० स० १७७४–१७९६) ह्याला जन्मापासूनच पेशवाईचा अधिकार मिळाला. हा पेशवाईचें काम पहात असतां मराठ्यांबरोबर इंग्लिशांचें पहिलें युद्ध ( १७७९–१७८१ ) झालें. १७८२ त सालपें येथें तह होऊन ह्या लढाईचा शेवट झाला. ह्यानें निजामावर स्वारी करून त्याचा खर्डे मुक्कामीं १७९५ त पराभव केला. ह्याच्या कारकीर्दीत सर्व कारभार नाना फडनविसाच्या हातीं होता. त्याला नानाच्या कह्यांत राहणें न आवडून तो शनवारच्या वाड्याच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी टाकून मरण पावला.

**दुसरा बाजीराव** (इ०स०१७९६–१८१८)–ह्याच्या कारकीर्दीत मराठ्यांबरोबर दुसरें [ १८०३–१८०४ ] आणि शेवटचें [ १८१७–

१८१८ ] हीं युद्धें झालीं. यशवंतराव होळकरानें पुणें शहर लुटलें. बाजीराव इ० स० १८०२ मध्यें रायगड येथें पळून गेला. नंतर तेथून वसईस गेला व तेथें इंग्लिशांशीं ठराव केला. त्यास वसईचा तह असें ह्मणतात. ह्याच्या व इंग्लिशांच्या खडकी, कोरेगांव वगैरे ठिकाणीं लढाया झाल्या. त्यांत कोरेगांवच्या लढाईनंतर पेशवा करनाटकाकडे पळून गेला व फिरतां फिरतां कोठें आश्रय मिळत नाहीं असें पाहून शेवटीं मालकम साहेबास शरण आला. त्यानें त्याला प्रतिवर्षी आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन ब्रह्मवर्तास राहण्यास सांगितलें. अष्टे गांवीं इंग्लिशांनीं साताराचा राजा प्रतापसिंह यास धरिलें. बाजीराव हा विलासी, मूर्ख, भित्रा, दुराचारी असा होता. याचेच हातीं पेशवाई बुडाली. हा १८५१ त ब्रह्मवर्तास मरण पावला. याला नानासाहेब ह्मणून एक दत्तक पुत्र होता. त्यानें १८५७ त इंग्लिशांविरुद्ध मोठें बंड केलें. परंतु अखेरीस त्याचा पराभव होऊन तो पळून गेला असें ह्मणतात.

---

# भाग ४.

## युरोपांतील लोक प्रथम हिंदुस्तानांत केव्हां आले व त्यांनीं कोठ कोठें वसहाती केल्या यांविषयीं.

इ० स० १४९८ पर्यंत युरोपांतील राष्ट्रांस हिंदुस्तानाविषयीं फारशी माहिती नव्हती. क्कचित् इटालींतील लोक व्यापाराच्या निमित्तानें इकडे येत असत. पंधराव्या शतकांत पोर्तुगीज लोक समुद्रांतून सफरी करण्याच्या कामांत फार प्रवीण होते. इ० स० १४९२ त कोलंबस हिंदुस्तानाचा शोध करण्याकरितां स्पेनच्या राजाच्या आश्रयानें गलबतें घेऊन निघाला, परंतु त्याला हिंदुस्तानाचा शोध न लागतां त्याला अमेरिका खंड सांपडलें. पुढें पांच वर्षांनीं पोर्तुगालची राजधानी लिस्बन येथून वास्को डि गामा गलबत घेऊन हिंदुस्तानाच्या शोधार्थ निघाला. येथून युरोपांतील लोकांचा हिंदुस्तानाशीं संबंध लागला.

हिंदुस्तानांत पोर्तुगीज, डच, डेन्स, इंग्लिश आणि फ्रेंच या लोकांनीं वसहाती केल्या. त्यांपैकीं पोर्तुगीज, फ्रेंच आणि इंग्लिश यांचा हिंदुस्तानाच्या इतिहासांत मोठा भाग आहे. ह्या सर्व लोकांनीं

प्रथम व्यापाराकरितां वसाहती केल्या, पण लवकरच पोर्तुगीज लोकांनीं हिंदुस्तानांत राज्यस्थापना करायाला आरंभ केला.

**पोर्तुगीज वसाहती.**–वर सांगितलेला वास्को डि गामा यानें केप ऑफ् गुड होपाकडून हिंदुस्तानाला जलमार्ग शोधून काढिला. तो मलबार किनाऱ्यावर कालिकोट बंदरांत उतरला. तो, मलबार किनाऱ्यावरचा बराच मुलूख काबीज करून, स्वदेशीं परत गेला. नंतर पोर्तुगालच्या राजानें १५०५ त फ्रान्सिस्को डि आलमेडा याला पाठविलें. हाच पहिला गव्हरनर. याच्या मागून आल-बूकर्क नांवाचा शूर सरदार पाठविला. त्यानें इ० स० १५११ त गोवें शहर घेतलें. हा हिंदुस्तानांतील पोर्तुगीज लोकांचा दुसरा गव्हरनर. हा १५१५ त गोव्यास मरण पावला. १५१४ त वास्को डि गामा पुन्हा हिंदुस्तानांत आला. ही त्याची तिसरी खेप. तो कोचीन येथें मरण पावला (१५२७). सोळाव्या शतकाच्या शेवटीं पोर्तुगीज लोकांकडे हिंदुस्तानाच्या पश्चिम किनाऱ्यावर गोवें? दमण आणि दिव; बंगाल्यांत हुगळी आणि चितागांग हीं होतीं. हल्लीं पहिलीं तीनच त्यांकडे आहेत.

**डच वसाहती.**–सोळाव्या शतकाच्या शेवटीं डच लोक हिंदु-स्तानाशीं व्यापार करूं लागले. त्यांनीं १६०२ या वर्षीं 'डच ईस्ट इंडिया कंपनी' या नांवाची मंडळी स्थापन केली. त्यांनीं १६१९ त जावा बेटांत बटेविया शहर वसविलें. सतराव्या शत-कांत डच लोकांचें वर्चस्व समुद्रावर फार होतें. त्यांनीं १६२३ त अंबोयना बेटांत इंग्लिशांची कत्तल केली. यामुळेंच इंग्लिश लोकांना हिंदुस्तानांत यावयाला फावलें. १६४७ त पालरनदीच्या कांठीं सद्रस ह्मणून शहर आहे तेथें ते व्यापार करीत होते. त्यांनीं हिंदुस्तानांत पहिली वखार मद्रासच्या किनाऱ्यावर पालालोलू येथें घातली. आणि १६६४ पर्यंत त्यांनीं मलबार किनाऱ्यावरील पोर्तुगीज लोकांचीं सर्व ठाणीं घेतलीं; व तेथें आणि कारोमांडेल किनाऱ्यावर आपल्या लहान लहान वसाहती केल्या. यांची राज-धानी बंगाल्यांत चिनसुरा येथें होती. या वेळीं इंग्लिश लोक यांना प्रतिस्पर्धी झाल्यामुळें त्यांच्या सत्तेचा ऱ्हास होत गेला.

**इंग्लिश वसाहती.**-इ० स० १५७९ त टॉमस् स्टिफन्स् या नांवाचा मनुष्य इंग्लंडांतून प्रथम हिंदुस्तानांत आला. १५७६ पासून हिंदुस्तानांत येण्याविषयीं पुष्कळ इंग्लिश धाडशी लोकांचे

प्रयत्न चालले होते; परंतु १५९६ त कार्निलिअस हाउटमन् यानें हिंदुस्तानाचा मार्ग शोधून काढला. हे लोक प्रथम व्यापाराकरितां ह्मणून इकडे आले. त्या वेळीं इलिझाबेथ ही इंग्लंडची राणी होती. १६०० त इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. तिला व्यापार करण्यास अधिकार मिळावा ह्मणून इलिझाबेथ राणीनें सर जॉन मिलडेन याच्या हातीं अकबर बादशहाला विनंतिपत्र पाठविलें. यानंतर १७०९ पर्यंत निरनिराळया ईस्ट इंडिया कंपन्या झाल्या.

इ० स० १६११ त इंग्लिशांनीं खंबायत येथें पोर्तुगीज लोकांशीं लढून व्यापाराचें ठाणें घातलें. १६१५ त सर टॉमस रो हा इंग्लंडच्या वतीनें जहांगिर बादशहाच्या दरबारीं वकील होऊन आला. त्यानें बादशहापासून व्यापाराला अनुकूळ अशा पुष्कळ गोष्टी संपादिल्या.

१६२३ त अंबोयना येथें डच लोकांनीं इंग्लिशांची कत्तल केली, त्यामुळें असें झालें कीं, इंग्लिश लोक मसाल्याचीं बेटें सोडून हिंदुस्तानाकडे आले. ते प्रथम मद्रास किनाऱ्यावर आले. तेथें त्यांनीं १६१० त मच्छलीपट्टणास एक अडतीचें दुकान घातलें. १६२६ त नेलोर जिल्ह्यांतील आरमागांव येथें व १६३२ त गोवळकोंडा येथें वखारी बांधिल्या. आणि १६३९ त विजयानगरचा राजा रामराजा याच्या भावाच्या वंशजाकडून त्यांना मद्रास शहर मिळालें. तेथें त्यांनीं फोर्ट सेन्ट् जॉर्ज् हा किल्ला बांधिला. याप्रमाणें मद्रासेकडे इंग्लिशांनीं ठाणीं घातलीं.

मुंबई इलाख्यांत इंग्लिशांनीं जीं ठाणीं घातलीं त्यांत सुरत, गोआ, अमदाबाद, खंबायत आणि मुंबई हीं होत. १६१९ त त्यांनीं सुरतेस वखार घातली. मुंबई बेट १६६१ या वर्षी पोर्तुगालच्या राजानें इंग्लंडच्या राजाला आंदण दिलें होतें; परंतु १६६३ त शिवाजीनें जेव्हां सुरत शहर लुटलें, तेव्हां पुढें मराठ्यांपासून आपणांस त्रास होईल या भीतीनें १६८८ त सुरत शहर सोडून कंपनीनें मुंबई बेट हें व्यापाराचें मुख्य स्थान केलें.

**बंगाल्यांतील कंपनीचीं ठाणीं.**—ओढया प्रांतांत पिप्ली, हुबळी, बलसार या ठिकाणीं इंग्लिशांनीं वखारी बांधल्या. पुढें १६४५ त त्यांनीं शहाजहान बादशहापासून व्यापाराला अनुकूळ अशा पुष्कळ गोष्टी संपादिल्या. काशिबाजार, पाटणा, बलासोर, माल्डा

आणि ढाका येथें लहान लहान वखारी घातल्या, आणि १७०० त औरंगजेबाचा मुलगा अजीम याजपासून सुटानाटी, कलिकत आणि गोविंदपूर हीं संपादिलीं.

**फ्रेंचांच्या वसाहती.**—फ्रेंचांनीं प्रथम इ० स० १६०४ या वर्षीं हिंदुस्तानावर स्वारी केली. परंतु पुढें त्यांनीं फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापिली. १६७४ त फ्रेंच गव्हरनर मार्टिन् यानें विजापुरच्या राजापासून पांडिचरी विकत घेतली. १६८८ त औरंगजेब बादशहाकडून त्यांस कलकत्त्याजवळचें चंद्रनगर शहर मिळालें. यांशिवाय कारिकल, माही वगैरे ठिकाणें त्यांस मिळालीं. १७४१ त डुप्ली याला हिंदुस्तानांत फ्रेंचांचा गव्हरनर जनरल नेमिलें. त्यानें लागलीच इंग्लिशांना हिंदुस्तानांतून हांकून लावण्याचे बेत चालविले. त्याच वेळीं युरोपांत फ्रेंचांची व इंग्लिशांची लढाई चालू झाल्यामुळें त्याला या कृत्यास इकडे आयतीच संधि मिळाली. आणि करनाटकांत लढाई सुरू झाली.

---

## भाग ३.

## करनाटकांतील लढायांपासून वारन हेस्टिंग्स् गव्हरनर जनरल होऊन येईपर्यंतची ब्रिटिश राज्याची हकीकत.

इ० स० १७४६ त फ्रेंचलोकांनीं लाबरडोनस ह्याच्या हाताखालीं कारोमांडेल किनाऱ्यावर कांहीं लढाऊ जहाजें पाठविलीं. तेव्हां फ्रेंच लोकांना लढाई करावी न लागतां, त्यांना मद्रास शहर मिळालें. तेव्हां अरकाटचा नबाब अनुवरुद्दीन यानें फ्रेंचांस मद्रासेहून हांकून देण्याची खटपट चालविली; परंतु तींत त्याचा पराभव झाला. १७४८ त इंग्लिश व फ्रेंच यांचेमध्यें तह झाला, त्याच वर्षीं निजाम उल्मुलुख मरण पावला. तेव्हां हैदराबादच्या गादींविषयीं त्याचे दोन मुलगे मुजफरजंग आणि नासिरजंग यांच्यांत तंटे लागले. मुजफरजंगानें साताऱ्याला जाऊन मराठ्यांची मदत मागितली. तेथें करनाटकाचा पूर्वींचा नबाब दोस्तअली याचा जांवई चंदासाहेब हा मराठ्यांच्या अटकेंत होता; तो आपण करनाटकाच्या गादीचा वास्तविक वारस आहें असें म्हणत असे.

त्याच्याशीं मुजफरजंगानें स्नेह जोडला. फ्रेंचांनी मुजफरजंग आणि चंदासाहेब यांचा पक्ष उचलला. या वेळीं डुप्ली याला आपला हेतु सिद्धीस नेण्यास आयतेंच फावलें. तो एखादी धाडसाची कल्पना काढणारा असल्यामुळें त्याचें वजनही फार वाढलें होतें. डुप्ली यानें चंदासाहेबाला मराठ्यांस पैसे देऊन त्यांच्या अटकेंतून सोडविलें. आणि मुजफरजंग व चंदासाहेब यांचीं सैन्यें मदतीस घेऊन अंबुर येथील मोठ्या लढाईत अनुवरुद्दीन याला ठार मारिलें. तेव्हां मुजफरजंगाला कांहीं दिवस हैदराबादची सुभेदारी मिळाली, व चंदासाहेब हा करनाटकचा नबाब झाला. पण पुढें लवकरच अनुवरुद्दीनाचा मुलगा महंमदअल्ली हा चंदासाहेबाला शत्रु उत्पन्न झाला. महंमदअल्लीस इंग्लिशांची मदत मिळून इंग्लिश व फ्रेंच यांची करनाटकांत पहिली लढाई सुरू झाली; या लढाईत फ्रेंचांचा सरदार बुशी यानें मोठा पराक्रम करून करनाटकांतील जिंजीचा किल्ला घेतला (१७५०). तसेंच डुप्ली यानें इंग्लिशांचा पराभव करून जयस्तंभ उभारिला व तेथें आपल्या नांवाचें शहर वसविलें. याप्रमाणें इंग्लिशांची वाईट स्थिति असतां, क्लाइव्ह या नांवाचा कोणी एक लोकोत्तर पुरुष समरांगणांत आला. त्यानें प्रथम पांडेचरीला वेढा घालून देवीकोटचा किल्ला घेतला ( १७४८ ) आणि चंदासाहेबाची राजधानी अर्काट हिला वेढा घातला, त्यांतच चंदासाहेबाचा मुलगा राजासाहेब याचा अगदीं पराभव झाला. अर्कीटच्या वेढ्यामुळें इंग्लिशांचें वर्चस्व पूर्णपणें स्थापित झालें. नंतर क्लाइव्ह याला एकामागून एक जय मिळूं लागले. त्यानें डुप्लीचा जयस्तंभ व शहर हीं उध्वस्त केलीं. त्रिचनापल्लीजवळ श्रीरंगम् येथें फ्रेंचांचें सैन्य आपण होऊन क्लाइवसाहेबाच्या स्वाधीन झालें. नंतर इंग्लिश व फ्रेंच यांचा तह झाला. इंग्लिशांचा सहाय महमदअल्ली याला करनाटकाचा नबाब केलें. हा तह १७५७ पर्यंत टिकला. याच वेळीं क्लाइव्ह याला मद्रासचा गव्हरनर केलें; परंतु त्याला लागलेंच बंगल्यांत जावें लागलें. तेव्हां इकडे करनाटकांत इंग्लिश व फ्रेंच यांची वांदिवाश येथें मोठी लढाई झाली ( १७६० ). इंग्लिशांचा सेनापति करनल ऐरकूट, व फ्रेंचांचे लाली व बुशी हे होते. या लढाईत फ्रेंचांचा समूळ नाश होऊन हिंदुस्तानांत राज्यस्थापन करण्याचा जो त्यांचा उद्देश त्याला मोठा धक्का बसला. बुशीला कैद केलें. पुढें थोडे दिवसांत ऐरकूट यानें फ्रेंचांचीं सर्व ठाणीं घेतलीं. १७६१ त पांडेचरी स्वतः हस्तगत झाली, आणि लालीला

कैद करून मद्रासेस पाठविलें. याप्रमाणें इंग्लिशांचा करनाटकांत अंमल बसला.

**बंगाल्यांत इंग्लिशांची सत्ता.**–महमदशाहा दिल्लीचा बादशहा असतां अलिवर्दीखान हा बंगाल, बहार व ओरिसा ह्या प्रांतांचा स्वतंत्र सुभेदार झाला. १७५६ त अलिवर्दीखान मेला. तेव्हां त्याचा नातू सुराजउद्दवला हा गादीवर बसला. हा फार क्रूर स्वभावाचा व विषयासक्त होता असें सांगतात. त्यानें कांहीं अंतस्थ करणावरून इंलिश लोकांची काशिमबाझार येथील वखार लुटली, आणि कलकत्त्यावर हल्ला केला. तेथें जे इंग्लिश लोक सांपडले त्यांपैकीं १४६ लोकांस त्यानें एका अंधार कोठडींत कोंडून ठेविल्यामुळें त्यांतील बहुतेक मेले. तेव्हां क्लाइव्ह हा लागलीच बंगाल्यांत गेला. नंतर इंग्लिश व नबाब यांची १७५७ त प्लासी येथें मोठी ध्यानांत ठेवण्यासारखी लढाई झाली. या लढाईचें एक कारण असें झालें कीं, क्लाइव्ह यानें फ्रेंचांचें चंद्रनगर घेतलें. हें पाहून सुराजउद्दवल्याला अतिशय राग येऊन तो फ्रेंचांस मिळाला. इकडे क्लाइव्ह यानें त्याच्या गादीवर मीरजाफर याला बसविण्याचा घाट घातला. प्लासीच्या लढाईंत सुराजउद्दवल्याचा मोड झाल्यावर त्याच्या गादीवर मीरजाफर याला बसविलें. त्याबद्दल मीरजाफरानें इंग्लिशांस २४ परगण्यांची जमीनदारी दिली. १७५८ त क्लाइव्ह याला बंगालचा पहिला गव्हरनर नेमिलें. १७६० त क्लाइव्ह इंग्लंडास गेला. तो तिकडे पांच वर्षे होता. ह्यादरम्यान मीरजाफराच्या कारकीर्दींत कांहीं अव्यवस्था झाल्यामुळें, त्याचा जांवई मीरकासीम याला गादीवर बसविलें. त्याच्याकडून इंग्लिशांस बरद्वान, चितागांग आणि मिदनापूर हे प्रांत मिळाले. परंतु १७६३ त मीरकासीम यानें स्वतंत्र होण्यासाठीं बंड करून पाटणा येथें इंग्लिशांची कत्तल केली, तेव्हां इंग्लिशानीं १७६४ त घेरिया आणि उधनाला या ठिकाणीं त्याचा पराभव केला. पुढें तो अयोध्येच्या नबाबाला जाऊन मिळाला. तेव्हां इंग्लिशांनीं त्याचाही बक्सारच्या लढाईंत पूर्णपणें पराभव केला. १७६५ त क्लाइव्ह दुसऱ्यानें गव्हरनर होऊन कलकत्त्यास परत आला. त्या वेळीं त्यानें शाहाआलम बादशहापासून बंगाल, बहार व ओढ्या ह्या प्रांतांचा दिवाणी अधिकार व कारोमांडेल किनाऱ्यावरील उत्तरसरकार या प्रांतावर राज्यकरण्याचा अधिकार हे संपादिले. याप्रमाणें क्लाइव्ह यानें बंगाल्यांत

व मद्रासेंत इंग्लिश राज्याचा पाया घालून त्याची अभिवृद्धि केली. १७६७ त क्लाइव्ह साहेब इंग्लंडास परत गेला. १७६७-१७७२ पर्यंत हॅरी व्हेरलेस्ट व जॉन कार्टियर हे बंगालचे गव्हरनर होते. १७७२ त वॉरन हेस्तिंग्स् [ जो पूर्वी कलकत्ता येथील काउन्सिलांतील एक सभासद होता ] हा बंगालचा गव्हरनर झाला. ह्या पांच वर्षांत सांगण्यासारखी कांहीं गोष्ट झाली नाहीं.

---

# भाग ६.

## हिंदुस्तानचा राज्यकारभार चालविण्यासाठीं पाठविलेले इंग्लिश गव्हरनर जनरल–यांच्या कारकीर्दींत घडलेल्या मुख्य व महत्त्वाच्या गोष्टी.

### ( १ ) वॉरन हेस्टिंग्स्. १७७४-१७८५.

हा इ० स० १७७२ त बंगालचा गव्हरनर झाला. १७७३ त रेग्युलेटिंग आक्ट पास झाला; या अन्वयें बंगालच्या गव्हरनरास 'गव्हरनर जनरल्' असा किताब मिळावा, व त्याचा अंमल मुंबई, मद्रास वगैरे ठिकाणच्या गव्हरनरांवर असावा; त्यास चार कौंसिलदारां ( मंत्र्यां ) नीं मदत करावी; कलकत्ता येथें न्यायसभा स्थापावी; आणि कौंसिलदार व इतर कामगार यांनी नेटिवांपासून बक्षिसादाखल देणगी वगैरे घेऊं नये; असें ठरलें. ह्या कायद्याअन्वयें हा इ० स० १७७४ त गव्हरनर जनरल झाला. त्यानें राज्यकारभार मोठ्या दक्षतेनें चालविला असेल, परंतु नेटिवांचें यत्किंचित्‌ही हित त्यानें केलें नाहीं. पैसा शिल्लक पाडण्याकरितां त्यानें अलाहाबाद व कोरा हे प्रांत अयोध्येच्या नबाबाला विकले. त्यानें रोहिले लोकांस रोहिलखंडांतून घालवून देण्यासाठीं अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला यास मदत केली. अयोध्येच्या बेगमांपासून त्यानें बलात्कारानें ७६ लक्ष रुपये काढले. याबद्दल त्याच्यावर मोठा दोष आला होता. मीरजाफराच्या मुलाच्या रक्षणासाठीं मीरजाफराच्या बायकोची नेमणूक झाली; त्यांत वॉरन हेस्तिंग्स् यानें तिजपासून पुष्कळ पैसा घेतला अशी नंदकुमार यानें फिर्याद केली. त्या फिर्यादीची चवकशी चालली असतां, नंद-

कुमार यानें पुष्कळ वर्षांपूर्वी खोट्या सहीचा कागद बनविला होता; या अपराधाबद्दल त्यास फांशीं दिलें. काशीचा राजा चेतसिंग हा इंग्लिशांस साडेसव्वीस लक्ष रुपये खंडणी देत असे. लढायांच्या खर्चाकरितां वॉरन हेस्तिंग्स् त्याच्याजवळ अधिक पैसा, व सैन्याची मदत बळजोरीनें मागूं लागला. तीं तो देईना ह्मणून वारन हेस्तिंग्स् यानें काशीस जाऊन राजास कैद केलें. तेव्हां तेथें मोठें बंड होऊन वारन हेस्तिंग्स् यावर मोठें संकट गुजरलें, परंतु त्यांतून तो मोठ्या युक्तीनें पार पडला. याच्या कारकीर्दींत मराठ्यांशीं पहिलें युद्ध झालें. १७८० त अहमदाबाद, लाहोर, ग्वाल्हेर हीं शहरें घेतलीं. ह्मैसूरच्या हैदरानें मद्रासेवर स्वारी केली. पोर्टोनोव्हो, शोलिंगगड, पालिलोर, या ठिकाणीं लढाया झाल्या. १७८३ त फॉक्स साहेबाचें बिल पार्लमेंट सभेपुढें आलें परंतु तें पास झालें नाहीं. पुढें १७८४ त पीट साहेबाचें बिल आलें व त्यांत असें ठरलें कीं, कंपनीचा अधिकार कायम ठेवावा व त्यावर एक वरिष्ठ सभा नेमावी, तिचें नांव बोर्ड ऑफ कंट्रोल असें ठेवावें. या सभेंतील सभासद नेमण्याचा अधिकार कोर्ट ऑफ् डैरेक्टर्स यांच्यावर असावा. याप्रमाणें गोष्टी घडल्या.

## ( २ ) लॉर्ड कॉर्नवालीस. १७८५–१७९३.

त्रावणकोरच्या राजाबरोबर तह झाला. ह्मैसूरचें तिसरें युद्ध व तह. या युद्धांत हैदराचा मुलगा टिपु हा प्रमुख होता. महमदअलीच्या राज्यापैकीं कांहीं भाग घेतला. लॉर्ड कॉर्नवालीस यानें राज्य उत्तमप्रकारें चालविलें. आणि जमीनदारी, रयतवारी व कुळवारी अशा जमाबंदीच्या रीति चालू करून जमिनीचा कायमचा धारा ठरविला. जमीनदारी ह्मणजे एका मिरासदाराकडे कांहीं जमिनी लावून दिल्या असतात, त्यांच्या साऱ्याचें जोखीम त्याजवर असतें. रयतवारी ह्मणजे प्रत्येक जमिनीचा जो लागवड करणारा असतो, त्याच्या माथ्यावर साऱ्याचें जोखीम असतें. कुळवारी ह्मणजे एका खेड्याखालीं ज्या जमिनी मोडत असतील, त्यांच्या साऱ्याचें जोखीम तेथील रहिवाशांवर असतें. त्यानें मुलकी कामकाजाच्या रीतींत बरेच फेरफार केले. त्यानें प्रथम फौजदारीचा अधिकार साहेबलोकांच्या हातीं दिला. कलकत्ता येथें फौजदारी कामाकरितां सदर अदालत [ मुख्य कोर्ट ] स्थापिली. तसेच कलेक्टर आणि जज्ज यांचे अधिकार निरनिराळे केले.

## (३) सर जॉन शोअर. १७९३-१७९८.

याला लॉर्ड टेन्माऊथ असा किताब होता. पेशव्यांनीं निझामावर स्वारी करून त्याचा खर्डें मुक्कामीं पराभव केला. [ १७९५. ] अयोध्येचा नबाब असोफउद्दवला १७९७ त मरण पावला. नंतर त्याचा मुलगा मिरझाअली ज्यास बहुतकरून वजीरअली असें ह्मणत, तो गादीवर बसला, परंतु तो लोकांस आवडेना ह्मणून सर जॉन शोअर यानें त्याचा चुलता सादतअली यास गादीवर बसविलें.

## (४) मार्किस ऑफ् वेलस्ली ( लार्ड मॉर्निंग्टन्.)

### १७९८-१८०५.

निजामाशीं तह [ १७९८ ] करून त्याला अपल्या पक्षास घेऊन टिपूवर स्वारी केली. हेंच ह्मैसूरचें चवथें युद्ध. सिद्धेश्वर, मालवेली या ठिकाणीं टिपूचा पराभव होऊन श्रीरंगपट्टण इंग्लिशांनीं घेतलें. तेव्हां टिपू मारला गेला [ १७९९ ]. ह्मैसूरच्या पूर्वीच्या राजास गादीवर बसविलें, व त्या मुलखाची वहिवाट करण्याकरितां कर्नल वेलस्ली याला नेमिलें. त्यानें सबसिडियरी सिस्टिम ह्मणजे आपली फौज येथील राजांच्या संरक्षणासाठीं ह्मणून त्यांच्या राज्यांत ठेवून, तिचा खर्च त्यांपासून घेण्याची पद्धत चालू केली. टिपूबरोबर लढाई चालली असतां महमदअली यानें त्याच्याशीं वळणवळण ठेविलें ह्मणून इंग्लिश त्याचा मुलूख घेणार इतक्यांत महमदअली मरण पावला. परंतु त्याचा मुलगा ते प्रांत देईना ह्मणून अजीमउद्दवला यास गादीवर बसविलें व त्याजपासून अंगोलीपासून कन्याकुमारीपर्यंत मुलूख घेतला. वजीरअली यानें काशीस बंड करून चेरीसाहेब रेसिडेंट व दुसरे दोन साहेब यांस ठार मारिलें. पेशव्यांशीं वसई मुक्कामीं तह. मराठ्यांशीं दुसरें युद्ध. दिल्ली, लासवारी व आरगांव या ठिकाणीं लढाया. होळकराबरोबर लढाई शिंदे, भोंसले व भरतपुरचा राजा यांच्याशीं तह. याप्रमाणें गोष्टी झाल्या.

**लॉर्ड कॉर्नवालीस** १८०५ त पुनः हिंदुस्तानांत आला. याच्या मनांत देशांत स्वस्थता राखावयाची होती. परंतु तो काशीजवळ गाजीपूर येथें मरण पावला.

## (५) सर जॉर्ज बार्लो. १८०५-१८०७.

शिंदे व होळकर यांच्याशीं तह केला. याची तह करण्याची

पद्धत फार निराळी होती. त्यामुळें इंग्लिशांचें नुकसान होऊन, याची अप्रतिष्ठा झाली. वेलोरास बंड झालें. याच्या अंगीं काट-कसर करण्याचा गुण होता. पलटणींतील लोकांस तंबूचा वगैरे खर्च मिळत असे तो यानें बंद केल्यामुळें तो त्यांस आवडेनासा झाला. याचें व कमांडर-इन्-चिफ् यांचें वांकडें पडल्यामुळें मद्रासच्या मुख्य अधिकाऱ्यांत दुफळी झाली. त्यामुळें लोक नाखुष होऊन त्यांनीं मच्छलीपट्टणास बंड केलें. पुढें याची नेमणूक मद्रासच्या गव्हरनराच्या जाग्यावर झाली ( १८०७ ).

## ( ६ ) लॉर्ड मिंटो. १८०७-१८१३.

लॉर्ड मिंटो याचे मनांतून सर जॉर्ज बार्लोप्रमाणेंच स्वस्थता राखावी असें होतें, व त्याचप्रमाणें त्याला विलायत सरकारचा हुकूम होता. परंतु अमीरखानानें वराडच्या राजावर स्वारी केली तेव्हां त्याला त्या तंट्यांत पडावें लागलें. १८०७ त गुजराथेंतील बालहत्या बंद केली. त्रावणकोरास बंड. फ्रेंचांचीं मारिशस, बोरबोन व राडरिग्स ; व डच लोकांचें जावा हीं बेटें घेतलीं. रणजितसिंगाकडे मेटकाफ् साहेबास पाठवून त्याच्याशीं तह करविला. फ्रेंच व रशियन हे वायव्येकडून स्वारी करणार असें समजतांच १८०९ त एल्फिन्स्टन् साहेबास काबुलास, व सर जान मालकम याला इराणास पाठवून तह केला. हा विलायतेस गेल्यावर त्याला 'अर्ल' ही पदवी मिळाली, परंतु तो त्याच वर्षीं ( १८१३ ) मरण पावला.

## ( ७ ) मार्किस ऑफ् हेस्टिंग्स् ( अर्ल ऑफ् मोईरा. ) १८१४-१८२३.

नेपाळ देशाशीं लढाई. इंग्लिशांनीं आपल्या सैन्याचे चार भाग करून नेपाळावर पाठविले. कुलूंग, जैटक, रामगड, शिखर क्षेत्र, हरिहरपूर, इत्यादि ठिकाणीं लढाया झाल्या. नेपाळच्या राजाबरोबर तह केला. छटू, करीमखान व दोस्तमहंमद ह्या पेंढाऱ्यांनीं लुटालूट करण्यास आरंभ केला. त्यांचा १८१६ त लशिंग्टन् साहेबानें पराभव केला. मराठ्यांशीं शेवटचें युद्ध ( १८१७-१८१८. ) शिताबळडी, नागपूर, जबलपूर, महीदपूर, कोरेगांव व खडकी ह्या ठिकाणीं लढाया झाल्या. गायकवाडानें आपला वकील गंगाधर शास्त्री यास १८१४ त पेशव्यांच्या बाकीबद्दल बोलणें करण्याकरितां पुण्यास पाठविलें. त्याला बाजीरावानें त्रिंबकजी डेंगळ्या-

करून पंढरपुरास १८१५ त ठार मारविलें. इंग्लिशांनीं गायकवाडाच्या वतीनें त्रिंबकजीस कैद केलें. परंतु तो पळून गेला. १८१८ स इंग्लिशांनीं पेशव्याचें राज्य घेतलें, व त्यास प्रतिवर्षी ८ लक्ष रुपये नेमणूक करून देऊन ब्रह्मावर्तास नेऊन ठेविलें. याप्रमाणें गोष्टी झाल्या.

## ( ८ ) लॉर्ड आमहर्स्ट. १८२३-१८२८

ब्रह्मी लोकांशीं पहिलें युद्ध ( १८२४-२६ ). चितगांव व आराकान ह्यांजमधील शाहापुरी नांवाच्या ओसाड बेटावर इंग्लिशांनीं थोडथोडा काळे लोकांचा पाहरा ठेविला होता. त्या लोकांस ब्रह्मी लोकांनीं हांकून लाविलें व सोफाया जहाजावरील लोकांस भुलथापा देऊन धरून नेलें; ह्मणून इंग्लिशांनीं ब्रह्मी लोकांशीं लढाई सुरू केली. कर्नल् गारवीन यांनें मार्ताबान व तावाय; व कर्नल् मेल्स् यानें मुर्गुई आणि तेनासरीम हीं ब्रह्मी लोकांचीं बंदरें घेतलीं. प्रोम, किमांडीन, डोनाबू व पाघम ह्या ठिकाणीं लढाया झाल्या. ब्रह्मी लोकांचा सरदार महाबंधूला मरण पावला. इंग्लिशांचा व ब्रह्मी राजाचा यांडेबू येथें तह झाला. १८२५ त भरतपुरचा राजा मरण पावला. त्याचा अल्पवयी मुलगा बळवंतसिंग गादीवर बसला. परंतु त्याचा चुलता दुर्जनसाल यानें त्याला कैद करून आपण गादीवर बसला. दिल्लीचा रेसिडेंट आक्तरलोनी यानें त्याजवर सैन्य पाठविलें परंतु गव्हरनर जनरलानें तें परत बोलाविलें, ह्मणून रेसिडेन्टानें राजीनामा दिला. त्याच्या जागीं मेटकाफ साहेब येऊन त्यानें दुर्जनसालास कैद केलें व बळवंतसिंगास गादीवर बसवून बंडावा मोडून टाकिला. याप्रमाणें गोष्टी झाल्या.

## ( ९ ) लॉर्ड विलियम बेंटिक्. १८२८-१८३५.

इंग्लिशांनीं ह्मैसूरचा राज्यकारभार आपल्या हातीं घेऊन ( १८३० ) कुर्गचें राज्य घेतलें ( १८३३ ). १८२९ त सती जाण्याची चाल बंद करून ठगलोकांच्या दुष्ट धंद्याचा मोड केला. शिपाई लोकांस दुप्पट भत्ता मिळत असे तो बंद केला. लॉर्ड मेकॉले १८३५-४० पर्यंत हिंदुस्तानच्या कायदेकौन्सिलाचा सभासद होता. त्यानेंच एतद्देशीय लोकांस इंग्रजी शिकविण्याची पद्धत सुरू केली. त्यानेंच हल्लीं चालू असलेलें क्रिमिनल कोड ( फौजदारी कायदा ) केलें. हिंदुस्तान व इंग्लंड यांमध्यें वाफेचीं तारवें जाऊं येऊं लागलीं. राम मोहनराय विलायतेस गेले व तेथें ते

१८३३ त मरण पावले. रशियन लोकांविरुद्ध, व सिंधुनदावर इंग्लिशांनीं व्यापार करावा ह्मणून त्यांनीं, सिंधचा अमीर, भावलपूरचा राजा व रणजितसिंग यांच्याशीं तह केला. १८३४ त कंपनीस आणखी वीस वर्षांची सनद मिळाली. तींत कंपनीकडे राज्य करण्याचा मात्र अधिकार राहून सर्वांस हिंदुस्तान व चीन ह्या देशांशीं व्यापार करण्याची मोकळीक मिळाली. यानें आल्याबरोबर जमाबंदीची सुधारणा केली. माळव्याच्या अफूवर कर बसविला. दरसालच्या कायमच्या खर्चाची काटकसर वगैरे पुष्कळ सुधारणा केल्या.

**लॉर्ड मेटकाफ.**–यानें बेंटिंकच्या मागें ११ महिने अक्टिंग गव्हरनर जनरलचें काम केलें. तितक्या वेळांत त्यानें वर्तमानपत्रें व पुस्तकें छापण्यास प्रतिबंध नसावा असा ठराव केला. त्यामुळें त्याची फार कीर्ति झाली.

## ( १० ) लॉर्ड आकलंद. १८३६-१८४२.

दोस्तमहंमद याजबरोबर तह करण्याकरितां अलेक्झांडर बरन्स यास १८३७ त अफगाणिस्तानांत पाठविलें; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. इराणच्या शहानें हिरात शहरावर हल्ला केला, परंतु एलड्रेड पातिजर साहेबाच्या मदतीनें हिराती लोकांनीं त्या शहराचें रक्षण केलें. शहासुजा ह्यास गादीवर बसविण्याकरितां लॉर्ड आकलंद यानें रणजितसिंग व शहासुजा यांच्याशीं १८३८ त तह केला. अफगाणिस्तानावर स्वारी. शहासुजास कंदाहार येथें गादीवर बसविलें. रणजितसिंग १८३९ त मरण पावला. गिजनी, खिलात व काबूल हीं शहरें घेतलीं. परवानची लढाई १८४०. दोस्तमहंमद इंग्लिशांच्या स्वाधीन झाला. त्याचा मुलगा अकबरखान याजबरोबर तह केला. अलेक्झांडर बरन्स व कांहीं कामदार काबुलास मारले गेले. १८४१ त अकबरखानानें मेकनातन् साहेबास गोळी घालून ठार मारिलें. ह्या स्वारीपैकीं डॉक्टर ब्रायडन् शिवाय कोणीही परत आला नाहीं. चीन देशाशीं पहिली लढाई (१८४०-४२.) सर ह्यु गो यानें चिनावर स्वारी केली. त्यांत हांगकांग बेट इंग्लिशांस मिळून दुसऱ्या चार बंदरांत व्यापार करण्याची मोकळीक मिळाली (१८४२.) याप्रमाणें गोष्टी घडल्या.

## ( ११ ) लॉर्ड एलिंबरो. १८४२-१८४४.

गिजनीचा गव्हरनर शमसुद्दीन याचा पराभव झाला. अकबर

खानानें इंग्लिश बंदिवान सोडून दिले. अफगाणिस्तानच्या लढाईचा शेवट होऊन सैन्य परत आलें. सिंधच्या अमीराबरोबर लढाई सुरू झाली. मियानी व हैदराबाद या ठिकाणीं अमीराचा पराभव झाला. अमीरास पेनशन देऊन काशीस ठेविलें; व सिंधदेश खालसा केला ( १८४३ ). सर चार्लस नेपियर याला तेथें कमिशनर नेमिलें. जनकोजी शिंदा १८४३ त मरण पावला. मामासाहेबास शिंद्याच्या दरबारीं कारभारी नेमिलें. परंतु त्याचें व राणीचें वैमनस्य पडल्यामुळें तिनें त्यास काढून दादा खासगीवाले याला कारभारी नेमिलें. महाराजपूर व पन्यार या ठिकाणीं शिंद्याचा पराभव. शिंद्याशीं तह. याप्रमाणें गोष्टी झाल्या.

## ( १२ ) लॉर्ड हार्डिंग. १८४४-१८४८.

ह्यानें येथील रानटी लोकांत बालहत्या, मनुष्यांचे बळी वगैरे देण्याचें बंद केलें. रणजितसिंगाचा पुत्र धुलिपसिंग हा १८४५ त गादीवर बसला. शीक लोकांनीं इंग्लिशांच्या मुलखावर हल्ला केला. तारीख १८ डिसेंबर १८४५ रोजीं मुडकी येथें लढाई झाली. तींत सर रॉबर्ट सेल मारला गेला. फेरोजशहा, अलिवाल, सोब्रान येथें लढाया झाल्या. शीक लोकांस जिंकिलें. लाहोर इंग्लिशांस मिळालें. महाराजाच्या आईनें तह करण्याकरितां गुलाबसिंगास पाठविलें. शीक लोकांबरोबर तह झाला. हा तह करण्याच्या कामांत गुलाबसिंगानें मदत केली ह्मणून इंग्लिशांनीं त्याला बराच मुलूख दिला. इत्यादि गोष्टी घडल्या.

## ( १३ ) लॉर्ड दलहौसी. १८४८-१८५६.

शीक लोकांबरोबर पुनः लढाई सुरू झाली. मूळराजास पदच्युत करून त्याच्या जागीं इंग्लिशांनीं खानसिंगास बसविलें. व्हान्स् ॲग्न्यु व अंडरसन् ह्यांस मुलतानास ईदगा किल्ल्यांत ठार मारिलें. सदुसम, रामनगर, चिलियनवाला व गुजराथ येथें लढाया झाल्या. १८४९ त इंग्लिशांनीं मुलतान घेतलें, पंजाब प्रांत स्वाधीन झाला. ब्रह्मी लोकांशीं दुसरें युद्ध. १८५२ त मार्ताबान, रंगून, बेसीन व पेगू हीं ठिकाणें इंग्लिशांनीं घेतलीं. ब्रह्मदेशच्या राजानें आपल्या भावास पदच्युत करून आपण गादीवर बसला. ब्रह्मी लोकांनीं तह केला. निजामाबरोबर तह होऊन वराडचे चार प्रांत इंग्लिशांस मिळाले. नागपूरचा राजा मरण पावला त्यास पुत्रसंतान नव्हतें ह्मणून तें राज्य १८५४ त इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत

घेतलें. सांताळ लोकांस बंगाल्यांतील व्यापारी लोकांनीं फार छळिलें व इंग्लिश लोक गोहत्या करितात हें पाहून ते आपणांस बाटवितील म्हणून त्यांनीं बंड केलें. अयोध्येचें राज्य १८५६ त खालसा केलें. विद्यावृद्धीला पुष्कळ उत्तेजन दिलें. लोखंडी रस्ते व तारायंत्रें सुरू झालीं. कंपनीस १८५३ त नवीन सनद मिळाली. त्याप्रमाणें कांहीं डेरेक्टर्स कमी झाले. त्यांतून कांहीं राणीनें नेमावे असें ठरलें. सर्व हिंदुस्तानाकरितां एक कायदे करणारी मंडळी नेमिली. ज्या उमेदवारांची परीक्षा उतरेल त्यांस मुलकी खात्यांत किंवा वैद्यकी खात्यांत नोकरी द्यावी असें ठरलें. याप्रमाणें गोष्टी घडल्या.

## ( १४ ) लॉर्ड क्यानिंग. १८५६-१८६२.

इराण देशाशीं लढाई. तींत इराणी लोकांचा पराभव होऊन, त्यांनीं इंग्लिशांशीं तह केला. त्यांत त्यांनीं हिरात व अफगाणिस्तान यांवरील आपले हक्क सोडले. चिनावर स्वारी. चिनी लोकांचा पराभव. चीनच्या बादशहानें इंग्लिशांशीं तह केला, त्यांत त्यानें युरोपांतील मुख्य मुख्य राष्ट्रांना व्यापाराच्या संबंधानें मोकळीक दिली. १८५७ त बंगाल प्रांतांत शिपाई लोकांचें बंड झालें. त्यांत नानासाहेब पेशवा मुख्य होता. बंडवाल्यांनीं इंग्लिश लोकांच्या बायका मुलांची मोठ्या क्रूरपणानें कत्तल केली. त्यांचा कानपुरास पराभव. तात्या टोपे याला धरून फांशीं दिलें. महाराणीनें हिंदुस्तानचें राज्य कंपनीकडून आपल्या ताब्यांत घेतलें (१८५८). महाराणीचा जाहिरनामा.

## ( १५ ) लॉर्ड एलजीन. १८६२-१८६३.

हा आल्यानंतर लवकरच मरण पावला. यानें वीस महिने काम केलें.

## ( १६ ) सर जॉन लॉरेन्स. १८६४-१८६८.

भूतानच्या राजाशीं तह. मुंबईच्या शेरबाजारांत हजारो व्यापाऱ्यांचीं व लोकांचीं दिवाळीं निघालीं. ओरिसा प्रांतांत दुष्काळ पडून पुष्कळ लोक मरण पावले. वाघर लोकांचें बंड.

## ( १७ ) लॉर्ड मेयो. १८६९-१८७२.

यास शेरअली नांवाच्या मुसलमान कैद्यानें अंदमान बेटांत १८७२ च्या फेब्रुआरी महिन्यांत ठार मारिलें.

## ( १८ ) लॉर्ड नार्थब्रूक. १८७२-१८७६.

मल्हारराव गायकवाड यांनीं रेसिडेंटास विष घातलें अशा आरोपावरून सरकार तर्फे कमिशन बसवून त्यांची चौकशी केली. चौकशीअंतीं ते निर्दोषी ठरले. तथापि त्यांच्या दुर्वर्तनावरून ते राज्य चालविण्यास अयोग्य असें ठरवून त्यांस मद्रासेंत कैदेंत ठेविलें. त्यांच्या जागीं सयाजीराव यांस बसविलें. १८७५ त महाराणीचे वडील पुत्र प्रिन्स ऑफ वेल्स हे हिंदुस्तानांत आले. त्यांच्या आगतस्वागताकरितां ठिकठिकाणीं बडे दरबार झाले.

## ( १९ ) लॉर्ड लिटन्. १८७६-१८८०.

ह्यांच्या कारकीर्दीत दिल्लीस बडा दरबार झाला. राणीसरकारानें ता. १ जानेवारी १८७७ रोजीं 'हिंदुस्तानची बादशाहीण' असा किताब धारण केला. दक्षिणेंत मोठा भयंकर दुष्काळ पडला. त्या वेळेस सरकारानें लोकांच्या प्राणसंरक्षणार्थ अनेक सार्वजनिक कामें सुरू केलीं. परंतु वेळेवर जशी मदत व्हावी, तशी न झाल्यामुळें लाखों मनुष्यें मरण पावलीं. अफगाणिस्तानावर इंग्लिशांनीं स्वारी केली. तींत हजारों मनुष्यांच्या जिवांची हानि होऊन त्यांच्या इच्छेप्रमाणें फळप्राप्ति न होतां हिंदुस्तानच्या गरीब रयतेवर धनाचा बोजा मात्र पडला. पुणें वगैरे प्रांतांत वासुदेव बळवंत फडके यानें दंगा केला. त्याला इंग्लिशांनीं पकडून काळ्या पाण्याची शिक्षा दिली. लायसेन्स टॅक्स आणि वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य नष्ट करण्याचा कायदा हे अमलांत आले. याप्रमाणें यांच्या कारकीर्दीत गोष्टी झाल्या.

## ( २० ) लॉर्ड रिपन्. १८८०-१८८४ डिसेंबर.

हे साहेब हिंदुस्तानांत आल्याबरोबर त्यांनीं अफगाणिस्तानची लढाई बंद केली. विलायती कापडावरील जकात कमी केली. त्यांचें लक्ष एकसारखें लोककल्याणाकडे लागलेलें असे. ते सुशील व शांत स्वभावाचे आहेत. त्यांनीं वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य नष्ट करणारा कायदा काढून टाकून त्यांस पूर्ण स्वातंत्र्य दिलें. देशीकारागिरीस उत्तेजन देण्यासाठीं सरकारी ऑफिसें व कारखाने यांत देशी जिनसा वापरण्याविषयीं ठराव केले. हिंदुस्तान देशाचें हित व्हावें, व लोकांचीं मनें राज्यकारभाराकडे लागावीं, ह्मणून स्थानिक स्वराज्याविषयीं नियम ठरवून ते कित्येक प्रांतांत अमलांतही आणिले. इजिप्तच्या लढाईंत विलायतीं सैन्याच्या मदतीस काळी फौज

पाठविली, व त्या यानें मोठा पराक्रम करून जय मिळविला. अन्याय व पक्षपात न व्हावा ह्मणून हे फार झटत असत. यांच्या हातून अनेक लोककल्याणाचीं कामें झालीं, ह्मणून ते लोकप्रिय झाले. नेटिवांस युरोपियन लोकांचा न्याय करण्याचा अधिकार असावा, ह्मणून इलबर्ट साहेबांचें बिल सभेपुढें आलें. त्यामुळें युरोपियन लोकांत पुष्कळ गवगवा होऊन, त्यांतील कांहीं हलकट लोकांनीं त्यांचा उपहासही केला. परंतु त्यांची निष्कलंक कीर्ति वृद्धिंगतच होत गेली. ह्या लोकप्रिय साहेबांस स्वदेशीं परत जातांना ठिकठिकाणीं व मुख्यत्वेंकरून मुंबईस मानपत्रें मिळून त्यांचा अप्रतिम गौरव झाला; तसा आजपर्यंत दुसऱ्या कोणत्याही गव्हर्नर जनरलचा झाला नाहीं.

## ( २१ ) लॉर्ड डफरिन. १८८४ डिसेंबर–१८८८ डिसेंबर.

यांचे कारकीर्दीत ठळक व ध्यानांत ठेवण्याजोग्या गोष्टी घडल्या त्याः—ब्रह्मदेश खालसा केला ( १८८६ ) व हिंदुस्तानाला जोडला. सर्व हिंदुस्तानभर इन्कमटॉक्स ( प्राप्तीवरील कर ) बसविला ( १८८६ ). मिठावर जास्त कर वाढविला ( १८८८ ); जातां जातां लोकांच्या शिक्षणाच्या संबंधानें खर्च कमी करून सरकार त्यांतून आपलें अंग हळूहळू काढून घेणार अशाबद्दल विचार चालू केला; ह्यामुळें एकंदर शिक्षणाला धक्का बसेल कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. ह्या साहेबांचे कारकीर्दींत एका मोठ्या महात्त्वाचे व राष्ट्रीय कामास सुरवात झाली आहे, तें हें कीं, ह्यांचे पत्नीनें हिंदुस्तानांतील स्त्रियांस औषधांची चांगली मदत व्हावी याकरितां स्त्रियाच डॉक्टर असणें फार अगत्याचें आहे असें मनांत आणून स्त्रियांस वैद्यकशास्त्र शिकविण्याकरितां हिंदुस्तानांत एक मोठा फंड उभारून निरनिराळ्या ठिकाणीं त्याच्या शाखा काढल्या आहेत, व शिक्षणाची तजवीज हळूहळू चालविली आहे. याचें फळ मिळण्यास व मूळचा स्तुत्य हेतु सिद्धीस जाण्यास पुष्कळ अवधि लागेल हें खरें, पण उद्देश खरोखर प्रशंसनीय असून कार्य फार महात्त्वाचें आहे. आल्यादिवसापासून ह्यांची पत्नी या उदार कामाकरितां झटत होती. हे साहेब राज्यकारस्थानांत वाकबगार होते असें त्यांच्या कारकीर्दीवरून दिसतें.

## ( २२ ) लॉर्ड ल्यान्स्डौन्.

ह्यांची कारकीर्द डिसेंबर ता० १० सन १८८८ पासून सुरू झाली. हे उदार मनाचे पुरुष आहेत अशाबद्दल पुष्कळ बोलवा आहे.

---

# भाग ७.

## हिंदुस्तानाची सध्यांची स्थिति.

एथपर्यंत जो इतिहास दिला आहे तो राज्यांतील घडामोडीचा झाला. ह्मणजे हिंदुस्तानांत कोणकोणतीं राज्यें झालीं, राजे कोणकोण झाले, त्यांनीं कोणकोणते प्रांत कसकसे काबीज केले, त्यांनीं कोठकोठें लढाया केल्या वगैरेचें वर्णन झालें; आतां या भागांत हल्लीं लोकांची स्थिति कशी आहे, रीतिभातींत किती फरक झाला आहे वगैरे पाहूं. सुज्ञ व विद्वान् लोकांनीं जगाच्या आजपर्यंतच्या इतिहासावरून असा नियम काढून ठेविला आहे कीं, जसजसा काळ बदलत जातो तसतसा लोकांच्या स्थितींतही फरक पडलाच पाहिजे. हिंदुस्तानावर मुसलमान लोकांनीं स्वाऱ्या करावयास आरंभ करण्याच्या अगोदर धर्माच्या संबंधानें, रीतिभातीच्या संबंधानें, राज्याधिकाराच्या संबंधानें वगैरे हरएक गोष्टींत जी आपली स्थिति होती, ती मुसलमान लोक राज्य करूं लागल्यापासून पुष्कळ बदलली. प्रथम प्रथम जेव्हां मुसलमान लोक स्वाऱ्या करून अतोनात लूट आपल्या देशांत नेत असत तेव्हां तर हिंदुस्तानाचें फार नुकसान झालें. द्रव्याच्या बाजूनेंच आपलें नुकसान झालें असें नाहीं, तर आपले पूर्वींचे उत्तम उत्तम ग्रंथ होते ते त्यांनीं स्वतः भिन्न धर्माचे ह्मणून नष्ट केले. मुसलमान लोक आल्यापासून आपल्या समाजाची स्थिति वाईट होत चालली. देशांत दंगेधोपे असल्यामुळें लोकांना सुशिक्षितपणा मुळींच नव्हता. राज्यकर्ते ते ह्मणून त्यांच्या संगतीनें त्यांच्या रीतिभाती कांहीं अंशीं आपल्यांत मिसळल्या. परंतु पुढें मराठी राज्य स्थापन करणारे जे शिवाजी महाराज यांनीं मुसलमानांचा बराच विध्वंस करून कांहीं अंशीं देशाला शांतता आणिली, हिंदुधर्माचें संरक्षण केलें, व परकीय लोकांच्या जुलमापासून सोडविलें. परंतु ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं. इंग्लिशलोक हिंदुस्तानांत व्यापाराकरितां ह्मणून प्रथम आले, परंतु त्यांनीं हळूहळू सर्वांना युक्तिप्रयुक्तीनें जिंकून सर्व हिंदुस्तानभर आपली सत्ता बसविली. इंग्लिशराज्याखालीं आपण राहिल्यापा-

सून आपल्या रीतिभातींत, विचारांत, धर्माचे बाबतींत, सारांश, सामाजिक गोष्टींत पुष्कळच तफावत दिसून येत आहे. आपला देश इतका अवाढव्य आहे कीं, तो एकछत्री अमलाखालीं आजपर्यंत नव्हता, परंतु सुदैवानें तो हल्लीं इंग्लिश अमलाखालीं आला आहे, व कांहीं दिवसांनीं 'एक राष्ट्र' बनेल अशी उमेद आहे. सर्व देशाला कायदेकानु एकच असल्यामुळें निरनिराळ्या प्रांतांचें परस्परांत ज्यास्त ज्यास्त दळणवळण पडत चाललें आहे. राज्यकर्त्यांची भाषा इंग्लिश तीच सर्व लोक शिकत असल्यामुळें, जरी या देशांत हजारों जाती व शेंकडों धर्म आहेत तरी, सर्व धर्मांचे, सर्व जातींचे, व निरनिराळ्या प्रांतांतले लोक राजकीय गोष्टींचा विचार करण्यासाठीं एके ठिकाणीं आतां जमतात. त्यामुळें पूर्वींच्या रीतिभातींत, आचारविचारांत तफावत पडणें साहजिक आहे. इंग्लिशराज्य झाल्यापासून प्रजेला जीवित आणि मालमत्ता यांचा सुरक्षितपणा पुष्कळच मिळाला आहे. इंग्लिशांनीं आपणांस उत्तम प्रतीचें शिक्षण आजपर्यंत दिलें व पुढेही देतील अशी आशा आहे. या शिक्षणापासून आपले केवढे फायदे झाले आहेत व होण्याचा संभव आहे हें सांगण्याची मुळींच गरज नाहीं. याबद्दल हा देश त्यांचा अतिशय ऋणी आहे. इंग्लिश शिक्षणानें आपल्या लोकांत धर्मव्यवस्थेच्या संबंधानें ( सामाजिक स्थितीच्या संबंधानें ), राज्यव्यवस्थेच्या संबंधानें आणि नीतिसंबंधानें चळवळी उत्पन्न झाल्या आहेत. राजकीय चळवळीचें निदर्शन, दरवर्षीं इलाख्याच्या मुख्य शहरीं जी राष्ट्रीय सभा भरत असते, ती होय. ह्या सभेंत दर प्रांतांतील लोकांकडून निवडलेले लोक, एकंदर लोकांच्या गरजा काय आहेत त्यांचा उहापोह होऊन त्या सरकारच्या कानावर राजनिष्ठतेनें घालण्याकरितां, एकत्र जमतात. अशा प्रकारची सभा जमणें, इंग्रजी राज्यापूर्वीं, ही फार अशक्य गोष्ट होती. ह्या राज्यांत, हिंदुस्तानांतील कोणत्याच धर्माचा किंवा धर्मशाखेचा विशेष पक्षपात होत नसल्यामुळें, व सर्वांस एकच कायदा लागू असल्यामुळें प्रजा ह्या बाबतींत पुष्कळ संतुष्ट आहे. ह्या मुळेंच कांहीं सार्वजनिक प्रकरणांत सर्वांची जूट होण्याचा संभव असतो. अर्ध शतकापूर्वीं कांहीं भिन्नवर्णाचे लोक एकत्र बसणें व त्यांनीं एकमेकांस स्पर्श करणें हें महापातक समजत असत, पण आगगाड्यांचा प्रसार झाल्यापासून हल्लीं त्या बाबतींत बरीच ढिलाई झाली आहे. यामुळें समाजस्थितींत फरक पडत

चालला आहे, व धर्मसंबंधीं मतें कांहीं अंशीं साहजिकच उदार होत चालली आहेत. हायकोर्टेही लग्नासारख्या सामाजिक गोष्टींच्या संबंधानें प्रसंगानुसार उदार मतें प्रदर्शित करून त्यासारखे निवाडेही करतात, यामुळेंही थोडथोडी मदत होत चालली आहे. सध्यांचा वेळ एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाण्याचा जसा असावा तसाच आहे, ह्मणजे या वेळीं दोन्हीं देशांतील शिक्षणाची भेसळ झाल्यामुळें, व दोन्ही देशांच्या रीतिभाती, आचारविचार यांचें मिश्रण झाल्यामुळें थोडा गोंधळ झाल्या सारखा दिसत आहे, पण या गोंधळाचा थोडे दिवसांत परिणाम फार चांगला होईल असा सुमार दिसत आहे. लोकांना स्वतंत्रपणें विचार करण्याची संवय लागत चालली आहे. या इंग्लिश शिक्षणापासून हल्लीं आपल्या लोकांत दोन विभाग झाले आहेत. नवीन मताचे लोक व जुन्या मताचे लोक. जुन्या मताच्या लोकांत वारंवार असें दृष्टीस पडतें कीं, कालांतरानें प्रत्येक गोष्टींत फेरफार पडत गेलाच पाहिजे हें त्यांच्या लक्षांतच येत नाहीं. आणि यामुळें ज्या गोष्टी नवीन लोकांस हितावह अशा वाटतात त्या जुन्या लोकांस अनहितकारक व हें परकीयांचें अनुकरण असें ह्मणतात. याचमुळें हल्लींच्या स्त्रीशिक्षण, बालविवाह, पुनर्विवाह, वगैरे विषयांच्या संबंधानें तट दृष्टीस पडतात. नवीन लोक आपली प्राचीन स्थिति व हल्लींची स्थिति यांचें मिश्रण असावें असें इच्छितात, व जुने लोक आहे तीच स्थिती-जरी ती वाईट आहे व दिवसेंदिवस वाईट होत जाईल असें त्यांच्या नजरेस आणून दिलें तरी-कायम असावी असें ह्मणतात. इंग्लिशराज्यापूर्वीं धर्माची जी स्थिति होती तींत व हल्लींच्या स्थितींत फारच फरक पडला आहे. सर्व धर्माचें कारण 'नीतीनें वागणें' असें कळूं लागल्यामुळें विद्वान् लोकांत ज्यास्त नीति वाढून पूर्वींच्या 'धर्म' याखालीं मोडणाऱ्या अनिष्टकारक गोष्टींचें बंधन बरेंच शिथिल होत चाललें आहे. धर्म ह्मणजे ईश्वरभक्ति, ती वाढून लोकांत ऐक्य व प्रेम वाढावें आणि हिंदुस्तानांतील दुसरे दोन धर्म-महमदी व ख्रिस्ती-दिवसें दिवस जास्त प्रबळ होत चालल्यामुळें हिंदुधर्माचा कालांतरानें समूळ नाश होण्याची जी भीति दिसत आहे, ती जावी व मूळ आर्यधर्माच्या उत्तम तत्त्वांचा सर्वत्र प्रसार व्हावा, याकरितां आर्यसमाज, प्रार्थनासमाज, ब्रह्मसमाज असे निरनिराळे समाज निघत आहेत; आणि त्यांच्या श्रमांचें फळ, प्रत्यक्ष जरी फारसें नाहीं तरी, अप्रत्यक्षरीतीनें बरेंच दिसून येत आहे. हे समाज व पंथ निघाल्यामुळें

तिशन कांहीं सुशिक्षित लोकांत तरी मागची शिथिलता जाऊन धर्मांच्या संबंधानें थोडा विचार उत्पन्न झाला आहे. वास्तविक पाहतां कोणताही धर्म मूळचा वाईट नाहीं. ईश्वरभक्ति ही प्रत्येकाच्या मूळाशीं आहे. पण निरनिराळ्या देशांत धर्मसंबंधानें जें हाडवैर दिसून येतें याचें कारण निवळ धर्माचें अज्ञान. निरनिराळ्या देशांतील आचारविचार, रीतिभाती, अद्भुत गोष्टी, रानटीस्थितींत सांपडणारा देवभोळेपणा इत्यादिकांच्या मिश्रणानें बनणारें जें धर्माचें स्वरूप तें प्रत्येक देशांत निराळें असल्यामुळें मतभेद पडतो व अर्थातच विनाकारण कलह माजतात. प्रत्येक देशांत हे कलह आहेत, पण आपल्याकडे त्याचा अंमल विशेष आहे. जातिभेदासारखे अभेद्य मार्ग इंग्लिशशिक्षणानें कांहीं अशीं बाह्यतः तरी सुगमतर होऊन सुधारणेस थोडी मदत होत चालली आहे. या सर्व फायद्यांबरोबर कांहीं दुर्गुणही आपणांत शिरून आपलें नुकसान होत आहे. हे सर्वस्वी जाऊन आपल्यांत निवळ गुणच राहतील असं कधींही व्हावयाचें नाहीं. कारण तें मनुष्यस्थितींत अशक्य आहे. चांगलें जास्त होणें व वाईट दिवसें दिवस कमी होणें हाच मार्ग शाहणे, समजूतदार व विद्वान् चांगला असें ह्मणतात.

मुसलमानांच्या अमलामुळें स्त्रियांस शिक्षण देण्याची वहिवाट बंद पडली होती ती हळू हळू चालू होत आहे. दिवसेंदिवस संस्कृत भाषेचा अभ्यास जास्त फैलावत चालल्यामुळें लोकांस पूर्वीचें आपलें काय काय होतें तें कळत चाललें आहे. निरनिराळ्या विषयांवर लहानमोठे ग्रंथ होत आहेत; वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें वगैरे सार्वजनिक उपयोगार्थ निघत आहेत. राजकीय विषयांत आपले लोक दिवसेंदिवस मन घालीत चालले आहेत. यामुळें आपलें सध्यांपेक्षां बरेंच हित होण्याचा संभव आहे. एकंदरीत, परकी राज्य असल्यामुळें, करांच्या ओझ्यामुळें, देशांतला पैसा देशांतच न राहतां परदेशांत जात आहे त्यामुळें, व इकडच्या मूळच्या उद्योगास उत्तेजन अर्थातच न मिळाल्यामुळें जरी लोक दिवसें दिवस अगदी गरीब स्थितीला येऊन पोंचले आहेत, तरी इंग्लिश सरकारानें आगगाड्या, तारायंत्रें वगैरे चालू करून यांत्रिक कलांचा मार्ग दाखवून दिला आहे यामुळें या देशांत उद्योग पुष्कळ वाढून देशाची अप्रत्यक्षरीतीनें संपत्तिही वाढत चालली आहे असें विद्वानांचें मत आहे. पुराणांतील रामराजा, धर्मराज

किंवा दोन शतकांमागें ज्यांनीं आपलें नांव सर्व देशभर गाजवून आपणांस उंच स्थितीस आणून ठेविलें असे शिवाजी महाराज, यांच्या वेळीं ज्याप्रमाणें सर्व देश स्वतंत्र व सुखी होता त्याप्रमाणें जरी हल्लीं नाहीं, तरी आपल्या दयाळू व्हिक्टोरिया राणीच्या कृपेनें आपल्या देशाला पुष्कळ फायदे झाले आहेत. व कांहीं दिवसांनीं राज्यकर्ते मात्र परकी येवढा भेद राहून स्वतंत्र राज्याचीं सर्व चिन्हें आपल्या देशाच्या राज्यकारभारांत दिसून येतील, अशी आशा करण्यास पुष्कळ आधार आहे. आपली भाग्यवान् राणी इंग्लंडच्या गादीवर बसून ५० वर्षें होऊन गेलीं. परमेश्वर तिला चिरायु करून तिला व तिच्या कामगारांना या देशाचें मनापासून कल्याण करण्यास जास्त जास्त बुद्धि देवो. आपणही राजनिष्ठतेनें देशकल्याणासंबंधानें आपलें कर्तव्य बजावून इंग्लिश राज्याचे आधारस्तंभ बनून राहिलें पाहिजे. त्यांतच आपलें हित आहे, त्यांतच आपली उन्नति आहे.

---

## भाग ८.

## हिंदुस्तानची राज्यव्यवस्था.

प्रत्येक देशाला प्रत्येक काळांत कोणात्यातरी प्रकारची राज्यव्यवस्था असते. त्या त्या काळच्या सुधारणेप्रमाणें व्यवस्था असायाची हें उघड आहे. पण प्रत्येक राज्यपद्धतीच्या बुडाशीं एक तत्व सर्व साधारण आहे; तें हें कीं, त्या पद्धतीपासून प्रजेला सौख्य व्हावें, प्रजा संतुष्ट राहून राजनिष्ठ व्हावी, आणि राजा व प्रजा ह्या उभयतांचे हक्क एकमेकांनीं राखण्याचा प्रयत्न करावा. उत्तम राज्यपद्धति म्हटली म्हणजे राजसत्ताक व प्रजासत्ताक पद्धतींचें मिश्रण. ही पद्धति विद्वान् लोक फार नावाजतात. मुसलमानी राज्यांत किंवा हिंदुराज्यांत सर्व लोकांचें मत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें राज्यकारभारांत घेत होते असें दिसत नाहीं. त्यांची राज्यपद्धति राजसत्ताक म्हटली तरी चालेल.

अकबरासारख्या मुसलमान बादशहांनीं, व शिवाजीसारख्या हिंदु राजांनीं नीतीनें राज्य केलें, प्रजेस सौख्य दिलें व आपलीं नांवें इतिहासांत अजरामर करून ठेविलीं. तरी मुसलमान व त्यांच्यानंतर मराठे ह्यांच्या वेळीं, हल्लींप्रमाणें सुधारलेल्या तत्वांवर राज्यपद्धति नव्हती. हल्लींची इंग्लिश राज्यपद्धति अशी आहे कीं, प्रजेला

आपले हक्क कायकाय आहेत हें कळत चाललें आहे. राज्यकारभारांत प्रजेचें मत थोडें बहुत घेत असतात. सारांश, इंग्लिशांच्या मागचीं राज्यपद्धति नुसती राजसत्ताक ह्मटली असतां, हल्लींची राजसत्ताक व प्रजासत्ताक मिळून झाली आहे असें ह्मटलें असतां फारसा बाध येणार नाहीं. ह्या उत्तम राज्यव्यवस्थेमुळेंच इंग्लिशलोक आपल्या प्रतिनिधींद्वारें येवढ्या अवाढव्य देशाचें राज्य करीत आहेत.

प्रथम इंग्लिशलोकांना हिंदुस्तानांत सन १६०० च्या सुमारास इंग्लंडची राणी इलिझाबेथ हिनें व्यापार करण्याची परवानगी दिली. त्यांनीं ईस्ट इंडिया कंपनी हें नांव धारण करून प्रथम १६१३ त सुरतेला वसाहत केली. सन १७५७ त प्लासी येथें जी लढाई झाली त्या लढाईमुळें त्यांना प्रथम हिंदुस्तानांत राज्यकारभाराचें सामर्थ्य आलें. त्यानंतर हळूहळू एकामागून एक प्रांत जिंकून त्यांनीं आपली राज्यसत्ता जास्त जास्त वाढविली. ईस्ट इंडिया कंपनीच्या हातीं हिंदुस्तानचें राज्य गेल्यापासून राज्यव्यवस्थेंत बऱ्याच सुधारणा झाल्या. १७७३ त रेग्युलेटिंग आक्ट झाला. सन १७८४ त पुनः हिंदुस्तानच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें खरडा तयार झाला. (वॉरन हेस्टिंग्सची कारकीर्द पहा.) ईस्ट इंडिया कंपनीलाच फक्त हिंदुस्तानाशीं व्यापार करण्याचा जो अधिकार होता, तो १८३३ पर्यंत थोडा थोडा कमी होत गेला आणि शेवटीं १८५७ च्या शिपायांच्या बंडानंतर १८५८ त ह्या कंपनीच्या हातून हिंदुस्तानांत राज्यकारभार करण्याचा अधिकार काढून घेतला. या कंपनीला १८५३ पर्यंत वेळोवेळीं सनदा करून दिल्या होत्या त्यानंतर सनद मिळाली नाहीं. हल्लींची राज्यव्यवस्था, विलायत सरकारानें राज्यकारभार आपल्या हातीं घेतल्यापासून जी चालत आली आहे तीच आहे. सन १८५८ त व्हिक्टोरिया राणी ह्यांच्या नांवानें सर्व हिंदुस्तानाला लागू असा जो कायदा ठरविला त्या कायद्याअन्वयें असें ठरलें कीं, हिंदुस्तानचा राज्यकारभार इंग्लंडच्या राणीच्या नांवानें तिच्या एका मुख्य सेक्रेटरीद्वारें चालावा, व त्याला १५ सभासद मदतीस द्यावे. या सर्वांस मिळून इंडिया कौंसिल असें नांव द्यावें. त्याचा मुख्य अध्यक्ष वरील सेक्रेटरी असावा, व हें कौंसिल लंडनमध्यें बसावें. कौंसिलांतील १५ सभासदांपैकीं ७ कोर्ट ऑफ डैरेक्टर्स ह्यांनीं नेमावे व बाकी ८ सरकारानें नेमावे. याच आक्टाअन्वयें गव्हरनर

जनरलास व्हाइसरॉय किताब मिळाला. ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यांत २४००० अंमलदार व शिपाई मिळून होते ते राणी सरकारच्या सैन्याला मिळाले. तसेंच हिंदुस्तानाकरितां कंपनीचें भारमार होतें तेंही मोडलें.

याप्रमाणें कंपनीकडून सर्व सत्ता राणीसरकारानें आपल्या हातीं घेतल्यावर हिंदुस्तानांतील राज्यकारभार चालविण्याकरितां ज्या ज्या व्यवस्था केल्या त्या अशाः–हिंदुस्तानचें राज्य चालविण्यासाठीं हिंदुस्तानांत जो एक प्रतिनिधि ( व्हाइसरॉय ) येत असतो त्याच्या हातीं खरोखर राज्याचीं सर्व सूत्रें असतात. त्याची नेमणूक सरकार करतें. त्याचा प्रत्यक्ष संबंध इंडिया कौंसिलांतील अध्यक्ष जो सेक्रेटरी त्याच्याशीं असतो. सर्व जबाबदारी ह्या सेक्रेटरीवर असते. गव्हरनर जनरलाला मदत करण्याकरितां कलकत्त्यास जें सुप्रीम कौंसिल नेमिलें आहे त्या कौंसिलांत कायदेकानु करण्याकरितां कायमचे पांच व वेळोवेळीं नेमिलेले असे ६ मिळून ११ सभासद असतात. कायमचे पांच सभासदांचीं नांवें—जमाबंदीकडील दिवाण, वसूल, शेतकी वगैरे संबंधी दिवाण, सार्वजनिक लोकोपयोगार्थ कामांकरितां नेमिलेला दिवाण, लढाई प्रकरणाकडील दिवाण ( कमांडर इन–चीफ ), व कायदेकानु करण्याकरितां नेमिलेला दिवाण.

हे ५ सभासद व गव्हरनर जनरल मिळून, जें कौंसिल त्याला 'एक्सेक्युटिव्ह कौंसिल' अशी संज्ञा आहे. आणि कायदेकानु करण्याकरितां ११ सभासद मिळून जें कौंसिल त्याला 'लेजिस्लेटिव्ह कौंसिल' असें ह्मणतात. ह्यांशिवाय सरकारचीं निरनिराळीं खातीं तपासण्याकरितां चीफ सेक्रेटरी, अंडरसेक्रेटरी इ० नेमिले आहेत.

राज्यव्यवस्थेसाठीं हिंदुस्तानचे ९ विभाग केले आहेत. व ते गव्हरनर, लेफ्टेनंट गव्हरनर, चीफ कमिशनर, कमिशनर इत्यादिकांच्या ताब्यांत दिले आहेत. शिवाय १५४ मांडलिक हिंदु व मुसलमान राज्यें आहेत त्यांच्यावर रेसिडेंट किंवा पोलिटिकल एजंट असतात. वर सांगितलेले ९ विभाग येणेंप्रमाणेः—

मुंबई इलाखा–गव्हरनराच्या अमलाखालीं.
मद्रास इलाखा– " "
बंगाल इलाखा––लेफ्टेनंट गव्हरनराच्या हाताखालीं.
वायव्येकडील प्रांत व अयोध्या– " "

ग्रंथसंग्रहालय

पंजाब इलाखा—लेफ्टेनंट गव्हर्नरच्या हाताखालीं.
मध्यप्रांत--चीफ कमिशनरच्या हाताखालीं.
ब्रिटिश ब्रह्मदेश— ,,
आसाम--
वऱ्हाड--रेसिडेंट.

सिलोनचा हिंदुस्तानाशीं राजव्यवस्थेच्या संबंधानें मुळींच संबंध नाहीं. १९४ एत्तद्देशीय संस्थानांपैकीं खालीं लिहिलेलीं १२ मुख्य आहेत. ( १ ) हैदराबादचे निजाम. (२) ग्वाल्हेरचे शिंदे. (३) बडोद्याचे गायकवाड. (४) जयपूरचे महाराज. (५) त्रावणकोरचे महाराज. (६) काश्मीरचे महाराज. (७) जोधपूरचे महाराज. (८) इंदूरचे होळकर. (९) पत्यालाचे महाराज. (१०) उदेपूरचे महाराज. (११) भरतपूरचे महाराज. (१२) भोपाळच्या बेगम. प्रांतिक व्यवस्थेकरितां जिल्हे किंवा कलेक्टरेट केले आहेत. प्रत्येक जिल्ह्यावर सरकारचा एक एक अंमलदार असतो. जिल्ह्याचे तालुके व तालुक्याचे परगणे ह्याप्रमाणें सोईकर विभाग केले आहेत.

मुंबई व मद्रास येथील गव्हरनर हे इतरांपेक्षा जास्त स्वतंत्र आहेत. राज्य कारभाराकरितां त्यांना एक एक कौंसिल दिलेलं आहे. त्यांचे स्वतःचे पृथक् पृथक् कमांडर-इन-चीफ् आहेत, स्वतःचें निराळें सैन्य आहे; सिव्हिल सर्विस ह्मणून श्रेष्ठ हुद्याच्या ज्या नियमित नोकऱ्या आहेत त्यादेखील यांच्या स्वतःच्या आहेत. हे थेट इंग्लंडांतील इंडिया कौंसिलांतल्या सेक्रेटरीशीं पत्रव्यवहार करतात. ह्यांची नेमणुक खुद्द सरकार करतें. लेफ्टेनंट गव्हरनरांच्या नेमणुका इंडिया कौंसिलांतल्या सेक्रेटरीच्या मंजुरीनें व्हाइसरॉय करतो. बंगालच्या लेफ्टेनंट गव्हरनराला फक्त निराळे कायदे करण्याकरितां कौंसिल दिलेलें आहे. एक्सेक्युटिव्ह कौंसिल नाहीं. ह्यांचा इंडिया आफिसाशीं प्रत्यक्ष संबंध नाहीं. त्यांना पगारही कमी असतो. चीफ कमिशनरांची सत्ता बरेच अंशीं लेफ्टेनंट गव्हरनरासारखी असते.

हिंदुस्तानांत लष्करी खात्याचे संबंधानें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, पुष्कळ लष्करी अंमलदारांस 'सिव्हिल' खात्यांत नोकरी मिळते व काळे लोकांच्या ज्या पलटणी आहेत त्यांपैकीं पुष्कळांवर युरोपियन अंमलदार असतात. लष्करी अंम-

लदार, कमीशनर, चीफ कमीशनर किंवा लेफ्टेनंट गव्हरनर हे गव्हरनर देखील होऊं शकतात.

सिव्हिलसर्विसच्या श्रेष्ठ हुद्याची जागा वाटेल त्याला मिळूं शकते. त्याच्याकरितां लंडनमध्यें दरवर्षी परीक्षा होत असते, त्या परीक्षेंत जे उतरतील त्यांस अनुक्रमानें ह्या जागा मिळतात. तसेंच ह्या सिव्हिल सर्विसचा दुसरा एक प्रकार आहे. तो असा कीं, येथल्या कांहीं योग्य लोकांस परीक्षा न देतां सरकारच्या निवडणुकीनें कांहीं मोठ्या जागा मिळतात. सिव्हिल सर्विसमध्यें डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट, कलेक्टर, सेशनजज्ज, सर्व सेक्रेटरी, अंडर सेक्रेटरी आणि निरनिराळ्या खात्याचे मुख्य अंमलदार हे सर्व येतात. परीक्षा पास होऊन येईल त्याला प्रथम कोणत्या तरी जिल्ह्यांत असिस्टंट कलेक्टर नेमतात. पुढें दोन तीन वर्षांत बदली किंवा कायम जाइंट माजिस्ट्रेट नेमतात. यानंतर त्यानें मुलकी किंवा दिवाणी यांमधून वाटेल ती रांग पत्करावी. दिवाणी पत्करली तर वाढतां वाढतां डिस्ट्रिक्ट सेशन जज्ज होतो; मुलकी पत्करली तर चीफ कमिशनरपर्यंत वाढून लेफ्टेनंट गव्हरनर होतो. २५ वर्षें नोकरी झाल्यावर प्रत्येकाला दरवर्षी १००० पौंड पेनशन मिळतें.

वसुलाच्या मुख्यबाबी-जमीन, अफू, मीठ, छापी कागद व अबकारी-ह्या असून ह्यांशिवाय आणखी तारायंत्र, डांक, आगगाड्या वगैरे पुष्कळ आहेत. पहिल्या ३ बाबींचें उत्पन्न दिवसेंदिवस वाढत आहे. सरकारचें एकंदर उत्पन्न ७२ कोटी रुपयांवर आहे. सरकारास खर्चही उत्पन्नाइतकाच आहे. कर्जही मनस्वी आहे.

लोकल सेल्फगव्हरमेंट ( स्थानिकस्वराज्य ) हा राज्यकारभाराचा एक प्रकार मोठमोठ्या शहरांतून चालू आहे. लोकांनीं स्थानिक कामें आपल्या आपण करण्यास समर्थ व्हावें या उद्देशानें सरकारानें स्थानिक स्वराज्य दिलें आहे. अगदीं संबंध न तुटावा व कामें चांगलीं चालावीं यासाठीं सरकारानें आपले कामगारही त्यांत नेमले आहेत.

सिव्हिल सर्विस सारखीच 'डिपार्टमेंट सर्व्हिस' आहे. सिव्हिल सर्विसला ही मदतनीस आहे. पोलिस खातें, एंजिनियर खातें, फारेस्ट ( रान ) खातें, डेपुटी माजिस्ट्रेट आणि मुनसफ इ० हीं सर्व डिपार्टमेंटल सर्विसखालीं येतात.

सरकारानें लोकांस शिक्षण मिळावें यासाठीं हजारों मराठी व इंग्रजी

शाळा स्थापिल्या आहेत. उंचप्रतीच्या शिक्षणासाठीं हायस्कुलें व कालेजें हीं ठिकठिकाणीं स्थापिलीं आहेत. परीक्षा पास झालेल्या लोकांस सरकार योग्यता पाहून हुद्याच्या जागा देतें. आरोग्याकरितां दवाखाने घातले आहेत.

सार्वजनिक कामांपैकीं ठळकठळक कालवे, पाट, बंधारे, रस्ते, तळीं, विहिरी, रेल्वे, पत्रें पोंचविण्याची स्वस्त पद्धति, तारायंत्रें, इ० हीं होत.

**एतद्देशीय संस्थानांशीं सरकारचा संबंध**–कांहीं संस्थानांनीं आपले प्रांत सरकारच्या स्वाधीन केले, कांहीं लढाईत मिळाले, व कांहीं, सरकारानें संस्थानिकांचें राज्यकारभारास अयोग्य असें वर्तन पाहून, खालसा केले. बहुतेकांशीं प्रथम असा करार होता कीं, त्यांनीं मुख्य सरकाराला प्रसंगीं कुमक द्यावी. पण पुढें प्रसंगवशात् त्यांची वर सांगिल्याप्रमाणें व्यवस्था झाली. जीं कांहीं हल्लीं संस्थानें आहेत त्यांच्याशीं तहनामे असे ठरले आहेत कीं, सरकारानें बाहेरच्या शत्रूपासून त्यांचें संरक्षण करावें, व संस्थानांनीं इतर देशांशीं कांहीं संबंध ठेवावयाचा असल्यास सरकारच्या परवानगीवांचून ठेवूं नये. सरकारानें आपलें कांहीं सैन्य संस्थानांत ठेविलेलें असतें. त्याच्या खर्चाकरितां त्यांनीं कांहीं प्रांत तोडून दिलेले आहेत. सरकारानें संस्थानिकांच्या कारभारांत मोठ्या महत्वाच्या कारणाशिवाय हात घालूं नये असेंही ठरलेलें असतें. कांहीं संस्थानें सरकारास खंडणी देतात. त्यांनीं आपल्या प्रदेशांत वाटेल तशी सत्ता चालवावी.

खुद्द इंग्लिश सरकारचा अंमल ८,८१,८२३ चौरस मैलांवर आहे व सरकारच्या ताब्यांतील एतद्देशीय संस्थानांचा अंमल ५,२१,११६ चौरस मैलांवर आहे. पोर्तुगीजाचा अंमल १०८६ व फ्रेंचांचा १७८ चौरस मैलांवर आहे. एतद्देशीय संस्थानांचें उत्पन्न सुमारें २६ कोटींवर आहे. त्यांपैकीं ७२,५०,००० रुपये खंडणीबद्दल सरकाराकडे येतात.

# भाग ९.

# प्रसिद्ध पुरुषांचीं संक्षिप्त चरित्रें, युद्धें, तह वगैरे.

## पूरणिका पहिली.

### प्रसिद्ध पुरुष.

**चिमणाजी आपा.**—हा मोठा शहाणा, पराक्रमी, शूर असा होता. यानें १७३९ त पोर्तुगीज लोकांपासून वसईचा किल्ला घेतला. हा वसई मुक्कामीं मरण पावला.

**सदाशिवराव भाऊ.**—हा मोठा शहाणा व शूर असल्यामुळें नानासाहेबानें सर्व राजकीय काम यावर सोंपविलें होतें. हा पानपतचे लढाईत नाहींसारखा झाला.

**नाना फडनवीस.**—हा मोठा राजकारस्थानी पुरुष, थोरले माधवराव, नारायणराव, आणि सवाई माधवराव यांच्या कारकीर्दींत होता. हा लहानपणापासून राजकीय कामांत असल्यामुळें सर्व हिंदुस्थानांत त्याच्या वेळीं त्याच्यासारखा राजनीति जाणता दुसरा कोणी नव्हता. हा पानपतच्या लढाईत होता. मराठ्यांचा पराभव झाल्यानंतर तेथून तो वेष पालटून दक्षिणेंत आला. हा चतुर व प्रामाणिक असून ह्याची स्मरणशक्ति अपूर्व होती. हा इ० स० १८०० त मरण पावला. हा जिवंत होता तोंपर्यंत त्यानें इंग्रज, निजाम व हैदर यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं.

**मल्हारराव होळकर.**—हा १६९३ त जन्मला. हा पूर्वी निरानदीचे कांठीं होळ खेड्यांतील दुय्यम पाटील होता. यानें नंदुरबार येथें जाऊन कंठाजी कदम बांडे याजपाशीं शिपाईगिरीची नौकरी धरिली. नंतर त्याला बाजीरावानें मागून घेऊन त्याला ५०० स्वारांची सरदारी दिली. हा पुढें प्रसिद्धीस आला. हा इ० स० १७६६ त मरण पावला. त्या वेळेस त्याच्या ताब्यांत एक कोट रुपयांचा मुलूख होता. ह्याला खंडेराव ह्मणून एकच पुत्र होता, परंतु तो आपल्या बापाच्या आधींच निवर्तला होता. ह्मणून खंडेरावाची बायको अहल्याबाई व तिचा पुत्र मालेराव, हीं राज्याची मालक झालीं.

**राणोजी शिंदा.**—हा कण्हेरखेड येथील पाटील होता. ह्यानें शाहू महाराजांचे कारकीर्दीत मराठ्यांच्या लष्करांत चाकरी

धरिली व पुढें तो बाजीरावाबरोबर हिंदुस्तानांत स्वाऱ्यांसही जाऊं लागला. त्यांत त्यानें किती एक प्रसंगीं आपलें शौर्य दाखविल्या- मुळें तो पुढें प्रसिद्धीस आला. पेशव्यांस हिंदुस्तानांत जो मुलूख मिळाला, त्यांतील अर्धा मुलूख याला जहागीर दिला. हा इ० स० १७५० त मरण पावला. राणोजीस जयाजी, जनकोजी व दत्ताजी असे तीन औरस पुत्र; आणि महादजी व तुकोजी असे दोन दासी- पुत्र होते.

**दमाजी गायकवाड**.–हा खंडेराव दाभाडे याच्या हाताखालीं हलक्या प्रतीचा सरदार होता. त्याचें शौर्य पाहून शाहू राजानें त्याला मोठा अधिकार व 'समशेर बहादूर' असा किताब दिला. हा इ० स० १७२० त मरण पावला.

**रघोजी भोंसला**.–हा शिकारीचे कामांत हुशार असल्यामुळें मोठ्या योग्यतेस चढला. याला शाहूराजानें 'सेना साहेब सुभा' असा किताब देऊन वऱ्हाडांत जहागीर दिली. हा १८२० त मरण पावला.

**लॉर्ड क्लाइव्ह**.–हा इ० स० १७२५ त जन्मला. याचे बापाचें नांव रिचर्ड क्लाइव्ह. हा पहिल्यानें ईस्ट इंडिया कंपनीमध्यें कारकु- नीची नौकरी पतकरून १७४३ त हिंदुस्तानांत आला. परंतु त्याला तें काम न आवडून त्यानें आपल्या वयाचे २१ वें वर्षी शिपाईगिरीची नौकरी पतकरली. पुढें तो पांडिचरीच्या पहिल्या वेढ्यांत प्रसिद्धीस येऊन त्यानें १७४८ त देवीकोटचा किल्ला घेतला. त्यानें तंजावरचा किल्ला घेतल्यामुळें त्याला कमिसरी जनरलची जागा मिळाली. त्यानें अर्काटावर स्वारी करून तें घेतलें, व डुप्लीच्या जयाचा स्तंभ व गांव हीं उध्वस्त करून टाकिलीं (१७५२). त्यानें आरनी येथें राजासाहेबाचा, व १७५७ त प्लासी येथें सुराज उद्दवल्याचा पराभव केला. हा मोठा धीट, अभिमानी व तलख असून त्याचे अंगीं योजनाशक्ति व दूरदृष्टि हे गुण होते. याचेच योगानें इंग्लिशांस हिंदुस्तानचें राज्य प्राप्त झालें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हा १७६७ त स्वदेशीं गेला व १७७४ त आत्महत्या करून मरण पावला.

**सर ऐर कूट**.–हा इ० स० १७२६ सालीं जन्मला. हा १७५४ त हिंदुस्तानांत येऊन पांडिचरीच्या वेढ्यांत फार प्रसिद्ध झाला. हा १७६९ स कंपनीचे सैन्याचा सेनापति झाला. पुढें तो

लवकरच इंग्लंडास गेला. नंतर त्याला फोर्त सेंत जार्जचा गव्हरनर नेमिलें. त्यानें हैदराचा पराभव केला. हा १७८३ त मद्रासेस मरण पावला.

**लॉर्ड लेक.**–हा प्रख्यात इंग्लिश सरदार इ० स० १८०० त हिंदुस्तानांत सेनापति होऊन आला. त्यानें लासवारी, दिल्ली व दीग या ठिकाणीं मराठ्यांचा पराभव केला, व १८०३ त शाहा अलम बादशहास कैदेंतून सोडविलें. हा १८०७ त इंग्लंडास परत गेला व १८०८ त मरण पावला.

**मानासियर डुप्ली.**–हा फ्रेंच लोकांचा मोठा शूर, बुद्धिमान् व महत्त्वाकांक्षी सरदार होता. याला १७३१ त चंद्रनगरचा डायरेक्टर नेमिलें, तेथें तो १० वर्षे होता. नंतर ह्याला पांडिचरीचा गव्हरनर नेमिलें. यानें १७४४ त इंग्लिशांशीं लढाई सुरू केली. त्याच्या मनांत इंग्लिशांस हिंदुस्तानांतून हांकून द्यावें असें होतें. हा १७६४ त मरण पावला.

**लाली.**–हा फ्रेंच लोकांचा सरदार होता. याला १७५६ त ईस्टइंडीजचा गव्हरनर नेमिलें. तो आला त्याच दिवशीं त्यानें इंग्लिशांच्या फोर्ट सेन्ट डेव्हिड किल्ल्यावर हल्ला करून तो घेतला; परंतु सर ऐर कूट ह्यानें त्याचा वांदिवाश येथें पराभव केला. इंग्लिशांनीं पांडेचरीस वेढा घातला, तेव्हां लालीनें ८ महिनेपर्यंत त्या शहराचें रक्षण केलें. परंतु तें १७६१ त इंग्लिशांच्या हस्तगत झालें. नंतर तो फ्रान्स देशास गेला. तेथें त्याला अपराधी ठरवून बस्तिली किल्ल्यावर फांशीं दिलें ( १७६६ ).

**बुशी.**–हा एक मोठा फ्रेंच सरदार होता. त्यानें पुष्कळ लढाया करून मुजफरजंगास गादीवर बसविलें. निजामाच्या राज्यांत ह्याची फारच भरभराट झाली होती. हा कारंगुली येथील लढाईत इंग्लिशांच्या हस्तगत झाला.

**हैदरअल्ली.**–हा म्हैसूरच्या राजाजवळ एक सरदार होता. तो पुढें प्रबळ होऊन, आपल्या धन्यास पदच्युत करून आपण १७६१ त गादीवर बसला. माधवराव पेशव्यानें ह्यावर स्वारी करून पुष्कळ मुलूख व ३२ लक्ष रुपये घेतले. १७६६ त हैदरानें मलबारावर स्वारी केली. कर्नल स्मिथ यानें जंगम व त्रिनोमाली येथें याचा १७६७ त पराभव केला. नंतर १७६९ त यानें इंग्लिशांशीं तह केला. चिरकुली येथें मराठ्यांनीं त्याचा पराभव केला

( १७७२ ). १७८० त करनाटकावर स्वारी. यानें पालिलोरच्या लढाईत बेलीच्या सैन्याची कत्तल करून बेलीसहित २०० लोकांस कैद केलें. ( २ ) पालिलोर, पोर्टोनोव्हो, शोलिंगगड या ठिकाणीं याचा इंग्लिशांनीं पराभव केला. हा धैर्यवान् व धूर्त होता. ह्याला लिहितां वाचतां कांहीं येत नव्हतें. हा १७८२ त मरण पावला.

**टिपू.**-हा हैदराचा मुलगा. हा १७४९ त जन्मला. ह्याला चितूर येथें १७८३ त राज्याभिषेक झाला. यानें बेदनूर शहरावर हल्ला करून तेथें जे इंग्लिश लोक सांपडले त्यांस त्यानें एका अंधारकोठडींत कोंडून ठेविलें. ह्याच्या व इंग्लिशांच्या तंजावर, सिद्धेश्वर, मालवेली व श्रीरंगपट्टण येथें लढाया झाल्या. शेवटीं श्रीरंगपट्टणच्या लढाईत तो मारला गेला ( १७९९ ). नंतर त्याचें राज्य इंग्लिश, निजाम व म्हैसूरचा पूर्वीचा राजा यांनीं वाटून घेतलें. हा स्वभावानें आपल्या बापासारखाच होता.

**सुराजउद्दवला.**-हा बंगाल्याचा सुभेदार अलिवर्दीखान याच्या मुलीचा मुलगा. बंगाल्यांत इंग्लिशांची भरभराट पाहून, कांहीं तरी कुरापत काढून त्यांस तेथून हांकून लावावें असें याच्या मनांत होतें. हा आपल्या प्रजेवर अतिशय जुलूम करीत असे. किसनदास नामें एक सावकारपुत्र डाका येथें होता, त्याचें व ह्याचें वैमनस्य पडल्यामुळें, तो कलकत्ता येथें इंग्लिशांच्या आश्रयास जाऊन राहिला. त्यामुळें सुराजउद्दवल्यास राग येऊन त्यानें कलकत्ता शहर घेतलें. तेथील किल्ल्यांत त्याला १४६ इंग्लिश लोक सांपडले. त्यांस एका २० फूट औरस चौरस जागेंत कोंडून ठेविलें. तेथें त्यांचे हालहाल होऊन दुसरे दिवशीं २३ मात्र जिवंत सांपडले. याचा क्लाइव्ह साहेबानें प्लासी येथें पराभव केला. हा दुष्ट व आपलपोट्या होता. हा १७५७ त मारला गेला.

**मीरकासीम.**-ह्याला इंग्लिशांनीं १७६० त गादीवर बसविलें. त्यामुळें त्यानें त्यांस बरद्वान, मिदनापूर आणि चितगांग हे प्रांत दिले. हा मोठा बुद्धिमान् व उद्योगी होता. मालावरील जकात हिंदु व इंग्लिश यांनीं सारखी द्यावी असा यानें हुकूम केल्यावरून इंग्लिशांस राग येऊन त्यांनीं पाटणा शहर घेतलें. मीरकासीमानें पाटणा शहर परत घेऊन अमियात व दुसऱ्या २०० गोरे लोकांस ठार मारून बाकीच्यांस कैद केलें. याचा घेरिया व बक्सार येथील

लढायांत इंग्लिशांनीं पराभव केला. नंतर त्यास इंग्लिशांनीं गादी-वरून काढून टाकिलें.

**मीरजाफर.**–याला क्लाइव्ह साहेबानें मुर्शिदाबादेस गादीवर बसविलें. यानें देऊं केलेला ऐवज न आल्यामुळें वान्सितार्त गव्हरनर यानें त्यास १७६० त पदच्युत करून मीरकासीमास गादीवर बसविलें. हा १७६५ त मरण पावला. ह्याला मिरन व नुजमउद्दवला असे दोन पुत्र होते.

**उमीचंद.**–हा अत्यंत धनलोभी सावकार सुराजउद्दवल्याचा मित्र होता. सुराजउद्दवल्यास काढून मीरकासीमास गादीवर बसविण्याविषयीं जो रायदुर्लभ सावकारच्या घरीं कट झाला, त्या कटांत तो होता. पण पुढें 'जर मला तीस लक्ष रुपये द्याल, तर ही गुप्त गोष्ट नबाबास कळविणार नाहीं' असें त्यानें बोलणें लाविलें. तेव्हां क्लाइव्ह साहेबानें रुपये देण्याविषयीं खोटा करारनामा करून देऊन त्यास फसविलें. त्यामुळें त्याच्या बुद्धीस भ्रंश होऊन तो मरण पावला.

**तैमूरलंग.**–ह्याचें मूळचें नांव तैमूर. परंतु लढाईंत त्याच्या एका पायास गोळी लागून तो जायबंदी झाला, त्यावरून लोक त्याला तैमूर लंगडा असें ह्मणूं लागले. पुढें शेवटचें अक्षर डा हें जाऊन तैमूरलंग असें नांव पडलें. हा तार्तरी सरदार दिवसेंदिवस प्रबळ होऊन व आपल्या आश्रयदात्यावर उठून इ० स० १३६९ त समर्कंद शहरीं गादीवर बसला. त्यानें इराण वगैरे देश जिंकून इ० स० १३९८ त हिंदुस्तानावर स्वारी केली. वाटेनें जातांना पुष्कळ गांवें लुटून व जाळून शेवटीं दिल्लीवर चाल केली. त्या वेळीं फिरूजशहाचा नातू महमूदशहा हा दिल्लीचा बादशाहा होता. तो गुजराथेंत पळून गेला. तैमूरलंगानें दिल्ली लुटून असंख्य लोकांची कत्तल केली, व स्वदेशीं जातांना अपरिमित द्रव्य आणि पुष्कळ लोक गुलाम करून नेले. विद्वान् व कारागीर यांस कांहीं एक इजा न करितां त्यास तो आपल्या स्वारीबरोबर नेत असे. हा इ० स० १४०५ ह्या वर्षीं मरण पावला.

**रणजितसिंग.**–हा महासिंग नामक शीक सरदाराचा पुत्र. तो १७८० त जन्मला. त्याला लहानपणीं अतिशय देवी येऊन, त्यांच्या योगानें त्याचा एक डोळा गेला. लहानपणीं त्याचा विद्याभ्यास कांहींएक झाला नव्हता. तो अगदीं उनाड होता. तो

१७९२ त गादीवर बसला. त्यानें शीक लोकांचें राज्य नांवारूपास आणिलें. काबुलवाले, नेपाळवाले व मराठे यांजपासून त्यानें पुष्कळ मुलूख घेतला. तो मोठा फौजबंद होता. त्याला इंग्लिश लोक 'पंजाबचा सिंह' असें ह्मणत. त्यानें मुलतान व काश्मीर हे देश अनुक्रमें १८१८ व १८१९ या वर्षी काबीज केले. त्याचा व इंग्लिशांचा १८३१ त लाहोरास तह झाला. तो मोठा विषयी व लोभी असे. कोहिनूर नामें प्रसिद्ध हिरा त्याजपाशीं होता, तो हल्लीं व्हिक्टोरिया राणीच्या मुकुटावर झळकत आहे. तो १८३९ त मरण पावला; तेव्हांच शीक लोकांच्या राज्यास उतरती कळा आली. याला धुलिपसिंग या नांवाचा एक मुलगा आहे. त्याला इंग्लिशांनीं लहानपणींच त्याच्या आईसह विलायतेस नेलें. आई तिकडेच मेली. धुलिपसिंग अजूनपर्यंत ख्रिस्ती धर्म स्वीकारून तिकडेच होते, पण हल्लीं इंग्लिश सरकारानें त्यांना हिंदुस्तानांत येऊन राहण्याची परवानगी दिली ह्मणून ते इकडे यावयास निघाले. परंतु त्यांच्याविषयीं इंग्लिशांच्या मनांत कांहीं संशय आल्यावरून त्यांनीं त्याला एडन एथेंच कांहीं दिवस अटकावून ठेविलें व त्याला इंग्लंडास परत जाण्याविषयीं हुकूम झाला. त्याप्रमाणें परत न जातां ते रशियाकडे पळून गेले. व तेथें कांहीं दिवस राहून हल्लीं फ्रान्स देशांत जाऊन राहिले आहेत.

**जिवबादादा.**-हा शूर पुरुष सवाई माधवराव पेशवाईचें काम पहात असतां महादजी शिंद्याच्या पदरीं होता. त्यानें फौजा घेऊन ग्वाल्हेरपर्यंत मध्यें जे रजवाडे बलवान होते त्यांवर स्वपराक्रमानें आपला हुकूम बसवून गोहदवाला राणा संस्थानिक याजकडे ग्वाल्हेर होती ती घेतली. यावरून महादजी शिंद्यानें जिवबादादास बक्षिगिरी दिली, ह्मणून त्यांस बक्षी हें उपनांव पडलें आहे. ह्यांच्यासारखा त्या वेळीं कोणत्याही मराठे घराण्यांत शूर, पराक्रमी, राजकारणी, सेनापति व चतुर पुरुष नव्हता. हा खड्यांच्या लढाईत होता. त्या लढाईत फडके, पटवर्धन आणि नानाफडणिस पळूं लागले त्या वेळेस जिवबादादानें त्यांस धीर देऊन निजामाचा मोड केला.

**बापू गोखले.**-हा शूर सरदार दुसऱ्या बाजीरावाच्या पदरीं होता. त्यानें टिपूचा पराभव करून धोंडी वाघ ह्मणून जो त्याचा सरदार त्यास धरून ठार मारिलें. यानें पंतप्रतिनिधीचें बंड मोडून,

करनाटकांत पेशवाईचा अंमल बसविला. बाजीराव पळत असतां याच्या व इंग्लिशांच्या खडकीं व कोरेगांव येथें मोठ्या निकराच्या लढाया झाल्या. अष्ट्याच्या लढाईत इंग्लिशांचें सैन्य जास्त असल्यामुळें, तो युद्धाचे गर्दीत मारला गेला ( १८१८. )

**अमीरखान.**–हा पेंढाऱ्यांचा पुढारी असून जातीचा पठाण होता. ह्यानें १८०० त होळकराची चाकरी पतकरिली. यानें वराडच्या राजावर स्वारी केल्यामुळें इंग्लिशांनीं त्याचा पराभव केला ( १८०९ ). पुढें १८१७ त शिंदे व मार्किस ऑफ् हेस्टिंग्स् यांनीं त्यापासून पुनः लुटालूट करणार नाहीं, असें वचन घेऊन त्याची जाहागीर ' टोंक ' त्यास परत दिली. त्याचे वंशज तेथें अजून राज्य करीत आहेत.

---

# पूरणिका दुसरी.

## युद्धें.

**म्हैसूरचें पहिलें युद्ध.**–( १७६७–१७६९ ).–हैदर उत्तरोत्तर प्रबळ होऊन त्यानें उत्तरेस बेदनूर, व दक्षिणेस कालिकत हीं शहरें घेतलीं. तेव्हां त्यास जास्त वाढूं देऊं नये, ह्मणून इंग्लिश, मराठे व निजाम हे एक झाले. प्रथम मराठे एकटेच हैदराच्या मुलखांत शिरले. त्यांस त्यानें तीस लक्ष रुपये देऊन मागें परतविलें. नंतर निजामही हैदरास फितूर झाला. त्या दोघांचा, कर्नल स्मिथ् यानें चंगम व त्रिनोमाली येथें १७६७ त पराभव केला. कालवर्त साहेबानें अंबूरचें रक्षण मोठ्या शौर्यानें केलें. इकडे टिपूनें मद्रासपर्यंत मुलूख उध्वस्त केला. बंगालच्या सैन्यानें निजामाचा पुष्कळ मुलूख घेतल्यामुळें, त्यानें १७६८ त इंग्लिशांशीं तह केला. तेव्हां हैदरास मद्रासेस येऊन इंग्लिशांशीं तह करावा लागला ( १७६९ ).

**म्हैसूरचें दुसरें युद्ध.**–( १७८०–१७८४ ).–हैदरानें ९० हजार सैन्य घेऊन करनाटकावर स्वारी केली, व इंग्लिशांचे पुष्कळ किल्ले घेऊन पालिलोर येथें बेलीच्या सैन्याचा पराभव करून बेलीसहीत २०० लोकांस कैद केलें. तेव्हां इंग्लिश सेनापति सर हेक्टर मनरो याला मद्रासेस परत जावें लागलें. बंगाल सरकारानें त्याच्या मदतीला सर ऐरकूट ह्यास पाठविलें. त्यानें १७८१ त पोर्टोनोव्हो, पालिलोर आणि शोलिंगगड येथें हैदराचा अगदीं पराभव

केला. १७८२ त हैदर मरण पावला. टिपूनें पुनः लढाई चालू केली. कर्नल फुलर्टन सैन्यासह श्रीरंगपट्टणावर चाल करून जाणार होता, परंतु टिपूनें मद्रास सरकाराशीं १७८४ त मंगळूर येथें तह केला.

**म्हैसूरचें तिसरें युद्ध.**–( १७९०–१७९२ ).–टिपूनें कनारा, कुर्ग आणि मलबार हे प्रांत घेतले, व नायर लोकांस फार छळिलें. ते पळून त्रावणकोरच्या राज्यांत गेले. टिपूनें त्रावणकोरच्या राज्यांत शिरून फार अघोर कृत्यें केलीं ( १७८९ ). तो राजा इंग्लिशांचा स्नेही होता, ह्मणून मद्रासचा गव्हरनर जनरल मेडोज यानें मराठे व निजाम यांस आपल्या पक्षांत आणून टिपूवर स्वारी केली; व गजलघट्टीच्या खिंडीजवळ टिपूचा पराभव केला. इ० स० १७९० त लॉर्ड कॉर्नवालिस स्वतः मद्रासेस आला, आणि १७९१ त बंगलोर शहर घेतलें. हें वर्तमान ऐकून टिपू श्रीरंगपट्टणास गेला, आणि इंग्लिश बंदिवानांचे हाल हाल करून त्यांस ठार मारिलें. लॉर्ड कॉर्नवालिस यानें श्रीरंगपट्टणावर चाल केली, परंतु त्याच्या सैन्यांत दुष्काळ पडून लोक आजारी पडले, त्यामुळें त्यास परतावें लागलें. तो कांहीं दिवस बंगलोरास राहिल्यावर त्यानें नंदीदुर्ग वगैरे टिपूचे किल्ले घेतले, व १७९२ त फेब्रुवारीच्या ५ वे तारखेस त्यानें पुनः श्रीरंगपट्टणावर चाल करून टिपूचा पूर्णपणें पराभव केला. नंतर टिपूनें तह केला ( १७९२ ).

**म्हैसूरचें चवथें ( शेवटचें ) युद्ध.**– ( १७९८–१७९९ ).–लॉर्ड वेलस्ली येतांच टिपू, निजाम, शिंदा वगैरेंनीं इंग्लिशांवर उठण्याविषयीं बेत केला. त्यांनीं आपाआपल्या सैन्यांस फ्रेंच लोकांकडून कवाईत वगैरे शिकवून लढाईची कडेकोट तयारी केली. अहमदशहा अबदलीचा नातू झमानशहा, टिपूच्या वतीनें हिंदुस्तानावर स्वारी करणार होता. नेपोलियन बादशाहा मिसर देशांत होता, त्याची मदत टिपूनें गुप्तपणें मागितली. तेव्हां गव्हरनर जनरलानें निजामाशीं तह केला. त्याचें सैन्य कर्नल वेलस्लीच्या हाताखालीं देऊन इंग्लिशांच्या मदतीस पाठविलें. नंतर दोन सैन्यें तयार झालीं. एक जनरल हारिस याच्या हाताखालीं, तें मद्रासेकडून गेलें, व दुसरें मुंबईचें, जनरल स्टुअर्ट याच्या हाताखालीं, तें मलबारच्या बाजूनें निघालें. जनरल स्टुअर्ट यानें सिद्धेश्वर येथें, व जनरल हारिस यानें मालवेली येथें टिपूचा अगदीं मोड केला ( १७९९ ).

नंतर त्या दोन्ही सैन्यांनीं श्रीरंगपट्टणावर चाल करून शहरास वेढा घातला. तेव्हां टिपूचें धैर्य खचलें, व तो तह करण्यास कबूल झाला. परंतु गव्हरनर जनरलानें सांगितलेलीं कलमें त्यास मान्य होईनात. इंग्लिशांनीं तटास भोंकें पाडिलीं, व आंत शिरून ता० ४ मे १७९९ रोजीं श्रीरंगपट्टण घेतलें. टिपू हल्ल्यांत मारला गेला. नंतर इंग्लिशांनीं म्हैसूरच्या पूर्वींच्या राजाच्या अल्पवयी मुलास गादीवर बसवून, राज्याची वहिवाट करण्याकरितां कर्नल वेलस्ली यास नेमिलें.

**मराठ्यांशीं पहिलें युद्ध**– ( १७७९–१७८१ ).–सवाईमाधवराव हा पेशवा असतां सर्व राज्यकारभार नाना फडणवीसाच्या हातीं होता. सवाईमाधवराव हा नारायणरावाचा खरा पुत्र नव्हे अशी तक्रार करून राघोबादादा हा पेशवाईच्या गादीवर आपला हक्क सांगूं लागला. म्हणून नाना फडणवीसानें फ्रेंचांची मदत मागितली ; तेव्हां मुंबईच्या इंग्लिशांनीं राघोबादादाचा पक्ष स्वीकारिला. हेंच ह्या लढाईचें कारण. नंतर १७८१ त सालपें मुक्कामीं तह होऊन ही लढाई संपली. ह्या तहाच्या योगानें इंग्लिशांस साष्टी, घारापुरी वगैरे बेटें मिळालीं.

**मराठ्यांशीं दुसरें युद्ध** – ( १८०३–१८०४ ).–यशवंतराव होळकरानें बाजीरावाचा पराभव केल्यामुळें त्यानें इंग्लिशांचा आश्रय धरला. वसईचा तह मान्य न झाल्यामुळें उत्तरेकडील बहुतेक मराठे सरदार इंग्लिशांवर उठले. हेंच ह्या लढाईचें कारण. जनरल वेलस्ली यानें दक्षिणेमध्यें आसई आणि अरगांव येथील लढायांत शिंदा आणि भोंसला यांचा पराभव केला ; व त्याचप्रमाणें लॉर्ड लेक यानें उत्तरेकडे लासवारी व दिल्ली एथें मराठ्यांच्या फौजांची दाणादाण करून टाकिली. १८०४ त दीग येथें होळकराचा अगदीं पराभव झाला. इंग्लिशांस याप्रमाणें जय मिळाल्यामुळें हिंदुस्तानांत फ्रेंचांचें वजन अगदीं नाहींसें झालें.

**मराठ्यांशीं तिसरें ( शेवटचें ) युद्ध**.– ( १८१७–१८१८ ).– पेशवा, होळकर व भोंसला यांनीं इंग्लिशांबरोबर लढाई सरू केली ; तींत त्यांचा पराभव झाला. १८१७ त इंग्लिशांचा बाजीरावाशीं नवा तह झाला. त्यामुळें त्याची बहुतेक सत्ता जाऊन तो अगदीं परतंत्र झाला. त्या वेळीं पुण्याच्या दरबारीं एलफिन्स्टन् साहेब हा

रेसिडेन्ट होता. त्याला लवकरच लढाई होईल असें वाटल्यावरून त्यानें खडकी एथें एक गोरी पलटन आणून ठेविली. दुसरे दिवशीं पेशव्याच्या सैन्यानें त्यांवर हल्ला केला. पण पेशव्याचें सैन्य मागें हटलें. आणखी पेशव्याच्या व इंग्लिशांच्या पुणें व कोरेगांव येथें लढाया झाल्या. त्यांत त्याचा पराभव होऊन तो पळत सुटला. पुढें पळतां पळतां मंडळेश्वराजवळ मालकम साहेब उतरला होता, त्याला शरण गेला. त्यानें त्याला दरसाल आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन ब्रह्मावर्तास नेऊन ठेविलें, व इंग्लिशांनीं पेशव्याचें सर्व राज्य खालसा केलें.

**नेपाळचें युद्ध**–( १८१४–१८१६ ).–नेपाळच्या राजानें भूतवालच्या जमीनदाराचा प्रांत बळकावून त्यास कैद केलें, व त्या प्रांतांतील इंग्लिशांचे १८ पोलीस कामगार ठार मारले. गव्हरनर जनरल अर्ल ऑफ् मोईरा यानें आपल्या सैन्याच्या चार तुकड्या करून, त्या अनुक्रमें जनरल आक्तरलोनी, जनरल गिलेस्पी, जनरल जे. एस्. वुड् आणि जनरल मार्ली यांच्या हाताखालीं दिल्या. गिलेस्पीच्या हाताखालच्या तुकडीनें नलपाणी व जैतक हे किल्ले घेतले. परंतु कुलुंगच्या हल्ल्यांत गिलेस्पी गोळी लागून मेला ( १८१५ ). तिसऱ्या व चवथ्या तुकड्यांचा पराभव झाला. आक्तरलोनी याच्या हाताखालच्या पहिल्या तुकडीनें शत्रूचीं पुष्कळ ठाणीं घेतलीं. त्याचा सेनापति अमरसिंग यास जेरीस आणिलें. मलूनच्या किल्ल्यास वेढा घातला तेव्हां तो इंग्लिशांच्या स्वाधीन झाला ( मे १८१५ ). नंतर आक्तरलोनी यानें मक्वानपुरास गुरखे लोकांचा अगदीं पराभव केला ( फे० १८१६ ). तेव्हां नेपाळचा राजा तह करण्यास कबूल झाला.

**ब्रह्मी लोकांशीं पहिलें युद्ध**.–( १८२३–१८२६ ).–ब्रह्मी लोक बंगालच्या उपसागराच्या ईशान्य किनाऱ्यावरील प्रांत जिंकीत चालले होते. त्यांनीं आसाम, आराकान प्रांतांवर स्वाऱ्या केल्या, आणि शहापुरी बेट घेतलें. सोकाया जहाजावरील लोकांस कैद करून नेलें ( १८२३ स० ). लॉर्ड आमहर्स्ट यानें सर आर्चिबाल्ड कॅम्बेल याच्या हाताखालीं बंगाल व मद्रास येथील फौज देऊन त्यास तिकडे पाठविलें ( १८२४ मे ). त्यानें रंगून घेऊन कमॅन्डिन बंदर घेतलें. ब्रह्मी सरदार थकियावुंगी व सुभावुंगी यांचा पराभव केला. मार्ताबान वगैरे शहरें घेतलीं. ब्रह्मी सरदार महाबंधुला

डोनाबूच्या लढाईंत गोळी लागून मेला. पावसाळा लागला तेव्हां इंग्लिश लोक प्रोम शहरीं छावणी करून राहिले ( १८२५ ). पाघमच्या लढाईंत ब्रह्मी लोकांचा अगदीं पराभव झाला ( १८२६ ), तेव्हां ब्रह्मदेशच्या राजानें यंडाबू येथें इंग्लिशांशीं तह केला.

**ब्रह्मी लोकांशीं दुसरें युद्ध.**–( १८५२–१८५३ ).–आवाच्या राजाचें उद्धट वर्तन व तो इंग्लिश प्रजेला फार त्रास देऊं लागला; त्यामुळें लांबर्ट व गादविन यांनीं मार्ताबान, रंगून वगैरे शहरें घेतलीं. पेगू प्रांत ब्रिटिश राज्यास जोडला ( १८५२ डि० ). इंग्लिश लोकांच्या सैन्यांत सांथ उठून पुष्कळ लोक मरण पावले. नंतर इंग्लिश लोक प्रोमवर चाल करून गेले. पूर्वीच्या ब्रह्मी राजास त्याच्या भावानें पदच्युत करून इंग्लिशांशीं तह केला ( १८५३ जून ).

**ब्रह्मी लोकांशीं तिसरें ( शेवटचें ) युद्ध.**–( १८८५–१८८६ ).–ही लढाई इंग्लिश लोक व ब्रह्मदेशचा राजा थीबा यांच्यामध्यें झाली. या लढाईचें मुख्य कारण व्यापाराचे संबंधानें दोन्ही देशाचा बेबनाव हें होय असें सांगतात. इंग्लिशांचा सेनापति प्रेंडरगास्ट हा होता. ही लढाई सुमारें एक दोन महिने चालली होती. या लढाईत इंग्रजांना जय मिळाला, व बिचाऱ्या थीबाचें राज्य खालसा करून हिंदुस्तान सरकारच्या ताब्यांत दिलें. थीबा व त्याचीं खासगी मनुष्यें यांस हल्लीं कोंकणांत रत्नागिरीस आणून ठेविलें आहे. हिंदुस्तानाप्रमाणेंच ब्रह्मदेशांत कायदे, कानु, व सुधारणेच्या गोष्टी चालू आहेत.

**अफगाण लोकांशीं युद्ध.**–( १८३८–१८४२ ).–अहमदशहा अबदलीचा नातू शहासुजा याला, त्याचा भाऊ महमूद यानें गादीवरून काढून आपण राजा झाला. परंतु बराकझाय ह्मणून अफगाण लोकांमध्यें एक जात आहे, तिनें त्याला मारिलें. लॉर्ड आकलंड जेव्हां गव्हरनर जनरल होऊन आला, तेव्हां त्या जातीचा मुख्य दोस्तमहंमद राज्य करीत होता. शहासुजा याचा पक्ष धरून सर जॉन कीन याजबरोबर ५० हजार लोक देऊन त्यास अफगाणिस्तानावर पाठविलें. यानें कंदाहार घेऊन शहासुजास गादीवर बसविलें ( १८३९ मे ). दोस्तमहंमद पळून गेला. नंतर गिझनी जुलैंत सर करून आगष्टांत काबूल घेतलें. परवानच्या लढाईत ( १८४० ) दोस्तमहंमद मॅकनातन साहेबाच्या स्वाधीन झाला. सगळ्या अफगाणिस्तानभर शहासुजाचा अंमल बसविला. बंदोबस्ताकरितां

थोडेंसें सैन्य ठेवून बाकीचें हिंदुस्तानांत परत आलें. पुढें सुमारें एक वर्षभर शांतता होती ( १८४१ अक्टोबर ). नंतर दंगे सुरू झाले. सर रॉबर्ट सेल यानें बंडवाल्यांचा पराभव करून जलालाबादेस ठाणें दिलें. पुनः काबुलांत बंड होऊन दोस्तमहंमद याचा मुलगा अकबरखान यानें मॅक्नातन साहेबास गोळी घालून ठार मारिलें ( १८४१ जा० ). इंग्लिशांनीं अकबरखानाशीं तह केला व १५ हजार लोक परत यावयास निघाले, त्यांपैकीं एक मात्र जलालाबादेस पोंचला. अकबरखानानें जलालाबादेवर हल्ले केले परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें लॉर्ड एलिंबरोच्या कारकीर्दींत जनरल पालक त्याच्या मदतीस आला. त्यानें काबुलावर चाल केली. जनरल नॉत थोड्याशा लोकांसह कंदाहार येथें होता. त्याच्या मदतीकरितां हिंदुस्तानांतून कांहीं सैन्य रवाना झालें. त्या दोघां सैन्याची गांठ पडून त्यांनीं गिझ्नी घेतली, आणि जनरल पालक यास मिळण्याकरितां काबुलास निघाले. त्यांनीं काबुल घेतलें व सर्व सैन्य परत आलें.

**शीक लोकांशीं पहिलें युद्ध.**—( १८४५-१८४६ ).—इ० स० १८३९ ह्या वर्षीं रणजितसिंग निवर्तला. त्या वेळेपासून त्याच्या घराण्यांत पुष्कळ रक्तस्राव झाले. शेवटीं त्याचा मुलगा धुलिपसिंग गादीवर बसला. आपल्या हातीं मुख्याधिकार असावा याविषयीं धुलिपसिंगाची आई चांदकुवर व मुख्य सरदार लोक यांच्या खटपटी चालल्या होत्या, व शीक लोकांच्या लढाऊ सैन्यास कांहीं उद्योग नसल्यामुळें त्यांस लढाईची फार खुमखुम होती. त्यांनीं १८४५ च्या दिसेंबर महिन्यांत सतलज नदी उतरून इंग्रजांच्या मुलखावर स्वारी केली. इंग्रजांचा सेनापति सर ह्यू गो त्यांवर चालून गेला. त्यांच्या व ह्यांच्या मुडकी, फेरोजपूर येथें लढाया होऊन शीक लोकांचा पराभव झाला. फेरोजपूरच्या लढाईत गव्हरनर जनरल सर हेनरी हार्डिज स्वतः होता. इंग्रज लोकांची सामुग्री सरून तोफाही पुरेशा नव्हत्या ह्मणून फेरोजपूरच्या लढाईपासून त्यांस जसा फायदा व्हावा तसा झाला नाहीं. इतक्यांत शीक लोक पुनः सत्तर तोफा घेऊन सतलज नदी उतरून आलीकडे आले. शेवटीं सर हेनरी स्मिथ यास त्यांवर पाठविलें. त्याची व गुलाबसिंगाची बद्दिवाल येथें गांठ पडली. परंतु त्याच्यानें गुलाबसिंगावर हल्ला करवेना. स्मिथ साहेबास कुमक येऊन त्यानें त्याच्या

वर अलिवाल येथें हल्ला केला ( २८ जा० १८४६ ). त्यांत त्यांच्या ५६ तोफा व पुष्कळ सामानसुमान इंग्रजांस मिळालें. सर हेनरी स्मिथ व सर ह्यू गो यांनीं आपलीं सैन्यें एकत्र करून पंजाबावर चाल केली. सोब्रान येथें मोठी लढाई होऊन शीक सरदार शामसिंग पडला, व तेजसिंग पळून गेला ( १० फे० १८४६ ). इंग्रज राजधानीवर चालून गेले, तेव्हां शीक लोक तहास कबूल झाले.

**शीक लोकांशीं दुसरें युद्ध.**–( १८४८–१८४९ ).–मुलतानचा सुभेदार मूळराजा यानें आग्न्यु व अंडरसन या साहेबांस ठार मारून बंड उभारिलें ( १८४८ ). पुढें लागलेंच बंड सर्व पंजाबभर पसरलें. क्रिनेरी व सदुसम येथें मूळराजाचा पराभव करून एडवर्ड साहेबानें त्यास मुलतानांत कोंडून धरिलें. इतक्यांत सेनापति लॉर्ड गो सैन्यासह आला. व्हिश् साहेबानें मुलतान घेतलें ( १८४९ जा० ). चिलियनवाला येथील अनिर्णायक लढाईत दोन्ही पक्षांचा फार नाश झाला ( जा० १२, १३ ). शेवटीं लॉर्ड गो यानें गुजराथच्या लढाईत शीक लोकांचा पूर्णपणें पराभव केला ( १८४९ फे० ). शीक लोकांचा सरदार शीरसिंग शरण आला ( मा० ), व त्याच्या मदतीस दोस्तमहंमद याजकडून आलेल्या सैन्याचा गिल्बर्ट यानें खैबरखिंडीपर्यंत पाठलाग केला. नंतर पंजाब इंग्लिशांनीं आपल्या राज्यास सामील केला ( १८४९ मा० ).

**इराण देशाशीं युद्ध.**–( १८५६–१८५७ ).–हिरात इराणी लोकांनीं घेतलें ( १८५६ अक्टो० ) ह्मणून इंग्लिशांनीं इराणच्या आखातांतील कराक बेट आपल्या स्वाधीन करून घेतलें ( नो० ४ ). त्याचप्रमाणें बुशायरही तोफा लावून चार तासांत सर केलें ( नो० १४ ). कुशाब येथें मोठी लढाई होऊन इराणी लोक हटले ( १८५७ फे० ). पुढें इराणचा शहा तहास कबूल झाला ( १८५७ मे ).

**चीन देशाशीं युद्ध.**– ( १८५६–१८५८ ).–सन १८४२ पासून त्या देशांशीं सर्व यथास्थित चाललें होतें. परंतु कंतान येथील चिनी लोकांचा गव्हरनर 'यी' यानें इंग्लिशांचें मालासंबंधीं कांहीं नुकसान केलें, व बारा खलाशांस कैद केलें. तेव्हां सर जॉन बोरिंग यानें त्यास त्याचा जाब पुसला. पण त्याचें कांहीं उत्तर न मिळाल्यामुळें इंग्रज व फ्रेंच यांच्या आरमारांनीं कंतानावर तोफा लावून तें घेतलें. पीहो नदींत गलबतें घालून टिनसिन शहर घेतलें, व पेकिन राजधानीवर चाल केली. तेव्हां राजानें तह केला

संग्रहालय. ठाणे.

(१८५८). पुढें १८५९ व १८६० या वर्षांमधून लढाया झाल्या. पण इंग्लिश व फ्रेंच यांपुढें त्यांचें कांहींच चाललें नाहीं, लॉर्ड एलजिन यानें आपणास पाहिजे तसा तह करून घेतला.

---

## पूरणिका तिसरी.

### तह—कोणकोणामध्यें झाले ते व त्या तहांचीं कलमें.

**कलकत्ता १७५७. (सुराजउद्दवला व क्लाइव्ह यांजमध्यें.)** यांत सुराजउद्दवल्यानें बंगाल्यांतील इंग्लिशांचीं सर्व ठाणीं त्यांस परत द्यावीं ; आपल्या राज्यांत त्यांच्या मालावर जकात घेऊं नये ; व कलकत्याच्या किल्ल्याची दुरुस्ती करण्याजी परवानगी द्यावी ; असें ठरलें.

**मुर्शिदाबाद, पहिला तह १७५७. (मीरजाफर व क्लाइव्ह.)**—यांत मीरजाफरास इंग्लिशांनीं गादीवर बसविल्याबद्दल जो पैसा त्यांस द्यावयाचा त्यापैकीं निमा देऊन बाकीचा तीन वर्षांत फेड करून देण्याचें त्यानें कबूल केलें. इंग्लिशांच्या मालावर जकात घेऊं नये ; व काल्पीपर्यंत सर्व देशाची जमेदारी दिली.

**मुर्शिदाबाद, दुसरा तह १७६० (मीरकासीम आणि वान्सितार्त.)**—मीरकासीमास गादीवर बसविल्याबद्दल त्यानें बरद्वान, चितागांग आणि मिदनापूर हे परगणे देऊन बंगालच्या उत्पन्नांतील तिसरा हिस्सा इंग्लिशांस द्यावा, असें ठरलें.

**मद्रास, १७६९. (हैदर व इंग्लिश यांमध्यें)**-एकमेकांचा जिकलेला मुलूख परत द्यावा व प्रसंगीं परस्परांस परस्परांनीं सहाय करावें.

**काशी, १७७३. (अयोध्येचा नबाब व इंग्लिश.)**—इंग्लिशांनीं नबाबास रोहिले लोकांस रोहिलखंडांतून घालवून देण्यासाठीं मदत करावी व नबाबानें त्याबद्दल ४० लक्ष रुपये द्यावे.

**सुरत, ६ मार्च १७७५. (राघोबादादा व इंग्लिश.)**—इंग्लिशांनीं राघोबादादास ३,००० फौजेची कुमक द्यावी व राघोबानें त्यांस वर्षास १८ लक्ष रुपये, व साष्टी, वसई आणि १९ लक्षांची जहागीर द्यावी.

**पुरंधर, १ मार्च १७७६. (अप्तन साहेब व पेशव्यांच्या तर्फे सखारामबापू व नाना फडनवीस.)**—राघोबानें कोपरगांवीं नेमणूक घेऊन रहावें. इंग्लिश फौजेनें लढाई करूं नये, व साष्टी इंग्लिशांकडे रहावी.

**वडगांव, १७७९. ( इंग्लिश व पेशव्यांचे तर्फे महादजी शिंदे. )**–या तहांत ठरलें कीं, १७७३ त ज्याप्रमाणें व्यवस्था होती, तशी व्हावी; मुंबई सरकारानें कलकत्त्याहून येणारे फौजेस परत जाण्यास सांगावें; भडोच शिंद्यास द्यावें; व दोन इंग्लिश सरदार ओलीस द्यावे.

**साल्बी ( सालपें ) १७८२. ( पेशव्यांच्या तर्फे महादजी शिंदे व इंग्लिशांकडील वकील अंडरसन् यांजमध्यें )**– राघोबानें २५, ००० रुपये दरमहा घेऊन पाहिजे तेथें रहावें; पुरंधरच्या तहानंतर जो मुलूख परस्परांनीं परस्परांचा घेतला असेल तो परत द्यावा; मराठ्यांनीं हैदराकडून इंग्लिशांचा कर्नाटकांतील मुलूख परत देववावा; व भडोच शिंद्याकडे रहावें.

**मंगलोर, १७८४. (टिपू व इंग्लिश )**–परस्परांनीं परस्परांचा घेतलेला मुलूख व बंदीवान परत द्यावे.

**श्रीरंगपट्टण, १७९२. ( टिपू व लॉर्ड कार्नवालिस. )** टिपूनें अर्धें राज्य द्यावें; तीन कोटी रुपये लढाईचा खर्च द्यावा; मराठ्यांस ३० लक्ष रुपये द्यावे; व दोन पुत्र ओलीस द्यावे.

**हैदराबाद, १८०१. ( इंग्लिश आणि निजाम यांच्यामध्यें )**–श्रीरंगपट्टण खालसा झाल्यावर जे प्रांत निजामानें घेतले होते, ते हैदराबादेस निजामाच्या संरक्षणासाठीं जी इंग्लिश फौज होती तिच्या खर्चाबद्दल इंग्लिशांस दिले. त्यांस "दिलेले प्रांत" असें ह्मणतात.

**वसई, ३१ डिसेंबर १८०२. (दुसरा बाजीराव व इंग्लिश.)** बाजीरावानें इंग्लिश फौज ठेवावी, व तिच्या खर्चाकरितां २६ लक्ष रुपये द्यावे; इंग्लिशांखेरीज इतर युरोपियनांस चाकरीस ठेवूं नये; सुरत इंग्लिशांस देऊन निजाम व गायकवाड यांशीं कांहीं तंटा पडल्यास इंग्लिशांच्या मध्यस्तीशिवाय त्याचा निकाल करूं नये; व इंग्लिशांशीं मित्रभावानें वागावें.

**अंजनगांव, ३० डिसेंबर १८०३. ( दौलतराव शिंदे व इंग्लिश. )**–शिंद्यानें इंग्लिशांस गंगा व यमुना या नद्यांच्या मधील प्रांत; जोधपूर, जयपूर व गोहद यांच्या उत्तरेकडील मुलूख; अजिंठा घांट व गोदावरी यांमधील मुलूख; आणि भडोच व अहमदनगरचे किल्ले द्यावे; याप्रमाणें ठरलें.

**देवगांव, १७ डिसेंबर १८०३. ( रघुजी भोंसले व इंग्लिश. )** भोंसल्यानें कटक व बालासूर हे प्रांत; व वर्धा नदीच्या पश्चिमेकडील व गाइलगडाच्या दक्षिणेकडील सर्व प्रांत इंग्लिशांस दिले. व पेशवे व निजाम यांशीं तंटा पडल्यास इंग्लिशांनीं त्याचा निकाल करावा; व इंग्लिशांशिवाय इतर युरोपियनांस चाकरीस ठेवूं नये; याप्रमाणें ठरलें.

**भरतपूर, १६ एप्रिल १८०५. ( भरतपूरचा राजा व इंग्लिश यांमध्यें )**—लढाईच्या खर्चाबद्दल २० लाख रुपये, व इंग्लिशांनीं त्यास जो मुलूख दिला होता, तो परत इंग्लिशांस द्यावा आणि आपला खरेपणा नीट दिसून येईपर्यंत दीग किल्ला इंग्लिशांकडे ठेवून चार मुलगे ओलीस द्यावे.

**२३ नोवेंबर १८०५. ( शिंदा व सर जार्ज बार्लो. )**—इंग्लिशांनीं ग्वाल्हेरचा किल्ला शिंद्यास दिला. गोहदचे राण्याचा मुलूख इंग्लिशांनीं घेतला होता तो शिंद्यास परत दिला. आणि त्यास पेनशन देऊन त्याचे बायकोस व मुलीस आपले ताब्यांतील कांहीं मुलूख इंग्लिशांनीं दिला.

**पंजाब, २४ डिसेंबर १८०५. ( होळकर व इंग्लिश )**—यांत पूर्वी जिंकलेला होळकराचा मुलूख त्यास परत द्यावा; त्या मुलखाकडे नेमलेल्या मार्गानें जाण्याची त्यांस परवानगी द्यावी; व चंबळा नदीचे उत्तरेकडील मुलूख त्यास द्यावा; असें ठरलें.

**नेपाळ, १२ मार्च १८१६. ( नेपाळचा राजा व इंग्लिश. )**—यांत काली नदीचे पश्चिमेकडील प्रांत ज्याचा त्यास द्यावा; सिकीमचे राजाचा मुलूख त्यास परत द्यावा; गुरखे लोकांनीं सरहद्दीवरील पटांगण सोडून द्यावें; आणि काटमांडूचे दरबारीं एक रेसिडेंट असावा; असें ठरलें.

**पुणें, १३ जून १८१७. ( पेशवा व इंग्लिश. )**—इंग्लिशांचे फौजेच्या खर्चाबद्दल पेशव्यानें आणखी कांहीं मुलूख द्यावा; रेसिडेंटाचे संमतीशिवाय दुसऱ्या दरबारीं पत्रव्यवहार ठेवूं नये; आणि वसईचा तह रद्द करावा; असें ठरलें.

**नागपूर १८१७. ( नागपूरचा राजा व इंग्लिश. )**—सर्व शत्रूंपासून इंग्लिशांनीं राजाचें रक्षण करावें व याकरितां इंग्लिशांनीं आपली कांहीं फौज नागपुरास ठेवावी व तिचा खर्च राजानें द्यावा; असें ठरलें.

**मंडेसर ( मंडळेश्वर ), ६ जानेवारी १८१८. ( मल्हारराव होळकर व इंग्लिश. )**–या तहांत होळकरानें रजपुतांवरील आपले हक्क सोडले; व इंग्लिशांशीं स्नेहभावानें राहण्याचें कबूल केलें.

**यांडेबू, १८२६. ( ब्रह्मी राजा व इंग्लिश. )**–या तहांत राजानें आसाम, काचार, जित्या आणि मणिपूर यांवरचा वारसा अगदीं सोडून देऊन शिवाय एक क्रोटी रुपये तीन हप्त्यांनीं देण्याचें ठरविलें व त्यांपैकीं दोन हप्ते वसूल होतपर्यंत रंगून इंग्लिशांकडे असावें, असें ठरलें.

**लुधियाना, २६ जून १८३८. ( इंग्लिश, रणजितसिंग, व शहासुजा यांच्यामध्यें. )**–सर्वांनीं एकत्र मिळून अफगाणिस्तानावर हल्ला करावा, व शहासुजास त्याचे गादीवर बसवावें; इंग्लिशांचें सिंधुनदावरील सैन्य, सिंध व बलुचिस्तानांतून काबूलचे उंच प्रदेशांत जावें; व त्यांत कांहीं बंगालचे, मुंबईचे व शहासुजाचे लोक असून, त्यांजवर गोरे लोक मुख्य असावे; असें ठरलें.

**१८३९. ( सिंधचे अमीर व इंग्लिश. )**–अमीरानें तीन लक्ष रुपये खंडणी द्यावी; तिजबद्दल इंग्लिशांची फौज ठ्ठा या ठिकाणीं किंवा दुसरे ठिकाणीं असावी; इंग्लिशांनीं अमीराला प्रसंगीं मदत करावी; व त्यानें इंग्लिशांच्या संमतीशिवाय कोणत्याही दरबारीं पत्रव्यवहार ठेवूं नये; आपसांत कांहीं तंटा उद्भवल्यास रेसिडेंटाचे मार्फतीनें त्याचा फैसला व्हावा; सिंधुनदांतून जाणाऱ्या व येणाऱ्या मालावर तो ज्या बंदरीं उतरेल त्याशिवाय इतर बंदरीं जकात घेऊं नये; असें ठरलें.

**काबूल, २३ दिसेंबर १८४१. (अकबरखान व इंग्लिश.)**–अकबरखानानें इंग्लिश सैन्यास काबुलांतून जाऊं द्यावें; वाटेनें त्यांस अडथळा होऊं नये, म्हणून इंग्लिशांनीं पुष्कळ पैसा द्यावा; व चार युरोपियन अकबरखानाचे ओलिस पाठवावे; असें ठरलें.

**१४ फेब्रुवारी १८४३. ( अमीर व इंग्लिश. )**–अमीर इंग्लिशांस खंडणी देत होता त्याबद्दल कांहीं मुलूख द्यावा; सिंधुनदावरील आगबोटींस सर्पण पुरवावें आणि अमीरानें नाणें पाडण्याचा अधिकार सोडावा; असें ठरलें.

**ग्वाल्हेर, १८४३. ( शिंदा व इंग्लिश. )**–महाराज वयांत येईपर्यंत पंचांनीं इंग्लिशांचे अनुमतानें राज्य चालवावें; आपलें

सैन्य थोडें ठेवून इंग्लिशांची फौज ग्वाल्हेरीस रहावी; तिचा खर्च महाराजानें द्यावा; व राणीलाही कांहीं नेमणूक करून द्यावी; असें ठरलें.

**लाहोर, १८४६. ( इंग्लिश व शीकलोक. )**–धुलिपसिंगास पंजाबाचा राजा कायम केला; शीक लोकांनीं लढाईच्या खर्चाबद्दल पुष्कळ पैसा आणि सतलज व बिया या दोन नद्यांमधील त्रिकोणाकृति प्रदेश इंग्लिशांस दिला; शिवाय इंग्लिशांस हवा तितका पैसा देण्यास त्यांजकडे नसल्यामुळें आणखी कांहीं मुलुख दिला; व नवीन राजाच्या संरक्षणासाठीं इंग्लिशांची कांहीं फौज लाहोर येथें रहावी व तिचा खर्च राजानें द्यावा; असें ठरलें.

**१८५४. ( निजाम व इंग्लिश. )**–निजामानें फौजेच्या खर्चाबद्दल वऱ्हाडापैकीं चार प्रांत इंग्लिशांस दिले तेच त्यांनीं कबूल केले.

---

## पुरणिका चवथी.–लढाया.

| सन. | स्थळ. | लढाई कोणकोणामध्यें झाली. | जय कोणास मिळाला. |
|---|---|---|---|
| इ.स.पू. ३२७ | गुजराथ. | अलेक्झांडर व राजा पोरस. | अलेकझांडर. |
| इ. स. १०२४ | सोमनाथ. | महंमद (गिजनीचा राजा) व हिंदु लोक. | महंमद. |
| ११९१ | (१) ठाणेश्वर. | पृथ्वीराजा व महंमद घोरी. | पृथ्वीराजा. |
| ११९३ | (२) ,, | महंमद घोरी व पृथ्वीराजा. | महंमदघोरी. |
| १५२६ | (१) पानिपत. | बाबर व इब्राहिम लोदी. | बाबर. |
| १५२७ | सिक्री. | ,, व राणासंग. | बाबर. |
| १५२८ | चंदेरीचा वेढा. | ,, व मेदिनीराय. | ,, |
| १५४० | कनोज. | शीरशहा व हुमायून. | शीरशहा. |
| १५५६ | (२) पानिपत. | बहिरामखान व हिमू. | बहिरामखान. |
| १५६५ | तालीकोट. | विजापूर, गोवळकोंडें, बेदर व अहमदनगरचे बादशहा व विजयनगरचा रामराजा. | विजापूर इ० चे बादशहा |
| १६५८ | दिल्ली. | औरंगजेब व दारा. | औरंगजेब. |
| १७२० | शहापूर. | निजाम उल्मुलूख व सय्यद अबदुल्लाखान. | निजामउल्मुलूख. |

| | | | |
|---|---|---|---|
| १७३६ | भोपाळ. | पहिला बाजीराव व निजामउल्मुलूख | बाजीराव. |
| १७३९ | कर्नाळ. | नादिरशहा व महंमदशहाचे लोक | नादिरशहा. |
| १७४० | ( १ ) अंबूर. | रघुजी भोंसले, मुराररराव घोरपडे व दोस्तअल्ली. | मराठे. |
| १७४६ | मद्रास. | लाबरदोनस् व इंग्लिश. | लाबरदोनस्. |
| १७४७ | अर्काट. | चंदासाहेब व अनुवरुद्दीन. | चंदासाहेब. |
| १७४९ | ( २ ) अंबूर. | मुजफरजंग व अनुवरुद्दीन. | मुजफरजंग. |
| १८५१ | अर्काट. | क्लैव्हसाहेब व राजासाहेब. | क्लैव्हसाहेब. |
| १७५१ | आर्नी. | ,, व ,, | ,, |
| १७५२ | बाहूर. | लारेन्स व फ्रेंच. | लारेन्स. |
| १७५२ | कोवेरपंक. | क्लैव्हसाहेब व राजासाहेब. | क्लैव्ह साहेब. |
| १७५६ | कलकत्ता. | सुराजउद्दवला व इंग्लिश लोक. | सुराज उद्दवला. |
| १७५७ | प्लासि. | क्लैवसाहेब व सुराज उद्दवला. | क्लैव्ह साहेब. |
| १७५८ | कांडोर. | कर्नल फोर्ड व कान्फ्लान्स. | कर्नल फोर्ड. |
| १७५९ | चिनसुरा. | कर्नल फोर्ड व डच लोक. | कर्नल फोर्ड. |
| १७६० | वांदिवाश | कर्नल कूट व फ्रेंचांकडील बुशी व लाली. | कर्नल कूट. |
| १७६० | उद्गीर. | सदाशिवराव भाऊ व निजामअल्ली. | सदाशिवराव भाऊ. |
| १७६० | ( १ ) पाटणा. | कर्नल कालियंद व शहाअलम वगैरे. | कर्नल कालियंद. |
| १७६१ | ( २ ) पाटणा. | ,, कार्न्याक व शहाअलम. | कार्न्याक. |
| १७६१ | दिल्ली. | अहमदशहा अबदल्ली व मल्हारराव होळकर आणि दत्ताजी शिंदे. | अबदल्ली. |
| १७६१ | ( ३ ) पानिपत. | अहमदशहा अबदल्ली व सदाशिवराव, विश्वासराव, वगैरे मराठे. | अबदल्ली. |
| १७६३ | जेरिआ. | इंग्लिश व मीरकासीम. | इंग्लिश. |
| १७६४ | बक्सार. | मनरो व अयोध्येचा नबाब. | मनरो. |
| १७६५ | कोऱ्हा. | मेजर कार्न्याक व सुराजउद्दवला. | मेजर कार्न्याक. |

| सन. | स्थळ. | लढाई कोणकोणामध्यें झाली. | जय कोणास मिळाला. |
|---|---|---|---|
| १७६६ | चंगम व त्रिनोमाली. | स्मिथ व हैदर. | स्मिथ. |
| १७७२ | चिरकुली. | मराठ्यांकडील त्रिंबकराव मामा व हैदर (ह्या ठिकाणीं हैदर एकटा सैन्य सोडून पळाला.) | त्रिंबकराव मामा. |
| १७७९ | लाहोर. | पोफम व मराठे. | पोफम. |
| १७७९ | वडगांव. | मराठे व इंग्लिश. | मराठे. |
| १७८० | (१) पालिलोर. | हैदर व कर्नल बेली. | हैदर. |
| १७८१ | (२) पलिलोर शोलिंगगड. पोर्टोनोव्हो. | सर ऐरकूट व हैदर. | सर ऐरकूट. |
| १७८७ | तंजावर. | टिपू व ब्राथवेथ साहेब. | टिपू. |
| १७८९ | त्रावणकोर. | त्रावणकोरचा राजा व टिपू. | त्रावणकोरचा राजा. |
| १७९२ | लकेरी. | महादजी शिंदे व तुकोजी होळकर. | महादजी शिंदे. |
| १७९२ | श्रीरंगपट्टण. | लॉर्ड कार्नवालीस व टिपू. | लॉर्ड कार्नवालीस. |
| १७९५ | खर्डे. | सवाई माधवराव व निजामअल्ली. | सवाई माधवराव. |
| १७९९ | सिद्धेश्वर. मालवेली. श्रीरंगपट्टण. | इंग्लिशांकडील हारिस साहेब व टिपू. | हारिस. |
| १८०३ | आसई. | वेलस्ली साहेब व दौलतराव शिंदे. | वेलस्ली. |
| १८०३ | अरगांव. | ,, ,, व रघुजी भोंसले. | वेलस्ली. |
| १८०३ | लासवारी. | लॉर्ड लेक व दौलतराव शिंदे. | लॉर्ड लेक. |
| १८०३ | दिल्ली. | ,, व ,, | ,, |
| १८०४ | दीग. | फ्रेजर व मानसन साहेब आणि यशवंतराव होळकर. | मानसन. |
| १८१६ | मकानपूर. | जनरल आक्तरलोनी व अमीरसिंग गुरखा. | आक्तरलोनी. |
| १८१७ | खडकी. | एलफिन्स्टन साहेब व पेशव्यांकडील बापू गोखले. | एलफिन्स्टन |

| | | | |
|---|---|---|---|
| १८१७ | शिताबर्ळडी. | फिट्झरल्ड व नागपूरचे भोंसले. | फिट्झरल्ड. |
| १८१७ | नागपूर. | डव्हटन साहेब व आपा साहेब भोंसले. | डव्हटनसाहेब. |
| १८१७ | जबलपूर. | हार्डिमन साहेब व ,, ,, | हार्डिमन. |
| १८१७ | महीदपूर. | हिस्लाप साहेब व होळकर. | हिस्लाप साहेब. |
| १८१७ | कोरेगांव. | कपतान स्टान्टन व दुसरा बाजीराव. | स्टान्टन. |
| १८१८ | आष्टें. | इंग्लिश व बापू गोखले. | इंग्लिश. |
| १८२५ | डोन्याबु. | क्याम्बेल व महाबंधुला. | क्यांबेल. |
| १८२६ | पाघाम. | क्याम्बेल व नरकाधिपती. | क्यांबेल. |
| १८२६ | भरतपूर. | लॉर्ड काम्बरमरी व दुर्जनसाल. | काम्बरमरी. |
| १८४८ | परवान. | म्याकनाटन साहेब व दोस्तमहंमद. | म्याकनाटन. |
| १८४२ | जलालाबाद. | सेल साहेब व अकबरखान. | सेलसाहेब. |
| १८४३ | { मियानी. हैदराबाद. | सर चार्ल्स नेपिअर व सिंधचे अमीर. | नेपिअर. |
| १८४३ | महाराजपूर. | सर ह्यू गो आणि शिंदे. | सर ह्यू गो |
| ,, | पन्यार [जपूर. | कर्नल ग्रे साहेब व शिंदे. | कर्नल ग्रे. |
| १८४५ | मुडकी व फिरो [ज्ञान. | सर ह्यू गो साहेब व शीक लोक. | सर ह्यू गो साहेब. |
| १८४६ | अलीवाल व सो- | स्मीथसाहेब व शीक लोक. | स्मिथ साहेब. |
| १८४८ | सदुसम. | एडवर्ड साहेब व मूळराजा. | एडवर्ड साहेब. |
| १८४८ | रामनगर. | लॉर्ड गो व शिरसिंग. | लॉर्ड गो. |
| १८४९ | चिनिअनवाला. | लॉर्ड गो साहेब व शीक लोक. | लॉर्ड गो. |
| ,, | गुजराथ. | व्हिस साहेब व ,, ,, | व्हिस साहेब. |
| १८५२ | रंगून. | गाडविन व ब्रह्मी राजा. | गाडविन. |
| १८५७ | काल्पी, लखनौ, दिल्ली इ० | इंग्लिश व नानासाहेब पेशवे. | इंग्लिश. |
| १८५८ | ग्वाल्हेर. | इंग्लिश व तात्या टोपे. | इंग्लिश. |
| १८८६ | ब्रह्मदेश. | इंग्लिश व थीबा राजा. | इंग्लिश. |

# पूरणिका पांचवी.

## वंशावळी.

## तैमूर ( मोंगल ) घराण्याचा वंश.

टीपः—कंसांत घातलेले आंकडे हे अधिकारारूढ झालेल्या पुरुषांचा क्रम दाखवितात.

तैमूर.
|
सुलतान महमद मिर्झा.
|
सुलतान अबू सैय्यद मिर्झा.
|
उमार शेख मिर्झा.
|
बाबर पहिला मोंगल बादशाह. [ १ ]
|
हुमायून. [ २ ]
|
अकबर. [ ३ ]
|
सेलिम-जहांगीर. [ ४ ]
|
शहाजहान. [ ५ ]
|
औरंगजेब ( पहिला अलमगीर ). [ ६ ]
|
बहादूरशहा ( शहाआलम पहिला ). [ ७ ]

बहादूरशहाचे पुत्र:

- जहांदरशहा. [ ८ ]
  - अलमगीर दुसरा. [ १४ ]
    - शहाआलम दुसरा. [ १५ ]
- अझीमसशान.
  - फरुकशियर [ ९ ]
- राफसशान.
  - राफि उद्दवला. [ ११ ]
  - राफि उदरजात. [ १० ]
- महमद अखतार.
  - रोशनअखतार.
    - महमदशहा. [ १२ ]
      - अहमदशहा. [ १३ ]

# मराठ्यांचा वंश.

- बाबाजी.
  - मालोजी.
    - शहाजी.
      - शिवाजी. [ १ ]
        - संभाजी. [ २ ]
          - शाहू. [ ५ ]
            - रामराजा ( दत्तक. ) [ ६ ]
              - शाहूमहाराज ( दत्तक. ) [ ७ ]
                - प्रतापसिंह. [ ८ ]
                - शहाजी. [ ९ ]
        - राजाराम. [ ३ ]
          - शिवाजी [ ४ ]
            - रामराजा ( हा शाहूला दत्तक दिला होता. )
      - संभाजी.
      - व्यंकोजी.
    - सरीफजी.
  - विठोजी.

शहाजीचा निर्वंश होऊन गादीला कोणी वारस नसल्यामुळें इंग्रज सरकारानें इ० सन १८१८ त राज्य खालसा केलें.

# पेशव्यांचा वंश.

- बाळाजी विश्वनाथ. [ १ ]
  - बाजीराव. [ २ ]
    - बाळाजी. ( दुसरा ) [ ३ ]
      - विश्वासराव.
      - माधवराव. [ ४ ]
      - नारायणराव. [ ५ ]
        - सवाई माधवराव. [ ६ ]
    - रघुनाथराव.
      - बाजीराव ( दुसरा ) [ ७ ]
        - नानासाहेब.
      - चिमाजी.
      - अमृतराव ( दत्तक )
    - जनार्दनपंत.
  - चिमणाजी आपा.
    - सदाशिवराव.

## पुरणिका सहावी.

### ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी.

इ० स० १५३५ हुमायुनानें गुजराथेंत स्वारी करून चंपानेर काबीज केलें. तेथें तेथील राजांचा खजिना असे.
,, १५६० अकबरानें राज्याधिकार आपल्या हातीं घेतला.
,, १६०० इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना.
,, १६२३ अंबोयना बेटांत डच लोकांकडून इंग्लिशांची कत्तल.
,, १६६२ मुंबई बेट पोर्तुगालच्या राजापासून इंग्रजांचा राजा दुसरा चार्लस यास आंदण मिळालें.
,, १६६८ मुंबई बेट कंपनीस दिलें.
,, १६९८ दुसऱ्या ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना.
,, १७०० औरंगजेबानें साताऱ्याचा किल्ला घेतला.
,, १७०९ दोन्ही ईस्ट इंडिया कंपन्या एकत्र झाल्या.
,, १७२४ निजाम स्वतंत्र झाला.
,, १७२५ बंगाल्यांत मुर्शिद कुलीखान स्वतंत्र झाला.